CMYK

SOLAPUR TARUN BHARAT

# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


आसमंतसह

लातूर | रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३३९ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



नि आपली प्रत्येक शाखा आपल्याला ध्येयाकडे घेऊन जात आहे याची अनुभूती आपल्याला यायला हवी. शाखेत येणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाला आपल्या ध्येयाची तीव्र अनुभूती असायला हवी. शाखेत तयार होणारा प्रत्येक स्वयंसेवक, कार्यकर्ता संघाच्या ध्येयाचे समूर्त रूप व्हावा ही इच्छा आहे. हीच स्वत:च्या मूल्यांकनाची कसोटी आहे.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह



संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांचा आज प्रकट दिन

# सोलापूर जिल्ह्यात अंदाजे सरासरी ६२ टक्के मतदान

- ✓ कोणताही अनुचित प्रकार नाही
- ✓ शनिवारी रात्री उशिराने मतपेट्या सील
- ✓ सोमवारी दुपारपर्यंत निकाल येणार हाती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ आणि पंचायत समितीच्या १३६ जागांसाठी शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीत जिल्हाभरात कोणताही अनुचित प्रकार न घडता अंदाजे ६२ टक्केपर्यंत मतदान शांततेत पार पडली. जिल्ह्याच्या काही भागात रात्री १० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया चालल्याने रात्रौ उशिराने मतदान मोजणीच्या गोडावूनमध्ये मतपेट्या पोलिस बंदोबस्तात सील करण्यात आल्या, अशी माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली. दरम्यान, मिनी मंत्रालयाच्या भावी कारभाऱ्यांच्या निकालाचे कल सोमवार, दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारनंतर हाती येणार आहेत.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या ६८ गटांसाठी, पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक जाहीर करण्यात आली. त्यासाठी एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली होती. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे घोषित करण्यात आलेल्या राज्य दुखवट्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने ही निवडणूक पुढे ढकलले गेले. त्यानुसार दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी



जाहीर प्रचार थांबला होता. दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३० यावेळेत मतदान प्रक्रिया पार पडली.

मिनी मंत्रालयासाठी जिल्ह्यात एकूण २४ लाख ५९ हजार २२७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यामध्ये १२ लाख ७७ हजार ६१ पुरुष, ११ लाख ८२ हजार ८३ महिला व ८३ इतर मतदारांचा समावेश होता. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून १५ हजार २०० कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. मतदारांना सुरक्षित आणि निर्भय वातावरणात मतदान करता यावे; यासाठी प्रत्येक केंद्रावर तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यात दीड हजारांहून अधिक पुरुष व महिला पोलिस तसेच होमगार्डस्‌चा समावेश होता.

### कोण होणार कारभारी?

जिल्हा परिषद, पंचायत समिती गणासाठी मतदान प्रक्रिया पार पडली आहे. मतमोजणी सोमवारी होणार असली तरी गावोगावच्या चावडीवर, नाक्यावर, शेकोट्याच्या ठिकाणी अमुक या भागात चालला...तमुक त्या भागात चालला...हाच निवडून येणार...तोच निवडून येणार...हा आला तर किती शर्यंत देणार... अशा चर्चांना उधाण आले होते. गावोगावच्या बुथनिहाय किती मतदान झाले अन्‌ कोणाला झाले... कोण होणार कारभारी... निवडून कोण येणार,,, याचा अंदाज बांधला जात आहे.

### 'सीसीटीव्ही'च्या निगराणीखाली मतमोजणीची प्रक्रिया

सर्व मतमोजणी केंद्रांवर कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मत मोजणी प्रतिनिधी, शासकीय कर्मचारी आणि प्रसारमाध्यमांसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा केंद्रांवर उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली पार पडणार आहे, जेणेकरून पारदर्शकता जपली जाईल. अधिकृत ओळखपत्र असलेल्या व्यक्तींनाच मतमोजणी केंद्राच्या परिसरात प्रवेश दिला जाईल, असे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सांगितले.

# कृषी उत्पादनांच्या निर्यातीवर अमेरिकेत शून्य टक्के कर

**शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना करारातून सर्वोच्च प्राधान्य ● वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी दिली माहिती**

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारात शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून भारतीय कृषी उत्पादनांच्या निर्यातीवर अमेरिकेत शून्य टक्के कर आकारला जाणार असल्याचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज सांगितले.



अमेरिकेसोबतच्या महत्वपूर्ण व्यापार कराराची माहिती देण्यासाठी शनिवारी वाणिज्य मंत्रालयात आयोजित केलेल्या पत्रपरिषदेत गोयल म्हणाले की, हा करार ऐतिहासिक असून आजचा दिवस सुवर्णाक्षरात लिहावा असा आहे. भारत अमेरिका यांच्यात ५०० बिलियन डॉलरचा द्विपक्षीय व्यापार होण्याच्या दृष्टीने हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे.

या करारामुळे ३० अब्ज डॉलर्सची अमेरिकन बाजारपेठ भारतासाठी खुली होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मैत्रीतून या कराराची रुपरेषा ठरवल्या गेली आहे, असे ते म्हणाले.

अमेरिकेसोबत व्यापार करार करतांना भारतातील शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना धक्का पोहोचेल, त्यांचे नुकसान होईल, असा कोणताही निर्णय सरकारने घेतला नाही, असे स्पष्ट करत गोयल म्हणाले की, भारत अमेरिका यांच्यातील व्यापार करारात भारतातील शेतकरी, सुक्ष्म,लघु, आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि हस्तकला आणि हातमाग उद्योगांना धक्का बसेल, अशी कोणतीही तरतूद नाही.

भारतातून अमेरिकेत १३ अब्ज डॉलरची औषधी निर्यात होते. औषधांच्या या निर्यातीवरही शून्य टक्के कर आकारला जाणार आहे, याकडे लक्ष वेधत गोयल म्हणाले की, रत्न आणि दागिन्यांची निर्यातही पूर्णपणे करमुक्त आहे.

भारतातून निर्यात होणाऱ्या स्मार्टफोनवरही भविष्यात शून्य टक्के कर आकारणी केली जाईल, तसेच अन्य काही महागड्या वस्तुंच्या निर्यातही करमुक्त राहणार आहे, असे गोयल म्हणाले. विमान आणि अन्य यंत्रसामुग्रीचे खुले भाग, जेनेरिक औषधी, बंगाल, केरळ आणि महाराष्ट्रातील रत्न आणि हिरे, घड्याळ, तेल, झुंबर आदी घरसजावटीच्या सामानांवर शून्य टक्के आयात कर राहणार आहे, असे गोयल यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

### शून्य टक्के कर

चहा, कॉफी, तीळ, काजू, सुपारी, खसखस, जवस, धान्य, बेकरी उत्पादन, मसाले, नारळ, खोब्रा तेल, वनस्पती मेण, औषधी, दागिने, केळी, आंबे, पेरु, ॲवाकाडो, किवी, पपई, अननस, मशरुम, भाज्यांची निर्यात निशुल्क असेल ■

### अमेरिका आजपासून हटवणार २५ टक्के अतिरिक्त शुल्क

◆ **वॉशिंग्टन, ७ फेब्रुवारी**

प्रत्यक्ष किंवाअप्रत्यक्षपणे रशियन तेलाची आयात थांबवणार असल्याचे भारताने सांगितले आहे. त्यामुळे भारतीय वस्तूंवर लादलेले अतिरिक्त २५ टक्के शुल्क रविवारपासून हटवले जाईल, असे अमेरिकेने शनिवारी सांगितले.

भारताने पुढील १० वर्षांत संरक्षण सहकार्य वाढवण्यासाठी अमेरिकेसोबत सहमती दर्शवली आहे, असे अमेरिकेने जारी केलेल्या कार्यकारी आदेशात म्हटले आहे. अमेरिकेत ७ फेब्रुवारी रोजी प्रमाणवेळेनुसार पहाटे १२.०१ वाजल्यापासून किंवा त्यानंतर वापरासाठी दाखल केलेल्या वस्तूंबाबत किंवा गोदामातून वापरासाठी काढलेल्या वस्तूंबाबत, अमेरिकेत आयात केलेल्या भारतीय उत्पादनांवर कार्यकारी आदेश १४३२९ नुसार लादलेला २५ टक्के अतिरिक्त मूल्याधारित शुल्क यापुढे लागू होणार नाही, असे त्यात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### दुचाकीच्या डिकीतून पावणेदोन लाख उडविले

**मलकापूर** : रस्त्याच्या कडेला असलेल्या दुचाकीच्या डिक्कीतून पावणेदोन लाख रुपये चोरट्यांनी लंपास केल्याची घटना नांदुरा रस्त्यावर ६ फेब्रुवारीला घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हरणखेड, ता. मलकापूर येथील व्यावसायिक ज्ञानदेव पुंडलिक चिमकर (४८) यांनी गुरुवारी दुपारी स्थानिक स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून १ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम काढली होती. ही रक्कम कापडी पिशवीत ठेवून त्यांनी त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवून लॉक केली होती. यानंतर चिमकर खामगावकडे जाण्यासाठी निघाले. दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील नांदुरा रस्त्यावरील मातोश्री हॉलसमोर लघुशंकेसाठी त्यांनी दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी केली. काही क्षणांतच परत आल्यानंतर दुचाकीच्या डिक्कीचे लॉक तुटलेले आढळून आले. डिक्कीत ठेवलेली १ लाख ७० हजार रुपयांची पिशवी गायब होती. या घटनेबाबत चिमकर यांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ■

**इराणचे तेल खरेदी केल्यास खबरदार** ▸ वृत्त पान ३

# मलेशियात लवकरच यूपीआय सेवा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा ● भारतीय समुदायाला केले संबोधित**

◆ **क्वालालम्पूर, ७ जानेवारी**

भारताचा डिजिटल पेमेन्ट मंच यूपीआय लवकरच मलेशियात सुरू केला जाईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केली. दोन्ही देशांमधील आर्थिक, संरक्षण आणि जनसंपर्क संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने त्यांनी आपल्या दोन दिवसीय दौऱ्याला आजपासून सुरुवात केली.

२०२६ मधील पहिल्या विदेश दौऱ्यावर नरेंद्र मोदी क्वालालम्पूरमध्ये दाखल झाले. यामुळे मलेशियासोबतची सवसमावेशक सामरिक भागीदारी अधिक मजबूतक करण्यावर भारताचा भर असल्याचे अधोरेखित झाले. ऑगस्ट २०२४ मध्ये दोन्ही देशांनी संबंधांना सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेल्यानंतर



द्विपक्षीय सहकार्य सातत्याने विस्तारत असल्याच्या पृष्ठभूमीवर हा दौरा होत आहे.

नरेंद्र मोदींनी मलेशियातील भारतीय वंशाच्या समुदायासोबत भारताचा संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रमांची घोषणा केली. भारत तुम्हाला नेहमीच खुल्या दिलाने स्वीकारेल. म्हणूनच आम्ही काही महिन्यांपूर्वी एक ऐतिहासिक निर्णय घेतला. आम्ही भारतीय वंशाच्या मलेशियन नागरिकांसाठी सहाव्या पिढीपर्यंत ओसीआय कार्डची पात्रता वाढवली आहे. आम्ही 'इंडियन स्कॉलरशिप ट्रस्ट फंड'ला पाठिंबा देत आहोत, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# ७४३८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद

**जि.प. पं.सं समितीसाठी ७० टक्के मतदान, उद्या मतमोजणी**

◆ **मुंबई, ७ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांची निवडणूक शनिवारी पार पडली. सायंकाळपर्यंत ७० टक्क्यांच्या आसपास मतदानाची नोंद झाली, ७४३८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले. सोमवारी मतमोजणी होणार असून गावातील लोक सत्ताधारी कोण, हे ठरवणार आहे. काही ठिकाणी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी वगळता इतर ठिकाणी मतदान शांततेत पार पडले.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांशिवाय मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर आणि बीड आणि कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान झाले. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समित्यांच्या १४६२ जागांसाठी ही निवडणूक झाली. शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले, तर सर्व ठिकाणी सोमवारी मतमोजणी सकाळी १० वाजता सुरू होईल. ◂(वृत्तसंस्था)




# झेडपी निवडणुकीत विजय मिळाला तरी 'आनंदोत्सव' नाही

- अजितदादांच्या निधनामुळे राष्ट्रवादीचा मोठा निर्णय; प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंचे कार्यकर्त्यांना आवाहन

**मुंबई, दि. ७ फेब्रुवारी-**

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र अद्याप धक्क्यातून सावरलेला नाही. एकीकडे पवार कुटुंबातील सदस्य आणि कार्यकर्ते या दुःखातून सावरत असतानाच, दुसरीकडे राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांचा निकाल तोंडावर आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुनील तटकरे यांनी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना एक अत्यंत महत्त्वाचे आणि भावनिक आवाहन केले आहे. 'जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाचा



विजय झाला, तरी कोणताही आनंदोत्सव साजरा करू नका,' असे आदेश त्यांनी दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. अजित पवार हे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या सभांसाठी मुंबईहून बारामतीकडे येत होते. मात्र त्यांच्यावर काळाने झडप घातली. आज राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. सोमवार ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सोशली मीडियावर पोस्ट करत, कार्यकर्त्यांना उपरोक्त आवाहन आणि विनंती केली आहे.

सुनील तटकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, प्रिय सहकारी, उमेदवार आणि पक्षाचे कार्यकर्ते, महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुकांचे मतदान शांततेत पार पडले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत आपण सर्वांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दाखवलेल्या शिस्तीबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. त्याचवेळी, आपल्या सर्वांच्या लाडक्या नेत्याच्या निधनामुळे आपण दुःखाच्या काळातून जात आहोत. या पार्श्वभूमीवर ९ तारखेला निकाल जाहीर झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचे विजय सोहळे साजरे करताना संयम पाळावा, ही नम्र विनंती आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# अमेरिकेने झुंजवलं पण विजय भारताचाच!

- सूर्यादादा एकटाच पडला भारी
- वर्ल्डकपमध्ये भारताची विजयाने सुरुवात

**मुंबई, दि. ७ फेब्रुवारी :**
भारताने टी-२० विश्वचषकाची सुरुवात विजयाने केली आहे. शनिवारी झालेल्या शेवटच्या सामन्यात संघाने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव केला.

मुंबईतील वानखेडे स्टेडियम वर झालेल्या सामन्यात भारताने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी बाद १६२ धावा केल्या. टीम इंडियाचे पहिले ४ गडी अवघ्या ४६ धावांत बाद झाले. कर्णधार सूर्यकुमार यादवने ४९ चेंडूत ८४ धावा करत संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. १६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेचा संघ २० षटकांत ८ गडी बाद १३२ धावाच करू शकला. शुभम रंजने आणि संजय कृष्णमूर्ती यांनी प्रत्येकी ३७ धावा केल्या. तर मिलिंद कुमारने ३४ धावा केल्या. भारताकडून मोहम्मद सिराजने ३ विकेट घेतल्या. अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

भारताने दिलेल्या १६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेची सुरूवात खूपच खराब झाली. मोहम्मद सिराज व अर्शदीप सिंग यांनी सलामीवीरांना दुसऱ्या व तिसऱ्या षटकात माघारी धाडलं. तर कर्णधार मोनांक पटेलला अर्शदीपने शून्यावर बाद केलं. यानंतर मिलिंद कुमार व संजय कृष्णमूर्ती यांनी चांगली फलंदाजी करत ५८ धावांची भागीदारी रचली. पण भारताच्या फिरकीपटूंनी मिलिंदला ३४ धावांवर तर संजयला ३७ धावांवर झेलबाद करत अमेरिकेच्या आशांवर पाणी फेरलं. मिलिंद बाद झाल्यानंतर संजयने संघाचा डाव सावरला होता.

पण अक्षर पटेलने त्याला माघारी धाडलं. अक्षरने १६व्या षटकात सलग दोन विकेट्स घेत अमेरिकेला बॅकफूटवर टाकलं. हरमीत मोठा फटका खेळण्याचा प्रयत्नात गोल्डन डकवर झेलबाद झाला. यानंतर शुभम रांजणे वादळी फलंदाजी केली. पायाला दुखापत झालेली असतानाही,चालायला त्रास होत असताना त्याने चांगली फटकेबाजी केली. शुभम रांजणेने २२ चेंडूत २ चौकार व ३ षटकारांसह ३७ धावांची खेळी केली. यासह २० षटकांत अमेरिकेचा संघ फक्त ८ बाद १३२ धावा करू शकला.

# समाज संघटित झाल्यास देशात परिवर्तन : डॉ. भागवत

◆ **मुंबई, ७ फेब्रुवारी**
संघाला समाजरूप संघटन उभे करायचे आहे. समाज संघटित व गुणवान होईल, तेव्हाच देशात परिवर्तन येईल. नेता-नारा-नीती-पक्ष-अवतार-सरकार-विचार-तत्त्वज्ञान या सर्व गोष्टी सहायक आहेत. समाज या सर्वांचा मालक आहे. त्यामुळे मालकाने मुळात जागरूक असायला हवे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघ शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'संघ प्रवासाची १०० वर्षे : नवे क्षितिज' या दोन दिवसीय संवाद कार्यक्रमात मुंबईतील ९०० पेक्षा जास्त प्रतिष्ठित मान्यवर व्यक्तिमत्त्वांना त्यांनी संबोधित केले. नेहरू सेंटर, वरळी येथे शनिवारी संपन्न झालेल्या पहिल्या सत्रात डॉ. मोहनजी भागवत यांनी रा. स्व. संघाचा प्रेरणादायी प्रवास, त्याची ऐतिहासिक वाटचाल आणि समाजातील योगदानाचा सविस्तर आढावा घेत, स्थापनेपासून ते आज राष्ट्र निर्मितीतील भूमिकेपर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. याप्रसंगी व्यासपीठावर पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसीया, कोकण प्रांत संघचालक अर्जुन चांदेकर, मुंबई महानगर संघचालक सुरेश भगेरिया उपस्थित होते. पहिल्या सत्रात संबोधित करताना सरसंघचालक म्हणाले, संघाचे स्वयंसेवक संचलन करतात पण ते काही पॅरामिलिटरी ऑर्गनायझेशन नाही, संघाचे स्वयंसेवक लाठीकाठी चालवतात मात्र संघ काही अखिल भारतीय आखाडा नव्हे, संघात भारतीय रागांच्या आधारावर घोष, वैयक्तिक गीत, सांघिक गीत होतात म्हणून संघ काही अखिल भारतीय संगीतशाळा नव्हे. संघाचे स्वयंसेवक राजकारणातही आहेत, म्हणून तो राजकीय पक्ष नव्हे. केवळ बाह्यरूपावरून संघाचे मूल्यमापन केल्यास गैरसमज निर्माण होतील. संघाला जाणून घ्यायचे असेल तर, संघ शाखेचा अनुभव घ्यावा लागेल. संघाची शाखा, कार्यकर्ते, त्यांचा परिवार, कार्यक्रम, वर्ग, शिबिरे, यांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास संघ यथार्थ समजेल.

पुढे ते म्हणाले, संघाचे कार्य देशासाठी आहे. संघ कोणाशी स्पर्धा करण्यासाठी किंवा प्रतिक्रियेतून चाललेला नाही. संघ कोणाच्या विरोधात नाही. कोणाचाही विरोध न करता संघाचे कार्य चालते. संघ सत्ता वा प्रसिद्धीची आकांक्षा बाळगत नाही.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात उपस्थितांना संबोधित करताना सरसंघचालक म्हणाले, आपल्या समाजाच्या संघटित शक्तीच्या आधारावर देशाला बलशाली बनवण्यासाठी समाज सशक्त करणे, या ध्येयाने संघ पुढे जात आहे. आपण यात सहभागी झालात तर, कार्य अधिक वेगाने होईल. दैनंदिन शाखेत उपस्थित राहून शरीर-मन-बुद्धीचा व्यायाम करणे हे तर काम आहेच, परंतु आपापल्या रुची आणि क्षमतेनुसार स्वयंसेवकांनी वा सज्जनशक्तीने चालविलेल्या देशहिताच्या कामात सहभागी होणे किंवा प्रामाणिकपणे व निःस्वार्थबुद्धीने समाजहितासाठी कोणतेही कार्य केल्यास तुम्ही संघाचेच काम करता आहात असे संघ समजतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोकण प्रांत कार्यकारिणी सदस्य विवेक भागवत यांनी केले. व्यासपीठावरील उपस्थितांचा परिचय मुंबई महानगर सहसंघचालक डॉ. विष्णू वझे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोकण प्रांत संपर्क प्रमुख अजय जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

(वृत्तसंस्था)




### देशाचा रोजगार वाढण्यावर भर

स्वदेशी आणि स्वबोध यावर भाष्य करताना सरसंघचालक म्हणाले, बऱ्याचशा विदेशी वस्तू आहेत ज्यांच्याशिवाय आपला दैनंदिन व्यवहार चालू शकतो. बऱ्याचशा अशा भारतीय गोष्टी आहेत, ज्या विदेशी वस्तूंपेक्षा अधिक चांगल्या आहेत. आपल्या देशाचा रोजगार कसा वाढेल, याचा विचार करूनच त्यानुसार वस्तू खरेदी करण्याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. अपरिहार्य असलेला आंतरराष्ट्रीय व्यवहारही कुणाच्या दबावाखाली न येता आपल्या देशातील वातावरणाला अनुकूल पद्धतीने करणे शक्य होईल.

### पंचपरिवर्तनाचा स्वीकार करावा

सामाजिक समरसता, पर्यावरण, स्वबोध, कुटुंब प्रबोधन, संविधान आधारित नागरी कर्तव्यांचे पालन या पाच बिंदूंवर दैनंदिन व्यवहारात जास्तीत जास्त भर देण्याचा आग्रह स्वयंसेवकांनी तसेच सर्वांनी धरावा हा संघकार्याच्या सध्याच्या मांडणीचा प्रमुख भाग असून पंचपरिवर्तन या नावाने तो सरसंघचालकांनी आपल्या भाषणातून विस्ताराने प्रतिपादित केला. या पंचपरिवर्तनाच्या व्यवहारात प्रारंभी स्वयंसेवकांनी पुढाकार घ्यावा आणि हळूहळू तो समाजात संक्रमित होईल यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचा 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करा : मुख्यमंत्री

## २७ व २८ मार्चला मुंबईत होणार परिषद

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ फेब्रुवारी :**
वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या 'पल्स' या वैद्यकीय परिषदेचे आयोजन येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये २७ व २८ मार्च रोजी होणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत.



'पल्स' वैद्यकीय परिषदेचे आयोजन करून परिषदेच्या माध्यमातून 'वेलनेस' उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. पारंपरिक खर्चिक असलेल्या वैद्यकीय उपचाराऐवजी 'वेलनेस' उपचारांकडे नागरिकांचा ओढा वाढत आहे. 'वेलनेस' उपचार पद्धतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्यामुळे आयुषमधील उपचार पद्धतींना 'वेलनेस' कडे वळविण्यात यावे, असे निर्देश देऊन मुख्यमंत्री म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक स्टार्टअप कार्यरत आहेत. अधिकाधिक स्टार्टअपला परिषदेत सहभागी करून घ्यावे. जेणेकरून परिषदेमध्ये या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन संशोधनावर आधारित चर्चांमधून कर्करोगासारख्या आजारांवर सहज, सोपी आणि परवडणारी उपचार पद्धती विकसित करण्यात स्टार्टअपला मदत होईल.

वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील याबाबत दक्षता घ्यावी, त्यांच्या माध्यमातून राज्यात होत असलेल्या 'बल्क ड्रग पार्क' मध्ये गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावेत.' बैठकीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांच्या सल्लागार पूजा मिसाळ आदी उपस्थित होते.

**अशी असणार परिषद**

२७ मार्चला परिषदेचे उद्घाटन झाल्यावर प्लेनरी, ३६० डिग्री डोम, आदींसह स्टार्टअपसाठी वेगळी दालने असणार आहेत. तसेच उद्योग क्षेत्रातील नवनवीन संशोधनाची माहिती असणारी दालने असणार असून परिषदेत जागतिक आरोग्य संघटना, युनेस्को यांचे उच्चपदस्थ अधिकारी सहभागी होतील. जगातील नामांकित वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांचे कुलगुरू आणि संशोधकही परिषदेत सहभाग घेणार आहेत. भविष्यातील वैद्यकीय शिक्षण, डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, उपचार पद्धतीतील संशोधन या विषयांवर पॅनल चर्चा, कार्यशाळा आणि केस स्टडीज होणार आहेत.

# तामलवाडी पंचायत समिती गणात ६८ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील तीनही बुथवर शांततेत मतदान पार पडले असुन ६८ टक्के मतदान झाले आहे. उमेदवारांचे भवितव्य मतदार पेटीत बंद झाले असून, कोण मारणार बाजी याचा फैसला सोमवारी होणार आहे.


जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी दि.०७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथे मतदानास सुरुवात झाली. सकाळच्या सुमारास उमेदवारांच्या हस्ते मतपेटींचे पुजन करुन मतदानास सुरुवात करण्यात आली. सकाळी बाहेरच्या मतदार याद्या व ऑनलाईन मतदार यादीमध्ये थोडासा गोंधळ उडाला होता परंतु निवडणूक अधिकारी यांनी बुथमधील याद्या व बाहेरच्या मतदार याद्याचा ताळमेळ घालुन सुरळीतपणे मतदान करण्यास सुरुवात झाली. तामलवाडी येथील तीनही बुथवर कुठलाही गोंधळ न होता शांततेत मतदान झाले आहे. तामलवाडी येथील ३५७४ मतदारांपैकी बुथ क्रं १९ मध्ये ८८३ , बुथ क्रं २० मध्ये ७९३ तर बुथ क्रं २१ मध्ये ७५५ असे तीनही बुथचे २४४१ मतदान झाले म्हणजेच मतदान संपल्यानंतर ६८ टक्के इतके मतदान झाले आहे. तर तामलवाडी पंचायत समिती गणात तामलवाडी २४३१ , सुरतगाव ९४७ , सांगवी काटी ९७८, पिंपळा खुर्द १३६९, देवकुरुळी १२३१ तर पिंपळा बु. १०२१ असे तामलवाडी पंचायत समिती गणात एकुण ७९७७ इतके मतदान झाले आहे. तामलवाडी पंचायत समिती गणात तिरंगी लढत झाली असून भाजपा महायुतीच्या वतीने मंदाकिनी शिवाजी सावंत या उभ्या होत्या तर महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याने शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने संगिता जगन्नाथ गवळी यांनी निवडणूक लढवली तर काँग्रेस पक्षाच्या वतीने उषा दत्तात्रय शिंदे या मैदानात उतरल्या होत्या. आमचाच उमेदवार विजयी होणार असे जरी प्रत्येक पक्ष सांगत असला तरी उमेवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असुन याचा फैसला सोमवारी होणार आहे. कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मतदान प्रक्रिया पार पडत असताना कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अनिल अंबानी आणि एपस्टीनचे धक्कादायक चॅट लीक

## स्वीडिश मुलीच्या ऑफरवर दिली होती प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ फेब्रुवारी :**
देशातील कर्जबुडव्या, दिवाळखोर व वादग्रस्त उद्योगपती अनिल अंबानी आणि कुप्रसिद्ध जेफरी एपस्टीनचे आणखी काही धक्कादायक संभाषण ( चॅट लीक) खुले झाले आहेत. एका स्वीडिश मुलीच्या 'ऑफर'वर त्यानी त्याच्या भेटीचे नियोजन करण्याची सूचना केल्याचे त्यातून दिसून येत आहे. दरम्यान, या प्रकरणावर अनिल अंबानी यांच्या प्रतिनिधींनी कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

अमेरिकन न्याय विभागाने जारी केलेल्या कागदपत्रांमधून एपस्टिनने जगभरातील अनेक राजकारण्याना किशोरवयीन मुली पूरविल्याचे ही माहिती उघड झाली आहे. त्यामध्ये भारतातील अनिल अंबानी आणि अमेरिकन फायनान्सर जेफरी एपस्टीन यांच्यातील धक्कादायक संवादामुळे देशात खळबळ उडाली आहे. त्याचे टप्याटप्याने काही खुलासे उघड होत आहेत. यामध्ये २०१७ ते २०१९ या कालावधीत दोघांमध्ये झालेल्या मेसेजवरील संभाषणाचा तपशील देण्यात आला असून त्यात जागतिक मुद्दे आणि व्यापारासोबतच महिलांविषयी देखील चर्चा झाली आहे. ब्लूमबर्गने दिलेल्या अहवालानुसार, या दोघांनी वैयक्तिक भेटींचे नियोजनही केले होते.या कागदपत्रांनुसार ९ मार्च २०१७ रोजी झालेल्या संवादात अंबानी यांनी एपस्टीनला विचारले की, तू कोणाची शिफारस करतोस? त्यावर एपस्टीनने उत्तर दिले की, एक उंच




आणि गोरी स्वीडिश मुलगी, जेणेकरून भेट अधिक मजेशीर होईल. या मेसेजला अवघ्या २० सेकंदांच्या आत उत्तर देताना अनिल अंबानी यांनी त्याचे नियोजन कर, असे सांगितले होते. याशिवाय, अन्य एका संवादात एपस्टीनने अंबानींना त्यांच्या आवडीच्या अभिनेत्री किंवा मॉडेलबद्दल विचारले होते. त्यावर अंबानी यांनी स्कारलेट जोहानसनचे नाव घेतले होते. विशेष म्हणजे त्याच वर्षी रिलायन्स एंटरटेनमेंटची निर्मिती असलेल्या एका चित्रपटात या अभिनेत्रीने काम केले होते.

**पॅरिस आणि न्यूयॉर्कमधील भेटींचे नियोजन**

अंबानी आणि एपस्टीन यांच्यातील मेसेजमधून असेही समोर आले आहे की, त्यांनी पेरिसमध्ये भेटण्याबाबत चर्चा केली होती, मात्र ती भेट होऊ शकली नाही. त्यानंतर जानेवारी २०१८ मध्ये दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रतिक्रियेवरही त्यांनी चर्चा केली होती. मे २०१९ मध्ये जेव्हा अनिल अंबानी न्यूयॉर्कमध्ये जाणार होते, तेव्हा एपस्टीनने त्यांना आपल्या घरी येण्याचे निमंत्रण दिले होते. मॅनहट्टन येथील एपस्टीनच्या निवासस्थानी या दोघांची भेट झाल्याची पुष्टी त्यांच्या सहायकांनी केली आहे. मात्र, या प्रकरणावर अनिल अंबानी यांच्या प्रतिनिधींनी कोणतीही अधिकृत प्रतिक्रिपया देण्यास नकार दिला आहे. एपस्टीनला अंबानी कुटुंबाबद्दलची माहिती २०१७ मध्ये त्याने मागवलेल्या काही डिजिटल पुस्तकांमुळे मिळाली असावी, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याने अंबानी अँड संस आणि स्टॉर्म्स इन द सी विंड ही पुस्तके वाचली होती, ज्यातून त्याला या कुटुंबाचा इतिहास आणि त्यांच्या सामाजिक स्थानाची कल्पना आली होती. धीरूभाई अंबानी यांच्या निधनानंतर मुकेश आणि अनिल अंबानी यांच्यात व्यवसायाची फाळणी झाली होती. सध्या अनिल अंबानी रिलायंस समूहाचे अध्यक्ष आहेत, तर मुकेश अंबानी रिलायंस इंडस्ट्रीजचे नेतृत्व करत असून ते आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहेत.

मात्र गेल्या काही वर्षांत अनिल यांच्या आर्थिक स्थितीत मोठी घसरण झाली आहे. एकेकाळी अब्जाधीश असलेल्या अंबानींची बहुतांश संपत्ती संपली आहे. २०१९ मध्ये मुकेश अंबानी यांनी ८० दशलक्ष डॉलरचे कर्ज फेडल्यामुळे अनिल तुरुंगात जाण्यापासून वाचले होते. सध्या त्यांच्यावर विविध तपास यंत्रणांची चौकशी सुरू आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणांना अनिल अंबानी आणि त्यांच्या कंपन्यांशी संबंधित ४०० अब्ज रुपये म्हणजेच ४.४ अब्ज डॉलरच्या कथित बँक कर्ज फसवणुकीच्या चौकशीला गती देण्याचे निर्देश दिले आहेत.


# कराओके मंचतर्फे आज 'रंगीले सूर' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
येथील कराओके मंचतर्फे ख्यातनाम संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या सिनेसंगीतावर आधारीत रंगीले सूर हा विशेष कार्यक्रम रविवारी दि.८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लो.टिळक सभागृहात आयोजीत केला आहे. यामध्ये निशिथ मेहता, भरत शहा, संजय नोगजा, हीना सिगी, श्रुती गुजर, तृप्ती कुलकर्णी, अरूणा गुजर, उमेश धोब्बी या कलाकारांचा सहभाग आहे. धर्मेश राडिया याचे निवेदन करणार आहेत.

तरी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## निधन वृत्त...

### रेहान देशमुख



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
रेहान सलीम देशमुख यांचे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ३८ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे.त्यांची अंत्ययात्रा उद्या, रविवार दि. ०८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजता कादिया मशीद, देशमुख गल्ली येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार असून चिराग अली कब्रस्तान येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, ०१ मुलगा, ०१ मुलगी, भाऊ, बहीण, वहिनी असा मोठा परिवार आहे.

### चंद्रभागा लिमये



**मुरूम, दि. ७ फेब्रुवारी-**
येथील चंद्रभागा मच्छिंद्र लिमये यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्या ८५ वर्षाच्या होत्या.त्यांच्या पश्चात तीन मुले ,एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. साम टीव्ही चे पत्रकार विश्वभूषण लिमये यांच्या त्या आजी होत.

# मुंबईच्या महापौरपदी मराठीच असणार!

- भाजपाच्या रितू तावडेची निवड निश्चित
- उपमहापौरपदी संजय घाडी

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ७ फेब्रुवारी-**
आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या बृहन्मुंबई महापालिकेत मराठी महापौर करण्याचा भाजपाने दिलेला शब्द पाळला आहे. त्यासाठी जेष्ठ नगरसेविका रितू तावडे यांचा उमेदवारी अर्ज शनिवारी दाखल केला. तर उपमहापौर पदावर शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक संजय घाडी यांनी अर्ज दाखल केला. दरम्यान, प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाने उमेदवार उभा करणार नसल्याचे जाहीर केल्याने तावडे यांची निवड निश्चित मानली जात आहे. ११ फेब्रुवारीला त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे.

मराठीच्या मुद्दावर रंगलेल्या निवडणुकीत महायुतीने सर्वाधिक ११८ जागा जिंकल्या. प्रचाराच्या रणधुमाळीत भाजपाने मुंबईचा महापौर हिंदू आणि मराठीच असणार असल्याचे जाहीर केले होते.निकालात भाजपाने ७९ तर शिवसेना शिंदे गटाने २९ जागा पटकावित बहुमत मिळविले. त्यामुळे ४४ वर्षानंतर भाजपाचा मुंबईत पहिल्यांदा महापौर बसणार आहे. महायुतीच्या शनिवारी झालेल्या संयुक्त बैठकीत भाजपाचे मुंबईचे अध्यक्ष अमित साटम यांनी महापौरपदासाठी रितू तावडे यांच्या नावाची घोषणा केली, तर शिवसेनेचे नेते राहुल शेवाळे यांनीउपमहापौरपदासाठी सव्वा वर्षासाठी संजय घाडी यांचे नाव जाहीर केले.



त्यानंतर त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

**कोण आहेत रितू तावडे?**

रितू तावडे घाटकोपरच्या प्रभाग क्रमांक १३२ मधून दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. गुजरातीबहुल मतदारसंघातील मराठी चेहरा म्हणून ओळखल्या तावडे यांनी यापूर्वी शिक्षण समितीच्या अध्यक्षपद सांभाळले आहे. संघटनात्मक कामामुळे त्यांची पक्षातील मजबूत पकड आहे.त्यांना प्रथम नागरिक म्हणून संधी देताना भाजपाने मराठी अस्मिता आणि गुजराती मतदार या दोन्ही समीकरणांचा विचार केल्याची चर्चा आहे.

मराठी महापौर देत विरोधकांच्या अस्मितेच्या राजकारणाला उत्तर देण्यासोबतच गुजराती मतदारांनाही प्रतिनिधित्व मिळाल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**घाडी सव्वा वर्षासाठी उपमहापौर**

महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडे उपमहापौर देण्याचा निर्णय झाल्यानंतर त्यासाठी अनेक जण इच्छुक असल्याने नाराजी नाट्य पहावयास मिळाले. अखेर अडीच वर्षात दोघांना संधी द्यायचे ठरले असून पहिल्या सव्वा वर्षासाठी संजय घाडी यांची निवड करण्यात आली. त्यामुळे अन्य इच्छुकामध्ये नाराजी असल्याचे चर्चा व्यक्त होत होती.

**ठाकरे गटाचा उमेदवार नाही**

भाजपाने दिल्याने त्याच्याविरोधात आपला उमेदवार न देण्याचा निर्णय ठाकरे गटाच्या बैठकीत घेण्यात आला. याबाबत गटनेत्या किशोरी पेडणेकर म्हणाल्या,' संख्याबळाचे गणित आम्हाला माहित आहे. मात्र आम्ही विरोधाला विरोध म्हणून निवडीला बट्टा लावणार नाही. मात्र नव्या सभागृहात प्रबळ विरोधकांची भूमिका बजावू.'

**असे आहे पक्षीय बलाबल :**

भाजपा ८९, शिवसेना (ठाकरे गट) ६५, शिवसेना (शिंदे गट) २९, काँग्रेस २४, एमआयएम ८, मनसे ६, राष्ट्रवादी (अजित पवार) ३, समाजवादी पक्ष २ आणि राष्ट्रवादी (शरद पवार) १.

रितू तावडे या यापूर्वीही भाजपतर्फे नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या आहेत. त्या भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी आहेत.

**मुंबईच्या संभाव्य महापौर रितू तावडेंची संपत्ती आणि शिक्षण किती?**

मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपतर्फे रितू तावडे यांनी अर्ज दाखल केला आहे. उपमहापौरपदासाठी शिवसेनेच्या संजय घाडी यांनी अर्ज दाखल केला आहे. शिवसेना आणि भाजपचे मुंबई महापालिकेतील संख्याबळ पाहाता महापौर हा भाजपचा आणि उपमहापौर हा शिवसेनेचा होईल अशी शक्यता आहे. मुंबई महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गातील महिला उमेदवारासाठी राखीव झाले होते.

**कोण आहेत रितू तावडे ?**

रितू तावडे या यापूर्वीही भाजपतर्फे नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या आहेत. त्या भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी एक असून दुसऱ्यांदा त्या नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या आहेत. २०१२ साली रितू तावडे या प्रभाग क्र.१२१ मधून निवडून आल्या होत्या तर २०२५ साली त्या प्रभाग क्र.१३२ मधून निवडून आल्या.



फुकट प्रसिद्धीसाठी भडक बोलण्याचा उद्योग अलिकडे सुरू झाला असून, अजितदादांच्या मृत्यूचे भांडवल कोणी करू नये. अजित पवार यांच्या विमानाची दुर्घटना तांत्रिक स्वरूपाचीआहे.

**-शहाजी बापू पाटील**, माजी आमदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.tarunbharat.net




मुंबईचा महापौर हिंदू मराठी असेल, हा आम्ही मुंबईकरांना दिलेला शब्द पाळला. ज्यांना मराठी मुस्लिम महापौर करायचा होता त्यांचा डाव मुंबईकरांनीच हाणून पाडला. महायुतीच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या तमाम मुंबईकरांचे आभार !!

**- आशिष शेलार**, भाजपा नेते



# इराणचे तेल खरेदी केल्यास खबरदार

## ५०० टक्के शुल्क आकारण्याची ट्रम्प यांची धमकी ● अणुकार्यक्रम करारावरील चर्चा फिस्कटल्याने दणका

♦ **वॉशिंग्टन, ७ फेब्रुवारी**

ओमानच्या मस्कत शहरात झालेल्या चर्चेत इराणने अणूकार्यक्रमावर नियंत्रण आणणारा करार करण्यास नकार दिल्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या तेल खरेदीवर नवीन निर्बंध लादण्याची घोषणा केली. इराणकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्क्यापर्यंत अतिरिक्त व्यापार शुल्क आकारण्याचे आणि तेलाची खेप नेणाऱ्या मालवाहू जहाजांना जप्त करणार असल्याचे सांगितले.

ट्रम्प यांनी इराणशी संबंधित एका कार्यकारी आदेशावर शनिवारी स्वाक्षरी केली. या आदेशामुळे अमेरिकेला इराणकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वस्तू किंवा सेवा खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लादण्याची परवानगी मिळते.



### ... तर गंभीर परिणाम भोगावे लागतील

अमेरिका आणि इराणी शिष्टमंडळ पुढील आठवड्यात चर्चा करणार आहे. वाटाघाटीत तोडगा न निघाल्यास इराणला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल असा इशारा ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिला. मस्कत येथील बैठकीत अमेरिका-इराण अणुकरारावरील पहिल्या फेरीत कोणताही तोडगा निघाला नाही. ■

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी ट्रम्प यांच्या आदेशाची माहिती देताना सांगितले की, जगभरातील अस्थिर कारवायांना निधी देण्यासाठी आणि दडपशाही वाढवण्यासाठी इराण तेलाच्या उत्पन्नाचा वापर करतो. राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण किंवा आर्थिक बाबींवर अमेरिकेशी समन्वय साधण्यासाठी करार करण्यास इराण सहमत झाल्यास आदेशात सुधारणा केली जाईल. इराणच्या कृतींना विरोध करण्याच्या उद्देशाने नवीन निर्बंध लागू करण्यात आले. प्रादेशिक शांततेसाठी अणूकार्यक्रम रोखणे, तेलाच्या उत्पन्नातून दहशतवादाला होणारा आर्थिक पुरवठा थांबविणे आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्र निर्मितीवर प्रतिबंध लावण्यासाठी इराणच्या तेल खरेदीवर निर्बंध लादण्यात आले. टॉमी पिगॉट म्हणाले की १४ मालवाहू जहाजांवर इराणी तेल वाहून नेल्याचा आरोप आहे. यामध्ये तुर्की, भारत आणि संयुक्त अरब अमिरातीतील कंपन्यांचा समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

### इराणमध्ये मानवी अधिकारांचे उल्लंघन



इराणी राजवट देशातील संसाधनाचा वापर दहशत आणि प्रादेशिक अशांतता पसरविण्यासाठी करीत आहे.नागरिकांच्या कल्याणापेक्षा अणू आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमांना प्राधान्य देते. इराण आपल्याच लोकांवर क्रूरपणे दडपशाही करतो, हजारो निदर्शकांना मारतो आणि त्यांना मूलभूत मानवी हक्क नाकारतो. इराणच्या या कृती अमेरिकेसाठी धोका निर्माण करतात, असे ट्रम्प म्हणाले. ■

# कुनोत पाच पाहुण्यांचे आगमन



♦ **शिवपूर, ७ फेब्रुवारी**

मध्यप्रदेशातील कुनो अभयारण्यात पाच पाहुण्यांचे आगमन झाले आहे. येथील मादी चित्ता आशाने पाच शावकांना जन्म दिला. यासह येथील एकूण चित्त्यांची संख्या आता ३५ झाली आहे, अशी माहिती मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शनिवारी दिली. भारतात नामशेष झालेले चित्ते परत आणण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंतर्गत आशाला नामिबियातून येथे आणले गेले होते.

आशाने पाच निरोगी शावकांना जन्म दिल्याने कुनोने अभिमानाचा एक अविस्मरणीय क्षण अनुभवला. यासह भारतात जन्मलेल्या शावकांची संख्या २४ झाली असून, देशातील चित्त्यांची एकूण संख्या ३५ झाली, असे मोहन यादव यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. वनविभागाचे कर्मचारी आणि पशुचिकित्सकांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याचे यादव यांनी सांगितले. मध्यप्रदेश वन्यजीव संवर्धनाचेम केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# आसिम मुनीरनेच दिला 'गझवा-ए-हिंद'चा नारा

### जैशच्या दहशतवाद्याची कबुली

♦ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

पाकिस्तानचा लष्करप्रमुख आसिम मुनीरनेच 'गझवा-ए-हिंद'चा नारा दिला होता. त्यानेच अतिरेक्यांना भारतात हिंसाचार घडवण्यास सांगितले होते, अशी खळबळजनक कबुली जैश-ए-मोहम्मदच्या अतिरेक्याने 'ऑपरेशन सिंदूर'वर दिली.

जैशचा टॉप कमांडर इलियास काश्मिरीने व्याप्त काश्मिरातील रावलकोट येथे अतिरेक्यांसोबत चर्चा चर्चा करताना उपरोक्त दावा केला आहे. पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी युद्धाची घोषणा करताना हे गझवा-ए-हिंद असल्याचे म्हटले होते, असे काश्मिरीने तिथे उपस्थित अतिरेक्यांना सांगितले. आता युद्ध सुरू झाले. दारुगोळा बाहेर आला. लढाऊ विमाने घडकत आहेत. रणगाडे समोरामोर आले, त्यावेळी लष्करप्रमुखांनी हे गझवा-ए-हिंद असल्याची घोषणा केली होती. हे बुनयान अल मरसूस असल्याचे आसिम मुनीरने म्हटल्याचा दावा काश्मिरीने केला. अतिरेक्यांच्या भरतीसाठी जैश-ए-मोहम्मदने आयोजित केलेल्या सभेत तो बोलत होता. भारतात गझवा-ए-हिंद घडवण्यामागे पाकिस्तानी लष्कराचा हात असल्याची कबुली इलियास काश्मिरीने प्रशिक्षित अतिरेक्यांसमोर या माध्यमातून दिली. ज्यावेळी सरकारची सोबत होती, तेव्हाही जिहाद पुकारला आणि सरकार सोबत नसतानाही जिहादच होता. ◂(वृत्तसंस्था)

### ठरविले एक, झाले उलटेच

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान ७ मे रोजी भारताने बहावलपूर येथे केलेल्या हल्ल्यात जैशचा प्रमुख मौलाना मसूद अझहरचे कुटंब ठार झाल्याची माहिती इलियास काश्मिरीनेच दिली होती. 'ऑपरेशन सिंदूर'ला प्रत्युत्तर देण्यासाठी केलेल्या कारवाईला पाकिस्तानने 'बुनया अल मरसूस' नाव दिले होते. संरक्षण करणारी बळकट भिंत, असा याचा अर्थ होतो. भारतविरोधी कारवाईला हे नाव देऊन आम्ही किती बळकट आहोत, हे पाकिस्तानला दाखवायचे होते. ■

# कॅनडात हिंसक हल्ल्यात १७ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

## परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांची माहिती

♦ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

२०१८ ते २०२५ या सात वर्षांच्या काळात कॅनडामध्ये शिक्षण घेणाऱ्या १७ भारतीयांचा हिंसक हल्ल्यांमध्ये मृत्यू झाला. परदेशात शिक्षण घेणाऱ्या सर्वाधिक भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू कॅनडामध्ये झाल्याची माहिती परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी लोकसभेत लेखी उत्तरात दिली.

एआयएमआयएम खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना, सिंह यांनी विविध देशांमध्ये २०१८-२५ या काळात भारतीय विद्यार्थ्यांच्या मृत्यूची देशनिहाय आकडेवारी सादर केली. त्यानुसार कॅनडात ७, अमेरिका ९,



ऑस्ट्रेलिया ३, ब्रिटन १, चीन १, डेन्मार्क १, जर्मनी १, ग्रेनाडा १ आणि किर्गिस्तान येथे २ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. सरकार परदेशात भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला उच्च प्राधान्य देते आणि त्यांच्याविरुद्धच्या हिंसक घटनांवर लक्ष ठेवते. भारतीय विद्यार्थ्यांवर होणाऱ्या हिंसक आणि अनुचित घटनांची दखल भारतीय दूतावासाद्वारे घेण्यात आली आणि संबंधित देशांच्या अधिकाऱ्यांकडे चौकशी, तसेच दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली. भारतीय दूतावासाचे अधिकारी परदेशी विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी नियमित संपर्क ठेवतात आणि संबंधित देशातील आव्हाने, धोक्यासंदर्भात माहिती देतात. आपत्कालीन परिस्थितीत, विद्यार्थ्यांसह भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी भारत सरकारने स्थलांतर मोहिमा राबवल्या आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'चिकिरी चिकिरी' गाण्याने केला विक्रम




**मुंबई** : अभिनेता राम चरणच्या आगामी 'पेड्डी' चित्रपटातील 'चिकिरी चिकिरी' या पहिल्या गाण्याने चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच युट्यूबवर २०० दशलक्ष म्हणजेच २० कोटींहून अधिक व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. वेगवेगळ्या भाषांमध्ये या गाण्याची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे. हिंदी व्हर्जनला यूट्यूबवर ५० दशलक्ष म्हणजेच ५ कोटींहून अधिक वेळा पाहिले गेले आहे. 'पेड्डी' चित्रपट ३० एप्रिल रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. चित्रपटाचे निर्माते टीझर, गाणी आणि पोस्टर्सद्वारे चित्रपटाची क्रेझ कायम ठेवत आहेत. नुकतेच एक नवीन पोस्टर जारी करून चित्रपट प्रदर्शनाची तारीख जाहीर केली. ■

### 'भागम भाग २'मध्ये दिसणार नाही गोविंदा



**मुंबई** : विनोदी चित्रपट 'भागम भाग'चा सीक्वल तयार होणार आहे. 'भागम भाग २' मध्ये अक्षय कुमार आणि परेश रावल दिसणार आहेत, मात्र सिक्वलमध्ये गोविंदाच्या जागी मनोज वाजपेयी भूमिका करणार आहेत. चित्रपटामध्ये अक्षय कुमार आणि परेश रावल पहिल्या भागाप्रमाणे दिसतील. याचबरोबर, चित्रपटात मनोज वाजपेयीची एंट्री होईल. चित्रपटात अक्षय कुमारसोबत मीनाक्षी चौधरी मुख्य भूमिकेत असेल. चित्रपटाचे चित्रीकरण पुढील महिन्यात मुंबईत सुरू होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन राज शांडिल्य करणार आहेत. 'भागम भाग'ला संगीत प्रीतम यांनी दिले होते. ३२ कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर सुमारे ६७ कोटींहून अधिक कमाई केली होती. ■

### २२ वर्षांनी येणार 'मै हूं ना'चा सिक्वल?



**मुंबई** : काही दिवसांपूर्वी, शाहरुख खानच्या आगामी प्रकल्पांबद्दल एक मोठी अपडेट समोर आली. फराह खान तिच्या 'मैं हूं ना' या हिट चित्रपटाचा सिक्वेल तयार करत असल्याची वार्ता आहे. तिला 'मैं हूं ना २' ची कथा सापडली आहे. शाहरुख या चित्रपटात दुहेरी भूमिका साकारणार असल्याचे वृत्त आहे. यासाठी तो खूप उत्सुक आहे. दिग्दर्शक-नृत्यदिग्दर्शिका फराह पटकथेवर काम करत आहे. या चित्रपटासाठी जुन्या कलाकारांना परत आणण्याबाबतही चर्चा झाली आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना 'मैं हूं ना २' संबंधित सर्व बातम्या खोट्या आहेत आणि आम्ही सर्वांना विनंती करतो की या अफवांवर विश्वास ठेवू नका, असे फराह खान म्हणाली. ■

# पुणे झाले बहुराष्ट्रीय कंपन्यांचे 'हॉटस्पॉट'

## देशातील जीसीसी गुंतवणुकीत दुसऱ्या स्थानी

♦ **पुणे, ७ फेब्रुवारी**

जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पृष्ठभूमीवरही भारतात विदेशी कंपन्यांचा उत्साह टिकून आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आपली जागतिक क्षमता केंद्रे भारतात स्थापन करण्यास प्राधान्य देत आहेत. देशातील प्रमुख महानगरांमध्ये मागील वर्षी पुण्याने उत्कृष्ट कामगिरी केली असून, जीसीसी गुंतवणुकीत बंगळुरूपाठोपाठ दुसऱ्या स्थानी राहिला आहे. पुण्याने मुंबई, दिल्ली आणि हैद्राबादसारख्या शहरांना मागे टाकले आहे.

'फिक्की' आणि 'अनारॉक ग्रुप' यांनी संयुक्तपणे जाहीर केलेल्या अहवालानुसार, देशातील सात महानगरांमध्ये मागील वर्षी आठ कोटी चौरस फुटांच्या कार्यालयीन जागांचे भाडेतत्वावरील व्यवहार झाले. यापैकी तीन कोटी २५ लाख चौरस फुट म्हणजे सुमारे ४० टक्के जागा जीसीसीसाठी वापरण्यात आली. बंगळुरूमध्ये सर्वाधिक व्यवहार झाले असून त्याचा वाटा ३० टक्के आहे. पुण्याने १५ टक्के व्यवहारांसह दुसरे स्थान पटकावले, तर दिल्ली आणि हैद्राबाद प्रत्येकी १४ टक्के व्यवहारांसह तिसऱ्या स्थानी आहेत.

कार्यालयीन जागांच्या बाजारपेठेत दक्षिणेतील राज्यांचा वाटा जास्त असून, नवीन पुरवठ्यातील ५१ टक्के जागा दक्षिणेतील महानगरांमध्ये उपलब्ध आहेत. भारत जागतिक कंपन्यांसाठी आकर्षक ठरत असून, कमी खर्चात कार्यालय सुरू करणे शक्य आहे आणि कुशल मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. अहवालानुसार, कार्यालयीन जागांमध्ये सहकारी सेवा क्षेत्राचा वाटा २३ टक्के, बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्राचा १८ टक्के आहे. माहिती तंत्रज्ञान, संबंधित सेवा, निर्मिती आणि सल्लागार क्षेत्रातील मागणीही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अंदाजानुसार, २०३० पर्यंत जीसीसींची संख्या २,४०० वर पोहोचेल आणि २८ लाख लोक या क्षेत्रात कार्यरत होतील. आत्तापर्यंत केवळ सात महानगरांमध्ये केंद्रे स्थापन झाली असली तरी, जयपूर, कोची, इंदूर आणि कोईमतूरसारख्या छोट्या शहरांमध्येही भविष्यात ऋउउ स्थापन होण्याची शक्यता आहे, अशी माहिती 'अनारॉक ग्रुप'चे अध्यक्ष अनुज पुरी यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)





राज्यात १२ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान झाले. सातारा जिल्ह्यात कराड येथील मतदान केंद्रावर मतदानासाठी लागलेली रांग

# गुरू ग्रह आकाराने लहान, चपटा!


**नासाच्या जुनोने केला खुलासा**

**रेडीओ डेटाच्या साहाय्याने केले मोजमाप**

♦ **वॉशिंग्टन, ७ फेब्रुवारी**

आत्तापर्यंत सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह म्हणून ओळखला जाणारा बृहस्पति म्हणजेच गुरू ग्रह हा आकाराने थोडा लहान आणि अधिक सपाट असल्याचा निष्कर्ष नासाच्या जुनो अंतराळयानाने काढला आहे. पूर्वी शास्त्रज्ञांना हा ग्रह जितका मोठा वाटत होता तो आता तसा नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

गुरू ग्रहाच्या जवळून जाणाऱ्या १३ घटनांवरून मिळालेल्या माहितीचा अभ्यास करून हा वायू महाकाय ग्रह पूर्वीच्या अंदाजापेक्षा आता तो विषुववृत्तावर सुमारे ८ किलोमीटर अरुंद आणि ध्रुवावर २४ किलोमीटर सपाट आसल्याचे संशोधकांना आढळून आले आहे. 'नासा'च्या 'जुनो' या अंतराळयानाकडून मिळालेल्या रेडीओ डेटाचा वापर करून शास्त्रज्ञांनी या ग्रहाच्या आकाराचे अधिक अचूक मोजमाप निश्चित केले आहे.





अद्ययावत मोजमापांमध्ये ग्रहाभोवती फिरणाऱ्या शक्तिशाली वाऱ्यांचा देखील समावेश आहे. यांना 'झोनल वारे' असे म्हणतात. हा शोध 'रेडीओ ऑकल्टेशन' म्हणजेच हे ग्रहांच्या वातावरणाचे भौतिक गुणधर्म मोजण्याचे एक रिमोट सेन्सिंग तंत्र आहे. यात उपग्रहाकडून येणारे रेडीओ सिग्नल वातावरणातून जाताना कसे बदलतात, याचा अभ्यास करून तापमान, दाब आणि आर्द्रता मोजली जाते.

आतापर्यंत १९७०च्या दशकात नासाच्या पायोनियर आणि व्हॉयेजर मोहिमांनी केलेल्या सहा रेडीओ गुप्त प्रयोगांमधून गोळा केलेल्या मर्यादित माहितीवर या गुरू ग्रहाचा आकार सांगितला जात होता. नवीन मोजमाप हे केवळ गुरू ग्रह समजून घेण्यासाठीच नाही तर आपल्या सौर मंडळाच्या पलीकडे असलेल्या ग्रहांचा अभ्यास करण्यासाठी देखील महत्त्वाचे असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. गुरू ग्रहाचा आकार बदललेला नाही, पण तो मोजण्याची आमची पद्धत बदलली आहे. आतापर्यंत गुरू ग्रहाचा आकार आणि आकारमान हे ५० वर्षांपूर्वीच्या 'व्हॉयेजर १ आणि २' तसेच 'पायोनियर १० आणि ११' या मोहिमांनी घेतलेल्या सहा मोजमापांवर आधारित होते. मात्र, २०१६ पासून गुरू ग्रहाचा अभ्यास करणाऱ्या 'जुनो' मोहिमेने गेल्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात रेडीओ डेटा गोळा केला आहे. ◂(वृत्तसंस्था)


### पाठ्यपुस्तके अद्ययावत करण्याची गरज

'नेचर अ‍ॅस्ट्रॉनॉमी' या नियतकालिकेत प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, गुरू ग्रहाच्या सध्याच्या आणि जुन्या मोजमापांमधील फरक जरी कमी असला, तरी यामुळे गुरू आणि त्याच्यासारख्या इतर वायू महाकाय ग्रहांच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास करणे अधिक सोपे होणार आहे. आता पाठ्यपुस्तके अद्ययावत करण्याची गरज आहे, असे इस्त्रायलमधील 'वेइझमन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे शास्त्रज्ञ आणि या अभ्यासाचे सहलेखक योहाई कास्पी यांनी सांगितले. ■

### अभिनेते सुनील थापांचे हृदयविकाराने निधन

♦ **काठमांडू, ७ फेब्रुवारी**

नेपाळी अभिनेते सुनील थापा यांचे शुक्रवारी सकाळी वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले. काठमांडूमधील



थापथली येथील नॉर्विक रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांची प्रकृती बिघडली. रुग्णालयाच्या माहितीनुसार, त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला.

सुनील थापा यांनी नेपाळी आणि हिंदीसह अनेक चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. त्यांनी 'मेरी कॉम' चित्रपटात प्रियंका चोप्राच्या प्रशिक्षकाची तर अलीकडेच प्रदर्शित झालेली'द फॅमिली मॅन ३' या वेब सीरिजमध्ये डेव्हिडची भूमिका साकारली होती. सुनील थापा यांना बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात आणण्यात आले होते. ◂(वृत्तसंस्था)

# राष्ट्र रंगी रंगले मी

स्मरण

**चित्रा जोशी**

बंगलोर निवासी असलेलं राजम्मा नावाचं १०६ वर्षांचं हे पक्व फळ उर्वारुकमिव बंधनात मृत्योमुक्षियमामृतात हे वचन सार्थ करतं झालं. १३ जानेवारीला स्वतःच्या विशाखा या जन्म नक्षत्रावर आणि जन्म तिथीलाच ही कृतार्थ काया अलगद या जगतातून स्थूल शरीर रूपाने काळाच्या पडद्याआड गेली पण स्मृतिरूपानं अनेकांच्या मनात घर करून आहेत. चिरस्मरणात विराजमान आहेत.

१९१९ पौष एकादशीला म्हैसूर येथे लक्ष्मणराव आणि सावित्रीबाई या दाम्पत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील अंमलदार होते. अग्रहार प्राप्त असलेला हा परिवार. राजघराण्यात या परिवाराला सन्मानपूर्वक आमंत्रित केलं जायचं. राजम्मांनाही अनेक पूजांच्या वेळी कन्यापूजनाला आवर्जून बोलावलं जायचं, नटवलं जायचं. त्यामुळे बालपणापासून पूजेची, व्रतवैकल्यांची आवड निर्माण झाली. त्या काळात आठवी ही बोर्डाची परीक्षा होती, त्यात त्या जिल्ह्यातून पहिल्या आल्या. गणित हा त्यांचा प्रिय विषय होता. त्यामुळे हिशेबही त्या तोंडी पटापट करीत. बालवयातच लग्न होऊन त्या सासरी आल्या. तिथेही सर्वांना प्रिय झाल्या. शांताक्कांचे वडील श्री व्यंकटरामय्या हे परम गांधी भक्त. लग्नाचे वेळीच त्यांनी सांगितलं की लग्न करायचं तर खादीच वापरायची. खरं तर दक्षिणेत सिल्क प्रचूर प्रमाणात वापरलं जातं अन् संपन्न परिवारातील त्या वेळपर्यंत रोजच रेशमी वस्त्र घालणाऱ्या राजम्मांनी पती विचारांशी समरस होत, प्रथम अनेक वर्ष खादी व त्यानंतर आजीवन सुतीच कपडे घातले. एकदा गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी आपलं स्त्रीधन समर्पित केलं आणि अनुकूल परिस्थिती असतानाही कधी पुन्हा सोनं घातलं नाही. असं निरासक्त होणं कठीण असतं. घरातील कुल परंपरा सांभाळत, व्रतवैकल्य करीत जीवन पुढे सरकत होतं. या घराचं वैशिष्ट्य असं की ते परमेशा इतकच राष्ट्र रंगातही रंगलं होतं. गंगा यमुना जशा एकमेकांत मिसळून एक वेगळा प्रवाह तयार होतो व तो अधिष्ठान लाभलेला प्रवाह जनतेचे जीवन सुजल सुफल करत जातो तसंच इथे झालं. राष्ट्र सर्वो परी ही भावना मनात खोलवर रुजली. एकदा माननीय भय्याजी जोशी यांच्या घरी गेले असताना आई काही वाचत होत्या. त्यावेळी त्यांनी वयाची नव्वदीही ओलांडली होती. अशा वयात वाचता येणंच अवघड आणि या तर चष्म्याशिवाय वाचू शकत होत्या. भय्याजींना वाटलं की, त्या पोथी वाचत आहेत, पण त्या क्रांतिकारक भगतसिंगांचं चरित्र वाचत होत्या. क्षणकाल भय्याजींनाही आश्चर्य वाटलं. परंतु त्या ज्या काळात वावरल्या त्यावेळी गांधीभक्त पतीच वागणं, घरातलं वातावरण, होणाऱ्या चर्चा, क्रांतिकारकांचे जीवन, त्यांना होणाऱ्या शिक्षा, वेळोवेळी होणारी आंदोलनं हे सारं सजगतेनं अनुभवणं त्यामुळे त्यांचं मनही राष्ट्र रंगी रंगलं ते कायमचं. 'देश हा देव असे माझा' हा भाव दृढ होत गेला आणि त्यामुळे वाचनात असू दे वा गोष्टी सांगताना, त्या देशभक्त कथाच सांगत. भगिनी निवेदितांचं म्हणणं की, देश आणि देव यांत देश आहे हे विसरू नका, हे त्यांनी स्वीकारलं, अंगीभूत केलं. परिणामतः

**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ॥**
**परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥**

घरात चळवळीचं सामर्थ्य आणि साम्राज्य नांदू लागलं. राजम्मांची तीन मुलं श्री नागराज (पूर्व दक्षिण क्षेत्र संघ चालक), मंजुनाथन (प्रांत शारीरिक शिक्षण प्रमुख) आणि शांताक्का प्रांत कार्यवाहिका नंतर प्रमुख संचालिका असे या देशाला गौरवमय पद प्राप्त करून देण्याचं व्रत घेतलेल्या तिघांच्या रूपाने घरात देशभक्तीच्या लहरी लहरू लागल्यात.

**राष्ट्र हीच प्राथमिकता :** मंजुनाथन यांची मुलगी कर्नल तेजस्मिता आणि नातं जावई कर्नल तरुण यांच्या रूपान देशभक्तीची एक वेगळी धारा घरात प्रवेश करती झाली. तिसरी पिढीही त्याच रंगात रंगली. हे एक समाधान आणि आनंद होतं. तेजस्मिता सांगते, ''आम्ही जेवायला बसलो की आजी आम्हाला रोज गोष्टी सांगायची; कधी महाभारत, कधी सावरकर तर कधी मदनलाल. त्यामुळेच की काय उसळत्या रक्तात मा ज्वालामुखाचा दाह दे अशी तेजूची स्थिती झाली.'' तेजस्मिता प्रवीण वर्ग राष्ट्रसेविका समितीची तृतीय वर्ष प्रशिक्षित आहे. ती नृत्यही उत्तम करायची. तिचं अरंगेत्रमही झालं, पण सैन्यात जायचं हे स्वप्न होतंच. ते पूर्ण झालं ही घरातल्या सगळ्यांकरिताच आनंदाची बाब होती. तेजूचं प्रशिक्षण पूर्ण झालं, खरं तर ती नृत्य विशारद. त्यामुळे नृत्य कार्यक्रमाचे वेळी लांब केस त्याला गोंडा ही अनिवार्यच. पण अशीही तेजू एकावेळी घरी आली तर बॉयकट केलेला. तिला पाहिल्यावर आजीला काय वाटलं असेल... त्या शंभरीच्या जवळ आलेल्या आजींच्या दृष्टीने केस कापणं हे अक्षम्यचं.. पण शांतपणे त्या म्हणाल्या, ''तिनं जे व्रत, जो पेशा अंगीकारला आहे त्याच्या दृष्टीने जे काही करणं आवश्यक असेल ते तिला करायलाच हवं. तिथली जी शिस्त असेल तसंच वागावं लागेल. तिथे भावनांना महत्त्व देऊन कसं चालेल?'' तिनं फॅशन म्हणून ते केलं नाही हे समजून घेणे हे नव्वदी उलटल्यानंतर विशेष नाही का? आमच्या वेळचं असं काही न उगाळता हे देशाच्या हिताकरिता आहे हे त्यांनी समजून घेतलं ते वैचारिक अधिष्ठानाच्या आधारावर आणि त्यामुळेच की काय १९७५ ते १९७७ च्या आणिबाणी काळातही त्या पोलिसांच्या ससेमिऱ्याला समर्थपणे तोंड देऊ शकल्या. दोन्ही मुलं नागराज आणि मंजुनाथन संघ स्वयंसेवक. त्यामुळे अधिकाऱ्यांचं घरी नित्य जाण-येणं असे. अनेकांच्या त्या आईच बनल्या, हक्काने 'मन की बात' सांगायचं ते एक स्थान होतं. क्वचित ती खाण्यापिण्याची आवड असेल तर कधी पारिवारिकही असायचं. आणिबाणीत तर भूमिगत असलेले अनेक जण निवासाला, बैठकी घ्यायला येत. घरी माननीय शेषाद्रीजी, यादवराव जोशी सुरक्षित स्थान म्हणून इथेच बैठकी घेत. त्यावेळी व्यंकटरामय्याजी अर्धांगवायूमुळे निजून असत. मुलगी शांताकुमारी जयदेवजींची बहीण म्हणून कारागृहात दर पंधरा दिवसांनी भेटायला जात. आतले निरोप बाहेर व बाहेरचे आत पोहोचवणे हे महत्त्वाचं काम असे. अशा काळात जवळजवळ १८ वेळा तरी घरी पोलिस चौकशीला आले. एकदा आले की तास दोन तास चौकशी चालायची. एकदा राजम्मांनी त्यांना सांगितलं, ''अहो, तुम्ही कितीही प्रकारांनी विचारलं तरी मी कोणीही आलं नाही हेच सांगणार. असं बघा माझे यजमान आजारी आहेत. मला त्यांना काय हवं, नको ते सतत बघायला लागतं, मी त्यांच्याकडे लक्ष द्यायचं की इथे पुन्हा पुन्हा तेच सांगत राहायचं.''



एकदा तर एक महत्त्वाची व्यक्ती घरात आली होती. थोड्याच वेळात पोलिसही हजर. राजम्मांनी त्यांना वारंवार सांगितलं की, कोणी नाही घरात. पण ते पुन्हा पुन्हा विचारत राहिले. शेवटी राजम्मांनी त्यांना सांगितलं, मी माझ्या मुलांची शपथ घेऊन सांगते की आमच्या घरात कोणी नाही. हे अधिकारी जरा वेगळ्याच स्वभावाचे होते, त्यांनी वर्तमानपत्राचं एक कात्रण काढलं, ते राजम्मांना दाखवलं. अपघातात क्षतविक्षत झालेल्या माणसाचं छायाचित्र होतं. ते म्हणाले, ''तुम्ही खोटी शपथ घेतली असेल तर तुमच्या मुलांची अशी स्थिती होईल.'' राजम्मांचा चेहरा निर्विकार होता. कोणत्याही भीतीचं चिन्ह त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं नाही, तेव्हा या बोलतात ते खरं असावं हे समजून ते निघून गेले. मी खोटं बोलले असले तरी ते देशाकरिता, सज्जनशक्ती रक्षणार्थ बोलले आहे, आजच्या घटकेला हे देवकार्यच आहे, माझ्या मुलांवर काहीही परिणाम होणार नाही हा ठाम विश्वास त्यांच्या मनात होता. 'लाख मरो लाखांचा पोशिंदा जगो' या उक्तीप्रमाणे भूमिगतला वाचवणं याला त्यांनी दिलेली प्राथमिकता हे त्यांच्या सुदृढ मानसिकतेचे प्रतीक आहे. तसंच पोलिस निघून गेल्यावर, त्या पोलिसांनी विचारलेले प्रश्न व त्याला त्यांनी दिलेली उत्तर लिहून काढून संबंधितांना देत. त्यामुळे संघ अधिकाऱ्यांनाही पोलिस खातं काय विचार करतंय, त्यांचे आराखडे काय आहेत याचा अचूक अंदाज येऊन कार्यदिशा ठरवायला मोलाची मदत होत असे. त्या काळात पोलिसांनी काही बंदींचा विलक्षण छळ केला. या सर्व गोष्टींची कल्पना असूनही त्यांनी दाखवलेलं धैर्य हे निश्चितच आश्चर्यकारक आहे. अधिष्ठान पक्कं असलं की व्यक्ती कशी खंबीर बनते याचं हे जिवंत उदाहरण आहे. रामजन्मभूमी आंदोलनाच्या वेळी तिघांनीही कारसेवेला जायचं ठरवल्यावर, ''एक जण थांबा'' असं त्या म्हणाल्या नाहीत.

**सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा :** यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी २०२३ ला त्या मतदानाला बुथवर जाऊन आल्या. मी मतदान केंद्रावर जाऊ शकते, घरी करणार नाही असं म्हणत त्या केंद्रावर गेल्या. १०३ वर्षांच्या, शंभरी पार केलेली व्यक्ती बुथवर येणं हे उत्साहाची लहर निर्माण करणारं ठरलं. जीवेत शरदः शतम हा आशीर्वाद सार्थ करणाऱ्या, चालत येणाऱ्या आजी सर्वांकरिताच एक अप्रूप होतं. कोणीतरी गमतीनं विचारलं, ''आजी, कशावर ठप्पा मारला?'' ''मतदान गुप्त असतं'', आजी उत्तरल्या. त्यांचं वय, त्यांचं ठामपणे बोलणं यामुळे वार्ताहर, फोटोग्राफर, बाईट घेणारे सारेच पुढे सरसावले. ''आजी तुमचा काय संदेश आहे?'' एकान विचारलं. ''सर्वांनी आणि तरुणांनी घराबाहेर पडून मतदान करावं, आपला हक्क बजवावा, आपले नागरिक कर्तव्य पूर्ण करावे.'' उस्फूर्तपणे अविलंब आलेलं त्यांचं उत्तर सर्वांनाच आश्चर्यचकित करून गेलं. कुणी त्यांच्या कानात सांगितलं किंवा प्रॉम्प्टिंग केलं असं नाही. त्यांची प्रज्ञा त्या क्षणीही जागृत होती.

**कर्मयोग हीच शक्ती :** त्यांचं घर बंगलोरला गार्डन परिसरात आहे. आजच्या भाषेत 'हार्ट ऑफ द सिटी' असं आहे. तिथून निमहान्स हे मनोरुग्णांकरिता असलेलं तसेच एक कॅन्सर हॉस्पिटल जवळच आहे. त्यामुळे नेहमीच कुणा ना कुणाकरिता डबे या घरातून जात. कधी रुग्णाचे नातेवाईक निवासाला असत. कधीकधी महिना अन् महिना राहत, पण त्या सर्वांचं आनंदानं करत. हे सातत्याने चालू असे पण विशाल परिवाराच्या आईला ते अवघड गेलं नाही. त्या अतिशय सुगरण होत्या. पोपटीचे दाणे घालून डोसे अतिशय उत्तम बनवत. कुणी कितीही सकाळी बाहेर पडलं तरी त्यांनी खाऊनच निघलं पाहिजे हा घराचा दंडक होता. त्यामुळे आलेली व्यक्ती तृप्त होऊनच बाहेर पडायची, पण त्याकरिता त्या माउलीने केलेला कर्मयोग विलक्षण आहे. कर्मयोगच त्यांची शक्ती होती व त्यातच त्यांची तृप्तीही होती. घरात केलेलं सांबार, भात, भाजी असं एकत्र कालवून त्यांनी दिलेल्या मातृहस्तेन घासाची भोजनाची आठवण त्यांच्या घरी येणाऱ्यांच्या मनात आजही ताजी आहे. त्याचा उल्लेख अन्त्यदर्शनाला आलेल्या अनेकांनी केला. त्या सकाळी शांत झाल्या. अल्पावधीतच त्यांच्या निधनाची बातमी कर्णोपकर्णी होऊन अनेक गणमान्य लोक अन्त्यदर्शनाला आले, मग ते येदुयरप्पांपासून तर निमहान्स इस्पितळाच्या डॉक्टरांपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत. सर्वांची एकच वेदना होती आई गेल्याची. निमहान्सचे डॉ. गंगाधर पूर्णवेळ तिथेच उपस्थित होते.

**प्रेमस्वरूप आई वात्सल्यसिंधू आई :** त्या खरोखरच अनेकांची आई होत्या. लहानपणीस मातृवियोग झालेल्या छोट्या वसंता स्वामीला हे घर आपलंच वाटायचं. राजम्मा तिच्या घरी तिची आई असताना हळदी कुंकवाला वगैरे जात असत. त्या तिला समजावीत, अगं तुझी आई देवीचं नेहमी सगळं खूप व्यवस्थित श्रद्धेने करायची, त्यामुळे तृतीयेला गौरीच्या दिवशी ती सवाष्ण गेली. पुढेही वसंता आक्काचे लग्न झाल्यावर आईसारखंच तू सगळं नीटनेटकं कर असं आग्रहानं तिला सांगितलं. वसंत आक्कांची आता सत्तरी झाली आहे, तिला आता नातं, नातू झाले असले तरी, मला तू तेवढीच लहान वाटते असं म्हणून जवळ घेत. तिच्या डोक्यावरून हात फिरवीत.

**तिला शिकू द्या :** समितीच्या बंगलोरच्या एक अधिकारी बाल विधवा झाल्या. माहेरीमाघारी आल्या. संपन्न घर होतं. आर्थिक चिंता त्या मुलीला कधी करावी लागणार होती असं नाही. त्यामुळे तिला पुढे शिकवावं असं फारसं घरच्यांच्या मनात आले नाही. एकुलत्या एका मुलीवर आकस्मिक अकाली आलेलं हे संकट, सर्वच दिगमूढ झालेले. अशावेळी व्यंकटरामय्याजी आणि राजम्मा त्यांच्या घरी गेले आणि तिला घरात बसवू नका, तिला शिकू द्या. तिला त्याची आवड आहे असे सांगितले आणि तिचं शाळेत जाणं सुरू झालं. एका कॉलेजच्या प्राचार्य म्हणून त्या निवृत्त झाल्या. त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक मुलींचे जीवन उजळले पण त्या बालकलिकेचं जीवन उजळलं ते व्यंकटरमय्या आणि राजम्मा यांच्यामुळे. कदाचित स्वतःचं अपूर्ण राहिलेलं शिक्षण त्या वेदनेनेही राजम्मांना एवढं आग्रही बनवलं असेल.

घरातही राजम्मा आणि मंजुनाथन यांच्या पत्नी सुमा वहिनी यांचे संबंध सुमधुर होते. सुमा वहिनी आजारी झाल्या. आईला सहन होणार नाही म्हणून कुणी त्यांना तिच्या आजाराची कल्पना दिली नाही. सुनेला वाटायचे त्यांना दुःख नको आणि आईला वाटायचं, ही खात पीत नाही, आपली तिला मदत नाही. नात सुनेवर अंबिकेवर भार येतो आणि त्यामुळे सोवळंही थोडं शिथिल झालं. दोघीही एकदुसरीची चिंता करत.

२०१९ मध्ये नातीन तेजस्मितानं विवाह निश्चित केला. तेजस्मिता आता एम. तेजस्मिता तरुण झाली. तेही आर्मीतच आहे. तो गुणी आहे हे प्रथम भेटीतच त्यांना त्याच्या व्यवहारातून जाणवलं आणि जावई सुंदर तसा गुणी आहे याचं समाधान त्यांनी व्यक्त केलं. तो याच विचारांचा, याच शिस्तीतला. दोघेही एकाच विचारांचे त्यामुळे तिला तिचं काम निर्वेधपणाने करता येईल. करीअर विथ कॅरेक्टर ती करू शकेल असा विश्वास त्यांना आला. तो त्यांनी व्यक्त करून दाखवला. सत्येनचा मुलगा चार वर्षांचा अगस्त्य यालाही सारखी येता जाता पणजीच हवी असायची. रोज तिच्याशी खेळायचं, गोष्ट ऐकायची, तिला चालवायचं, तिच्या मांडीवर बसून दूध प्यायचं, तासन्तास ते दोघे एकमेकांशी खेळत.

१२ जानेवारीला एक कार्यक्रम ठरला होता. अनेकांनी १०६ वर्षांची व्यक्ती बघितलीच नव्हती आणि तीही स्वतःचं सर्व काही करू शकणारी. त्या दिवशी कोणी धावत तर कोणी चालत, कुणी सायकलवर असं त्यांच्या घरी यायचं, आईशी संवाद साधायचा आणि मग जायचं पण आईला दिनांक दहालाच दवाखान्यात न्यावं लागलं. सर्व जण आले होते. कॉफी अल्पाहार झाला पण आईला भेटता आलं नाही. इन्फेक्शनचं छोटसं निमित्त झालं. ११ ला शांताक्का पोहोचल्या. बाराला तेजू, तरुण. सर्वांना त्यांनी ओळखलं. सर्व चौकशी केली. त्यांच्या अंतिम रात्री दिनांक बाराला तेजस्मिता-तरुणच त्यांच्या जवळ होते. एकेक अवयव शिथिल होत होता. अंतिम क्षण जवळ आला असल्याचं लक्षात घेताच जवळच घरी असलेल्या सर्वांना त्यांनी बोलावून घेतलं. गंगा मुखी घेत, रामनाम ऐकत त्यांनी एकादशीच्या दिवशी वैकुंठ गमन केलं. दर्शनाला येणारा प्रत्येक जण फुलं, तुळशी, चंदनमाला घेऊन येत होता. त्यांच्या भावना त्यातून व्यक्त होत होत्या. फुलं सांगत होती, प्रेमाचा, वात्सल्याचा, राष्ट्रभक्तीचा सुगंध, तर चंदनमाला त्यांच्या त्यागाच्या गाथेचं प्रतीक होतं अन् तुळशीमाला समर्पण, पवित्रतेचं प्रतीक. मातीचा सुगंध मातीत मिसळला, तिच्याशी एकरूप झाला. आता उरल्या आहेत त्या केवळ आठवणी.

(अ. भा. सह कार्यवाहिका, राष्ट्र सेविका समिती)

---

रविवारची पत्रे

## समर्थ रामदासांचे जीवनकार्य, पंचपरिवर्तनाचा मूळ गाभा

सतराव्या शतकातील महाराष्ट्र हा राजकीय अस्थिरता, सामाजिक नैराश्य आणि परकीय आक्रमणांच्या छायेखाली वावरत होता. अशा अत्यंत प्रतिकूल कालखंडात समर्थ रामदास स्वामींनी आपल्या प्रखर विचारसरणीतून आणि कृतीतून समाजाला एका नव्या चैतन्याची दिशा दिली. समर्थांचे जीवनकार्य केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते, तर ते राष्ट्रनिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेशी जोडलेले होते. त्यांच्या वाङ्मयातील 'दासबोध', 'मनाचे श्लोक' आणि इतर स्फुट रचनांमधून या मूल्यांचा उगम आणि विस्तार झालेला दिसून येतो.

समर्थ रामदास स्वामींचा जन्म जालना जिल्ह्यातील जांब या गावी १६०८ मध्ये रामनवमीच्या दिवशी झाला. त्यांचे मूळ नाव नारायण सूर्याजी ठोसर होते. लहानपणापासूनच नारायण अत्यंत चिंतनशील आणि उपजत बुद्धिमत्ता असलेले बालक होते. त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी पहिली महत्त्वाची घटना म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी विवाहाच्या प्रसंगी 'सावधान' हा शब्द ऐकताच त्यांनी मांडवाबाहेर काढलेली धाव होय. प्रपंचात अडकण्याऐवजी समाजाच्या कल्याणासाठी स्वतःला झोकून देण्याची ही त्यांची पहिली जाणीवपूर्वक कृती होती.

त्यानंतरची बारा वर्षे त्यांनी नाशिकजवळील टाकळी येथे अत्यंत कडक तपश्चर्या, साधना आणि व्यायामात व्यतीत केली. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांना आत्मसाक्षात्कार झाला आणि त्यांनी 'रामदास' हे नाव धारण केले. त्यांच्या जीवनाचा पुढचा टप्पा म्हणजे बारा वर्षांची भारतभ्रमण यात्रा, ज्यामध्ये त्यांनी संपूर्ण भारतवर्षाची सामाजिक, राजकीय आणि धार्मिक स्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. या प्रवासात त्यांना परकीय सत्तेखाली दडपल्या गेलेल्या समाजाचे विदारक दर्शन झाले, ज्यातून 'महाराष्ट्र धर्माची' आणि पर्यायाने राष्ट्रोद्धाराची संकल्पना विकसित झाली.

त्याकाळी समाजात पसरलेल्या दैववादाला समर्थांनी प्रखर विरोध केला आणि त्याऐवजी 'प्रयत्नवादाची' स्थापना केली. समर्थांनी 'यत्नदेव' ही संकल्पना मांडली, ज्यानुसार प्रयत्न हाच परमेश्वर आहे. नशिबाच्या रेषा माणसाने स्वतःच्या कष्टाने पुसून काढल्या पाहिजेत, असे ते सांगत. दासबोधामध्ये त्यांनी आळसाचे अत्यंत विदारक वर्णन केले असून, आळस हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू असल्याचे प्रतिपादिले आहे. स्व-आधारित जीवनासाठी माणसाने प्रथम स्वतःच्या अवगुणांचे निरीक्षण केले पाहिजे आणि ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. जोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या दोषांवर विजय मिळवत नाही, तोपर्यंत ती समाज परिवर्तनासाठी पात्र ठरत नाही. 'मनाचे श्लोक' या माध्यमातून त्यांनी मानवी मनावर संस्कार करण्याचे काम केले. मनातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंना जिंकल्याशिवाय स्व-आधारित आणि संतुलित जीवन जगता येत नाही, हा संदेश त्यांनी २०५ श्लोकांमधून दिला. महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती लक्षात घेता समर्थांनी पाण्याचे महत्त्व विशद केले. पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी शोष खड्डे बनवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि नद्यांचे प्रदूषण रोखणे या गोष्टींना त्यांनी प्राधान्य दिले. झाडे लावणे आणि ती जगवणे यातील फरक त्यांनी स्पष्ट केला; केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर त्यांचे संगोपन करणेही गरजेचे आहे. समर्थांनी संन्यासवादापेक्षा गृहस्थाश्रमाला अधिक महत्त्व दिले. आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका या उक्तीतून त्यांनी प्रपंच आणि परमार्थाचा सुंदर समन्वय साधला. समर्थांनी शिवाजी महाराजांच्या कार्याला जोडून घेताना विविध समाजघटकांना एकत्रित केले. मावळा, शेतकरी, कारागीर या सर्वांना त्यांनी स्वराज्य आणि स्वधर्माच्या प्रेरणेने एकत्र आणले. दासबोध हा समर्थांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ असून तो संवादात्मक शैलीत लिहिलेला आहे. या ग्रंथात अध्यात्मासोबतच राजकारण, समाजकारण, व्यवस्थापन आणि नागरी कर्तव्यांचे सखोल विवेचन आहे. समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या जीवनातून आणि साहित्यातून जे विचार मांडलेत ते आज आपण अनुभवीत असलेल्या पंचपरिवर्तन संकल्पनेचा मूळ गाभा वाटतो. ते कोणत्याही एका काळापुरते मर्यादित नाही. त्यांचे 'स्व-आधारित जीवन' आजच्या स्पर्धेच्या युगात स्वावलंबनाचा मंत्र देते. त्यांचे 'पर्यावरण' विचार जागतिक तापमान वाढीच्या संकटात दिशा दाखवतात. 'कल्याणकारी कुटुंब संस्कृती' आधुनिक विखुरलेल्या कुटुंबांना जोडण्याचे काम करू शकते. 'नागरी कर्तव्य' हे सशक्त लोकशाहीचा पाया आहे आणि 'सामाजिक समरसता' ही देशाच्या अखंडतेसाठी अनिवार्य आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

## वरिष्ठ नागरिक परिसंघ : ज्येष्ठांना दिलासा देणारी संघटना

भारतीय मजदूर संघद्वारा संचालित वरिष्ठ नागरिक परिसंघाचा ७ फेब्रुवारीला वर्धापन दिवस असतो. त्यानिमित्त देशभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यात प्रामुख्याने स्वास्थ्य चिकित्सा शिबिर, संगोष्ठी, प्रशिक्षण वर्ग आदी कार्यक्रमांचा समावेश असतो. मूळ उद्देश समाजातील ज्येष्ठ नागरिकांना संघटित करणे, त्यांच्या समस्या समजून घेत त्यावर उपाययोजना करणे हे आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मूळ समस्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल. पारिवारिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि सर्वांत मोठी आणि नित्य नियमाने भेडसावणारी समस्या आहे एकटेपणा. एका सर्वेक्षणानुसार वरील समस्याग्रस्त ज्येष्ठ नागरिकांची संख्या जवळपास ६८ टक्के आहे. डिसेंबर २०२५ अखेर भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.९० कोटी होती. त्यात ६८ टक्के मानसिक रुग्ण असतील तर ती चिंतेची बाब आहे. सीनिअर सिटिझन्स प्रोटेक्शन ॲक्ट २००७ अंतर्गत देशातील न्यायालयात ७ कोटी प्रकरणे प्रलंबित असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. यावरून या विषयाची तीव्रता लक्षात येऊ शकते. केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्या अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान केली जात आहे. पण त्यात अडथळे अधिक आहेत. त्यावर उचित मार्गदर्शन आणि उपाययोजना करण्याचे काम वरिष्ठ नागरिक परिसंघ करीत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पेन्शनचे पुनर्निर्धारण करण्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे पण ते कासवाच्या गतीने. त्यामुळे लाखो निवृत्तिधारकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. भविष्य निधी कार्यालयाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ५ लाखापर्यंत गंभीर स्वरूपाच्या आजारात मोफत उपचार करण्याची तरतूद आहे. त्याकरिता नॅशनल हेल्थ अथॉरिटीने परिचय कार्ड दिले आहे. पण संकटकाळी या कार्डचा उपयोग होत नाही. उलट आधी पैसे भरा मग ट्रीटमेंट ही स्थिती अनुभवाला येत आहे. भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या तीव्र गतीने वाढत आहे. त्या बरोबर समस्या देखील वाढत आहेत. परिवार आणि समाजात योग्य मानसन्मान, समान वागणूक मिळत नाही अशा तक्रारी बऱ्याच आहेत. त्यात प्रामुख्याने ते ज्येष्ठ नागरिक आहेत ज्यांची आर्थिक स्थिती नाजूक आहे. दुसऱ्यावर पूर्णपणे विसंबून आहेत. लाखो ज्येष्ठ नागरिक असे आहेत ज्यांना पेन्शन मिळत नाही. दुसरा आर्थिक स्रोत नाही. डॉ. मोहिनी गिरी आयोगाने केंद्र सरकारला फेब्रुवारी २०११ ला सादर केलेल्या अहवालात सर्वांना पेन्शन देण्यात यावी अशी शिफारस केली आहे, पण त्यावर केंद्र सरकारने अजूनपर्यंत कार्यवाही केली नाही. ते अहवाल थंड्याबस्त्यात पडला आहे. त्यामुळे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांची स्थिती न घरका ना घाटका अशी झाली आहे.

वरिष्ठ नागरिक परिसंघ वरील सर्व समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न गेल्या १० वर्षांपासून करीत आहे. त्याकरिता ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येण्याची गरज आहे. सामूहिक प्रयत्न झालेत तर अपेक्षित यश निश्चित मिळेल. ज्येष्ठ नागरिकांसाठी वरिष्ठ नागरिक परिसंघाचे व्यासपीठ खुले आहे. त्यांनी त्याचा उपयोग करावा. ज्येष्ठ नागरिकांच्या सुख-दुःखात वरिष्ठ नागरिक परिसंघ बरोबरीचा वाटेकरी आहे.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## श्री दुर्गा सप्तशती : एक अलौकिक ग्रंथ

श्री दुर्गा सप्तशती हा भारतीय आध्यात्मिक परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा, अलौकिक आणि शीघ्र फलदायी ग्रंथ मानला जातो. देवी उपासनेमध्ये या ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण असून, श्रद्धा, तत्त्वज्ञान आणि साधना यांचा सुंदर संगम यात आढळतो. श्री मार्कंडेय ऋषींनी रचलेला हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून अनुष्टुप छंदात रचित आहे. सातशे मंत्रांचा समावेश असल्यामुळे या ग्रंथास 'सप्तशती' असे नाव प्राप्त झाले आहे. लयबद्ध पठन केल्यास पठन करणारा तसेच ऐकणारा यांना एक विशेष प्रकारचा आध्यात्मिक आनंद अनुभवास येतो.

या ग्रंथाची कथा राजा सुरथ, समाधी नावाचा वैश्य आणि मेधा ऋषी यांच्या संवादातून उलगडत जाते. युद्धात पराभूत झाल्याने राज्य गमावलेला राजा सुरथ आणि पत्नी व मुलांनी धनाच्या लोभामुळे घरातून हाकलून दिलेला वैश्य समाधी हे दोघेही मेधा ऋषींच्या आश्रमात आश्रयास येतात. आश्रमात राहत असतानाही त्यांच्या मनात सतत संसाराचे, कुटुंबाचे विचार येत राहतात. मोहावर नियंत्रण मिळत नसल्याने ते या स्थितीचे कारण मेधा ऋषींना विचारतात. तेव्हा मेधा ऋषी स्पष्ट करतात की हा सर्व प्रभाव महामायेचा आहे. संसाराची निर्मिती, त्याचे संचालन आणि त्यातील आसक्ती हे सर्व महामायेच्या प्रभावामुळेच घडते. ज्ञानी व्यक्तींनाही तिच्या प्रभावातून पूर्णपणे सुटका होत नाही, असे ऋषी सांगतात.

**तथापि ममतावर्ते मोहगर्ते निपातिताः।**
**महामायाप्रभावेण संसारास्थितिकारिणा ॥**
**ज्ञानिनामापि चेतांसि देवी भगवती हि सा।**
**बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ॥**

(अध्याय १ - श्लोक ५३,५५)

यानंतर महामायेचे स्वरूप, तिची उत्पत्ती आणि कार्य याविषयी सविस्तर विवेचन येते. देवी नित्यस्वरूप असली तरी देवांनी संकटसमयी केलेल्या प्रार्थनेमुळे ती विविध रूपांत प्रकट होते. दुर्गा सप्तशतीमध्ये एकूण तेरा अध्याय असून त्यात श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती यांच्या अवतारकथा वर्णिल्या आहेत.

महिषासुराचा वध करणारी अष्टादशभुजा श्री महालक्ष्मी, ब्रह्मदेवांच्या प्रार्थनेतून प्रकट झालेली दशभुजा श्री महाकाली आणि शुंभ-निशुंभादी दैत्यांच्या त्रासामुळे देवांनी केलेल्या प्रार्थनेतून प्रकट झालेली अष्टभुजा श्री महासरस्वती या तिन्ही शक्तींचे स्वरूप, पराक्रम आणि महत्त्व या ग्रंथात सविस्तरपणे मांडले आहे.

आपण ज्यांना श्रेष्ठ देव व देवि मानतो अशा श्री ब्रह्मा, श्री विष्णू व श्री महेश तसेच श्री सरस्वती, श्री. लक्ष्मी व श्री गौरी यांची उत्पत्ती श्री महालक्ष्मी, श्री महाकाली व श्री महासरस्वती यांनीच केली व त्यांचे विवाहही त्यांनीच लावून दिले अशा अर्थाचे विवेचन प्राधानिक रहस्यांत आलेले आहे.

सप्तशती पाठाचे तीन-चार प्रकार आहेत. पण एक सहा अंगांचा पाठ व एक संपुटीत पाठ हे जास्त प्रचलित आहेत. संपुटीत पाठ म्हणजे आपण जो मंत्र निवडू तो मध्यभागी आधी ऋचा व नंतर तीच ऋचा, याला ४/५ तास लागतात पण याचे फळही शीघ्र मिळते. नवचंडी, शतचंडी, सहस्रचंडी अशीही पाठांची अनुष्ठाने आहेत.

व्यक्तिगत जीवनातील चिंता, आर्थिक अडचणी, विवाह, न्यायालयीन प्रकरणे अशा अनेक समस्यांवर उपाय सुचवणारा हा ग्रंथ श्रद्धाळूंना मानसिक बळ आणि आत्मविवास प्रदान करतो. म्हणूनच दुर्गा सप्तशती हा केवळ धार्मिक ग्रंथ न राहता, श्रद्धा आणि जीवनदृष्टी देणारा दिव्य ग्रंथ ठरतो.

**जयवंत लक्ष्मण धबाब**/७०४५८३३५२०


---

# श्री संत गजानन महाराज समाजोपयोगी जीवनाचा वारसा

प्रासंगिक

**दीप्ती राखुंडे**

श्री संत गजानन महाराज अद्वितीय अवतारी पुरुष होते. ते फक्त हातचलाखी करून चमत्कार दाखविणारे संत नव्हते, तर त्यांच्या जीवनाचा प्रत्येक पैलू समाजासाठी, लोककल्याणासाठी आणि आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी समर्पित होता. महाराजांनी आपल्या योगसिद्धीच्या माध्यमातून जे कार्य केले, ते माणसाच्या बुद्धीला समजेल असे नव्हते. त्यातील अनाकलनीय आणि अद्भुत कृती सामान्य लोकांना चमत्कार म्हणून दिसत होत्या. काही पोथ्यांच्या उल्लेखांनुसार, गजानन महाराज हे दिगंबर पंथीय योगपुरुष होते. श्री गजानन महाराज (शेगाव) आणि श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) हे दोघेही महाराष्ट्रातील परमहंस संन्यासी आणि दत्त अवतार मानले जातात. शेगावला प्रकट होण्यापूर्वी गजानन महाराजांनी स्वामी समर्थांच्या सान्निध्यात काही काळ व्यतीत केला होता. त्यांच्या शिकवणीचा वारसा पुढे नेण्याचा त्यांनी प्रण केला होता. ते साईबाबा, जंगली महाराज, बाबा ताजुद्दीन यांसारख्या समकालीन संतांसमवेत कार्यरत होते. या संतांचा उद्देश लोकांना योग्य मार्गावर नेणे आणि धर्म, श्रद्धा, नैतिकता आणि समाजोपयोगी मूल्यांची शिकवण देणे हा होता.



**न्याय, लोककल्याणासाठी कार्य :** महाराजांनी अनेक प्रसंगांमध्ये आपल्या योगसिद्धीच्या शक्तीने अशा अनाकलनीय कार्यांचे दर्शन घडविले की, लोक त्यांना चमत्कार मानत. एकदा उन्हाळ्यात महाराजांना तहान लागली. त्यांनी भास्कर पाटील या शेतकऱ्याकडे पाणी मागितले. त्याने देण्यास नकार दिला आणि विचारले की, जर तुम्ही खरंच अवतारी आहात, तर या कोरड्या विहिरीला पाणी आणून दाखवा. महाराजांनी गंगा, यमुना आणि सरस्वतीचे नाव घेतले आणि त्या कोरड्या विहिरीतून पाण्याचे झरे वाहू लागले. तसेच महाराजांनी सुकलेल्या आंब्याच्या झाडाला क्षणात हिरवेगार करून दाखविले. हे हातचलाखीने शक्य नाही. लोकमान्य टिळकांच्या कार्यक्रमात महाराजांनी प्रसंगानुरूप मार्गदर्शन केले. टिळकांना ब्रिटिश सरकारकडून न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. टिळकांच्या खटल्यात त्यांची मदत अप्रत्यक्ष पण निर्णायक ठरली. यामुळे सिद्ध होते की महाराजांचे कार्य फक्त लोकांना मंत्रमुग्ध करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते समाजातील न्याय, धर्म आणि लोककल्याणासाठी होते.

**शेगाव आजही आदर्शाचे केंद्र :** महाराजांनी समाजोपयोगी कार्यात कोणताही स्वार्थ न ठेवता, फक्त लोककल्याणासाठी आपल्या योगसिद्धीचा उपयोग केला. त्यांनी जिवंतपणीच आपल्या समाधीची वेळ आणि स्थान निश्चित केले. समाधी घेतल्यानंतर त्यांचे शरीर आंतरिक योगऊर्जेने उष्ण राहिले, तर काही लोकांनी त्यावर संशय घेतला तरी महाराजांनी प्रकटपणे योगशक्तीचे अद्भुत दर्शन घडविले. त्यांनी पूर आलेल्या नदीतून होडीला हात लावून किनाऱ्यावर आणणे, जळत्या पलंगावर बसणे, मधमाश्यांचे काटे बाहेर काढणे, उसाची मोळी पिळणे आणि पुरोहितांना गीतेतील क्लिष्ट अध्याय अर्थासह सांगणे यांसारख्या अनेक अकल्पनीय कृती केल्या. महाराजांचे कार्य फक्त धार्मिक किंवा आध्यात्मिकच नव्हते; त्यांनी समाजातील लोकांना रोजगार, संस्कार आणि आध्यात्मिक मार्गदर्शन दिले. शेगाव संस्थान हे आजही त्यांच्या शिकवणीचा, योगसिद्धीचा समाजोपयोगी दृष्टिकोनाचे आदर्श केंद्र आहे. संस्थानात स्वच्छता, प्रामाणिकपणा, पारदर्शक प्रशासन, सामाजिक विकास आणि धार्मिक कार्य यांचे उत्तम उदाहरण दिसते.

**महाराजांच्या मूल्यांचा अवलंब करा :** गजानन महाराज हे आपल्या जीवनातून दाखवतात की श्रद्धा, धर्म आणि समाजोपयोगी कार्य एकत्रित असावे. त्यांनी फक्त लोकांना भक्ती करण्यास शिकविले नाही, तर जीवनात नैतिकता, सेवा, सहकार्य आणि ज्ञान यांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या शिकवणीमुळे आणि कार्यामुळे शेगाव संस्थान आज संपूर्ण भारतात आदर्श ठरले आहे, आणि हजारो लोकांना प्रेरणा देत आहे. गजानन महाराजांचा वारसा ही एक अमूल्य संपत्ती आहे. त्यांनी धर्म, योगसिद्धी, समाजोपयोगी कामे आणि नैतिक शिक्षण यांचा समन्वय साधून भारतीय समाजाला दिशा दाखवली. आजही त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव प्रत्येक कार्यक्षम, प्रामाणिक आणि समाजसेवी संस्थेत दिसतो. त्यांच्या जीवनाचे आणि कार्याचे स्मरण करून प्रत्येक जण जीवनात श्रद्धा, सेवा आणि न्याय या मूल्यांचा अवलंब करू शकतो हे नक्की.

**गण गण गणात बोते!**

९५०३९१०८२२

---

## स्त्रीशक्तीचा खरा अर्थ सांगणारी जानकी जयंती

माघ महिन्यातील वद्य पक्षातील नवमी तिथीला जानकी जयंती साजरी केली जाते. मुख्यतः उत्तर भारतात हा दिवस विशेष श्रद्धेने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे माता सीतेचा (जानकी मातेचा) जन्मोत्सव! या दिवशी अनेक स्त्रिया अखंड सौभाग्यासाठी, सुख-समृद्धीसाठी व्रत करतात. त्याग, शील, संयम आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे सीता माता! प्रभू श्रीरामांशी विवाह झाल्यानंतर राजवैभवाचा त्याग करून स्वीकारलेला वनवास, रावणाने केलेले अपहरण, अग्निपरीक्षेसारख्या कठोर प्रसंगांतून गेलेले तिचे जीवन तिच्या असामान्य सहनशीलतेचे दर्शन घडवते. लंकेत असताना रावणाच्या सर्व प्रलोभनांना ठाम नकार देत तिने स्वतःचे शील जपले.



माता सीतेचे जीवन आजच्या काळातील स्त्रियांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी कर्तव्याचा मार्ग न सोडता धर्मनिष्ठ राहण्याचा संदेश तिच्या आचरणातून मिळतो. आजच्या काळात स्त्रीशक्तीचा अर्थ म्हणजे केवळ तिला मिळालेले बाह्य स्वातंत्र्य एवढाच मर्यादित नाही, तर आत्मविश्वास, निर्णय घेण्याची क्षमता आणि स्त्रीचे चारित्र्यबळ हा खरा स्त्रीशक्तीचा अर्थ आहे. माता सीतेच्या जीवनातून संयम, त्याग, आत्मविश्वास आणि धर्मनिष्ठा हे गुण अंगीकारल्यास निश्चितच समाज अधिक सुसंस्कृत आणि सशक्त बनेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दिमाखदार मिरवणूक






## ● आकर्षक देखाव्यांद्वारे माता रमाई व बाबासाहेबांच्या कार्याचे दर्शन
## ● डॉल्बीच्या तालावर थिरकली तरुणाई; आकर्षक विद्युत रोषणाईने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आज शनिवारी सोलापूर शहरात भव्य आणि दिमाखदार अशी मिरवणूक काढण्यात आली. विविध देखाव्यांद्वारे माता रमाई आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचे दर्शन घडविले. सुमारे ३५ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविला.

माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साही वातावरणात सोलापूर शहरात साजरी करण्यात आली. विविध संस्था - संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. दरम्यान, या जयंतीनिमित्ताने दिमाखदार अशी मिरवणूक काढण्यात आली. विविध संस्था व मंडळांच्या वतीने आकर्षक व प्रबोधनात्मक सजावट करून तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली. पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मनोभावे अभिवादन करून या मिरवणुकीस जल्लोषात व उत्साही वातावरणात आज दुपारी ४ .३० वाजता प्रारंभ झाला. गुलालाची मुक्त उधळण करण्यात आली. प्रत्येक मंडळाने माता रमाई यांच्या त्याग, संघर्ष आणि योगदानावर आधारित देखावे साकारले होते. त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग प्रभावीपणे उभे करण्यात आले. या मिरवणुकीत डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. मिरवणूक बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा जनसागर लोटला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांसह महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाले होते. वैयक्तिक साम्राज्य, एस. जी. मित्र परिवार, ज्ञानसागर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, रमाई युथ फाउंडेशन, भीम दर्शन सामाजिक संस्था, मैत्री साम्राज्य सामाजिक संस्था, भीमाई प्रतिष्ठान, बी. के. ग्रुप, विश्वरत्न प्रतिष्ठान, त्यागमूर्ती माता रमाई युवा मंच, भारतीय भीम दल तरुण मंडळ आदी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

### विविध संस्थांतर्फे मसाला भात वाटप

१४ एप्रिल प्रतिष्ठान आणि गुरू महाराज प्रतिष्ठान यांच्या वतीने सम्राट चौक येथे मिरवणुकीत सहभागी भीम अनुयायांना मसाला भाताचे वाटप करण्यात आले.

### रमा हेच आपलं पंढरपूर यासह विविध आकर्षक देखाव्याद्वारे प्रबोधन

मिरवणुकीत माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब यांच्या जीवन कार्याचे दर्शन घडविण्यात आले. यामध्ये प्रबुद्ध ग्रुप : रमा हेच आपलं पंढरपूर..!, सम्राट युथ फाऊंडेशन : सामाजिक परिवर्तन प्रतीक स्थळ - लखनऊ, मैत्री ग्रुप : सजवलेल्या बग्गीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिकृती, माता रमाई प्रतिष्ठान : इतिहास घडवणाऱ्या महामानवाच्या विचारांची ज्योत, त्यागमूर्ती प्रतिष्ठान : रमाई शिकली बाराखडीके. के. कंपनी : डॉ. बाबासाहेब नावाच्या आकाशगंगेमधील पांढरा शुभ्र चंद्र म्हणजे रमाई हे प्रबोधनात्मक देखावे लक्षवेधक होते. ३५ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदवला होता. यावेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात होता.

### असा होता मिरवणूक मार्ग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सरस्वती चौक, मेकॅनिक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सम्राट चौक मार्गे न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे या मिरवणुकीचा रात्री १० वाजता समारोप करण्यात आला.

# मतमोजणीसाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी

### उमेदवारांना प्रतिक्षा मतमोजणीची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत मतदान पार पडले. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीसाठीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली.

सोमवार, दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारपर्यंत निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान, उमेदवारांना मत मोजणीची प्रतिक्षा लागून राहिली



असल्याचे दिसून येते. शनिवारी रात्री पोलिस बंदोबस्तात मतपेट्या गोडावूनमध्ये ठेवण्यात आल्या आहेत.सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ तर ११ पंचायत समितीच्या १३६ अशा एकूण २०४ जागांसाठी ७५६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मतदान, मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून १५ हजार २०० कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत.भाजपने महापालिका निवडणुकीप्रमाणेच कोणत्याही परिस्थितीत ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या मिनी मंत्रालयाचा ताबा मिळविण्याचा चंग बांधला आहे. त्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष लक्ष घालून विविध तालुक्यात प्रचारसभा घेतल्या.

शिवसेना शिंदे गटाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी जिल्ह्यात प्रचारासाठी हजेरी लावली. दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेत वातावरण तापवले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रचारात उतरून पक्षाच्या उमेदवारांना बळ दिले होते.

उमेदवारांनीही डोअर टु डोअर जावून प्रचार केला होता.

### तालुकानिहाय मतमोजणीची ठिकाणे

करमाळा : शासकीय धान्य गोदाम, करमाळा.
माढा : वखार महामंडळ गोदाम, अकूलगाव.
बार्शी : शासकीय धान्य गोदाम उपळाई रोड.
उत्तर सोलापूर : नूमवि शाळा, डफरीन चौक.
मोहोळ : शासकीय धान्य गोदाम.
पंढरपूर : शासकीय धान्य गोदाम.
माळशिरस : शासकीय धान्य गोदाम, म्हसवड रोड.
सांगोला : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन.
मंगळवेढा : शासकीय धान्य गोदाम.
दक्षिण सोलापूर : एसआरपी कॅम्प, सोरेगाव.
अक्कलकोट : तहसील कार्यालय.

# संविधानाच्या पानापानात माता रमाईच्या त्यागाचा गंध

## लेखिका माया बदनोरे; महाथेरी सन्मान सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात त्यागमूर्ती माता रमाई यांचे मोठे योगदान आहे. धीर गंभीरपणे रमाई या बाबासाहेब आंबेडकर यांच्या जगण्याचा आधार बनल्या. संविधानाच्या पानापानात रमाईच्या त्यागाच्या गंध येतो, असे प्रतिपादन गांधीवादी विचारवंत, ज्येष्ठ लेखिका माया बदनोरे यांनी केले

करुणाशील समितीच्या वतीने माता रमाई जयंती निमित्ताने आयोजित महाथेरी सन्मान सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे होते. मंचावर निवृत्त प्राचार्य डॉ. नसीमा पठाण, करुणाशील समितीचे प्रमुख आशुतोष नाटकर, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा.एम.आर.कांबळे, प्रा. नरेश बदनोरे, मारुती कटकधोंड, पद्माकर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### यांचा झाला गौरव

ज्येष्ठ समाजसेविका शेवंताबाई मोरे, इंदुमती कांबळे, माजी महापौर अलका राठोड, कालम्मा मंडेपू, प्रा.डॉ. आशा रोकडे-किर्तीकर, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरैय्या सय्यद, ज्येष्ठ लेखिका संध्या धर्माधिकारी, ज्येष्ठ धम्म उपासिका धम्मरक्षिता कांबळे, मंगला बंगाळे, सुचित्रा थोरे, श्रीमती मनिषा माने यांचा गौरव करण्यात आला.

प्राचार्य नसीमा पठाण यांनीही या उपक्रमाचे कौतुक करून सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव केला. प्रारंभी तथागत गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या स्मृतींना पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. श्रीपाद येरमाळकर यांनी सूत्रसंचालन तर संयोजक आशुतोष नाटकर यांनी प्रास्ताविक व आभार मानले.


## महत्वाचे...



### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. प्रास्ताविक ९ वीच्या विद्यार्थ्यांनी केले. व कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांच्या हस्ते सरस्वती पूजन संपन्न झाला. यावेळी १० वी च्या शिक्षक भगतलाल सुतार व भाग्यश्री गिडवीर यांनी क्लास मॉनिटरला भेटवस्तू म्हणून दिली. तसेच विद्यार्थ्यांकडून भगतलाल सुतार यांना डिजिटल फोटो फ्रेम गिफ्ट देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून अनेक प्रकारचे डान्स, फन्नी गेम, घेण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील, भगतलाल सुतार व इंद्रजीत चव्हाण उपस्थित होते. शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी आभार मानले.



### माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त पी.बी. ग्रुपच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर येथे प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे व भारत बाबरे यांच्या हस्ते माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भीम तळभंडारे, नाना कापुरे, सुरज वाघमोडे, प्रतीक चंदनशिवे उपस्थित होते.

# उपळे दुमालातील वखारिया विद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ७ फेब्रुवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कर्मवीर सप्ताहामध्ये सातवे षुष्प अर्पण करण्यासाठी गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. क्रिकेट, बुद्धीबळ, तसेच मनोरंजनात्मक खेळाचे इयत्तेनुसार सामने घेण्यात आले. स्पर्धेचे नियोजन क्रीडाशिक्षक एन.एन. महाले यांनी केले होते.

विजयी संघ व विजयी खेळाडूंना बक्षीसे देण्यात आली. प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, प्रमुख पाहुणे ग्लोरी इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक गणेश बुरगुटे, पोलीस पाटील दीपक बुरगुटे, योगगुरु सिद्धेश्वर शिंदे, प्रतिष्ठित ग्रामस्थ अमोल बुरगुटे यांच्या हस्ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. एसएससी बॅच १९९४-९५ च्या विद्यार्थीनी रुपये ५ हजार मूल्य असलेली पुस्तके विद्यालयास भेट दिली. याप्रसंगी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. प्रास्ताविक सहशिक्षक प्रशांत काशीद यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय सहशिक्षक अतुल राठोड यांनी करुन दिला. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख रमेश लंकेश्वर यांनी केले. आभार सहशिक्षक डी. डी. राऊत यांनी मांडले मानले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सीसीटीव्ही कामे**

डीआरएम (सी) चे मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहे: ई-निविदा सूचना क्रमांक: SUR-C-WKS-CCTV-GDS-SHED. कामाचे नाव: सोलापूर विभागातील 10 वस्तूंच्या शेडमध्ये सीसीटीव्ही सुविधा उपलब्ध करून देणे. अंदाजे किंमत: 14614457.59. बयाणा रक्कम: 223100.00, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 6[six] महिने. देखभाल कालावधी: 12 बारा महिने. निविदा फॉर्मची किंमत: Nil. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 02.03.2026 ते 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ. 02.03.2026 रोजी दुपारी 15.30 नंतर. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून www.ireps.gov.in या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल.
EXP-07

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानरगपालिका हद्दीतील मुरारजी पेठ येथील टी.पी. स्किम नं. २, सिटी सर्व्हे नं. ३/सी/१/डी/१/ए याचे एकूण क्षेत्रापैकी क्षेत्र ४२.२ चौ.मी. इतके असून यापैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र २८.१२ चौ.मी. इतके आहे. यात कच्चे स्वरुपाचे बांधकाम असलेले २ खोल्या, संडास, बाथरुम, नळ व लाईट कनेक्शनसह सर्व सुखसोयीची घरजागा. यांसी सोलापूर महानगरपलिका मिळकत क्र. २३०४२३ असा आहे. **यांसी चतुः सिमा :-** पुर्वेस :-सुहेल इक्बाल मुलाणी, पश्चिमेस- ईरशादवी युनुस शेख, दक्षिणेस:- वहिवाटीचा रस्ता, उत्तरेस:- वहिवाटीचा रस्ता असे आहे. सदर मिळकत ही **१) लक्ष्मीकांत वावुराव देवरनादगी व २) प्रशांत बाबुराव देवरनादगी** यांचे मालकीची असून मिळकत पत्रिकेवर त्यांचे नावाची नोंद दि. ३१-१०-२०१५ रोजी फेरफार क्र. १४८०९ ने झालेली आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून रक्कम स्विकारुन इसारा पावती लिहून दिलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जाकरार, मदार, या संबंधीचा हक्क असलेस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा वित्तीय अथवा सावकाराचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **३ (तीन)** दिवसाचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल मिळकती संबंधीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर सदर व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार उपस्थित झाल्यास ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणुक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता.०७/०२/२०२६.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
B.A., LL.B., M.S.W. D.M.C.J. ॲडव्होकेट
ऑफीस पत्ता. गाळा नं. १०, पहिला मजला,
दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,**
**नोंदणीकृत कार्यालय, 14/30, बी. विंग तळमजला गांधीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर - 413006**
**CIN:L17119PN1980PLC022962**

**31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे स्टेटमेंट**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | | तिमाही समाप्त / चालू वर्ष समाप्त 31 डिसेंबर 2025 (विनालेखित) | मागील वर्षात संबंधित 3 महिने संपले 31 डिसेंबर 2024 (विनालेखित) | नऊ महिने/ चालू वर्षाचा शेवट 2025 (विनालेखित) | वर्ष ते तारीख आकडे/मागील वर्ष समाप्ती 31 मार्च 2025 (ऑडिट केलेले) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशनमधून एकूण उत्पन्न | 101.66 | 210.88 | 180.97 | 511.98 |
| 2 | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (29.52) | (41.06) | (88.19) | (201.55) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (29.52) | (41.06) | (88.19) | (201.55) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंबर) | (29.52) | (41.06) | (88.19) | (173.04) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी नफा/(तोटा (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (29.52) | (41.06) | (88.19) | (173.04) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 285 | 285 | 285 | 285 |
| 7 | मागील वर्षाचा लेखापरीक्षीत ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव (पुनर्मुल्यांकन राखीव वगळून) | -- | -- | -- | -- |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु. 10/- दर्शनी मूल्य) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) - 1. मूलभूत: 2. पातळ केलेले: | (1.04) (1.04) | (1.44) (1.44) | (3.09) (3.09) | (6.07) (6.07) |

**टीप : अ)** उपरोक्त SEBI (सूचिबध्द दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम 2015 च्या अंतर्गत स्टॉक एक्सचेजमध्ये 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरुपाचा उतारा आहे. वित्तीयचे संपूर्ण स्वरुप 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाहीचे निकाल स्टॉक एक्सचेज (s) www.bseindia.com च्या वेबसाईटवर आणि कंपनीच्या www.katarespinningmillslimited.com वर उपलब्ध आहेत.
**ब)** वरील आर्थिक परिणामांचे लेखापरिक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने ०६ फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख : 06/02/2026**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड, करिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**(DIN- 00645013)**

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### मुंबई १३८ धावांनी आघाडीवर

**मुंबई :** प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे सुरू असलेल्या कर्नाटकविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात दुसऱ्या दिवशी मुंबईने १३६ धावांची आघाडी मिळविली आहे. मुंबईच्या १२० धावांच्या प्रत्युत्तरात कर्नाटकने १७३ धावा केल्या आणि पहिल्या डावात ५३ धावांची आघाडी घेतली. मुंबईने दिवस अखेरपर्यंत पिछाडी भरून काढत दुसऱ्या डावांत ५२ षटकांत २ बाद १८९ धावांची नोंद केली. खेळ थांबला तेव्हा आकाश आनंद ५३, तर मुशीर खान ४९ धावांवर खेळत होते. यशस्वी जयस्वाल (३६) व अखिल हेरवडकरने (३३) पहिल्या गड्यासाठी ७७ धावांची भागीदारी केली. जमशेदपूर येथे झारखंडविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात उत्तराखंडने दुसऱ्या दिवशी ८७ षटकांत ५ बाद २८२ धावा काढल्या. झारखंडने पहिल्या डावात २३५ धावा केल्या होत्या. कल्याणी येथे आंध्र प्रदेशच्या २९५ धावांच्या प्रत्युत्तरात बंगालने दुसऱ्या दिवस अखेर ८३ षटकांत ५ बाद १९९ धावा केल्या. बंगाल असून ९६ धावांनी पिछाडीवर आहे. इंदूर येथे मध्य प्रदेशविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात जम्मू-काश्मीर १२६ धावांनी आघाडीवर आहे. जम्मू-काश्मीरच्या पहिल्या डावातील १९४ धावांच्या प्रत्युत्तरात मध्य प्रदेशला १५२ धावा काढता आल्या. जम्मू-काश्मीरने दुसऱ्या डावात ५ बाद ८४ धावा केल्या. ■



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५५,७०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,५८,००० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.६ | १७.६ |
| अमरावती | ३३.६ | १६.४ |
| भंडारा | ३४.० | -.- |
| बुलडाणा | ३१.६ | १६.८ |
| चंद्रपूर | ३२.८ | १६.८ |
| गडचिरोली | ३१.२ | १५.२ |
| गोंदिया | २९.६ | १२.६ |
| नागपूर | ३१.४ | १३.८ |
| वर्धा | ३२.५ | १५.० |
| वाशीम | ३०.६ | १४.० |
| यवतमाळ | ३१.६ | १६.० |

# वेस्ट इंडीजचा स्कॉटलंडवर ३५ धावांनी विजय

## हेटमायरचे वेगवान अर्धशतक, शेफर्डचे हॅट्ट्रिकसह ५ बळी

◆ **कोलकाता, ७ फेब्रुवारी**

शिमरॉन हेटमायरची (३६ चेंडूंत ६४ धावा) दमदार फलंदाजी आणि वेगवान गोलंदाज अष्टपैलू रोमारियो शेफर्डने हॅट्ट्रिकसह २० धावांत टिपलेल्या ५ बळींच्या जोरावर दोन वेळच्या विजेत्या वेस्ट इंडीजने शनिवारी ईडन गार्डन्सवर झालेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या गट क च्या सामन्यात स्कॉटलंडवर ३५ धावांनी शानदार विजय नोंदविला.

स्कॉटलंडने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडीजला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. वेस्ट इंडीजने २० षटकांत ५ बाद १८२ धावा उभारल्या, मात्र विजयासाठी १८३ धावांचा पाठलाग करताना स्कॉटलंडचा संपूर्ण संघ १८.५ षटकांत १४७ धावांतच गारद झाला.

ब्रॅण्डन किंग (३५) व कर्णधार शाय होपने (१९) पहिल्या गड्यासाठी ५४ धावांची भागीदारी करून वेस्ट इंडीजच्या डावाची चांगली सुरुवात केली. त्यानंतर शिमरॉन हेटमायरने रोवमन पॉवेल (२४) व शेर्फन रदरफोर्डच्या (२६) साथीने संघाच्या धावसंख्येला आकार दिला. हेटमायरने रोवमनसोबत तिसऱ्या गड्यासाठी ८१ धावांची, तर रदरफोर्डसोबत ३६ धावांची भागीदारी केली.



२२ चेंडूंत जलद अर्धशतक झळकावणारा शिमरॉन हेटमायर



हॅट्ट्रिकसह ५ बळी टिपणारा रोमारियो शेफर्ड

**हेटमायरने मोडला ख्रिस गेलचा विक्रम**

यादरम्यान शिमरॉन हेटमायरने केवळ २२ चेंडूंत विश्वचषकातील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावत ख्रिस गेलचा विक्रम मोडला. गेलने २३ चेंडूंत अर्धशतक केले होते. सफायन शरीफच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी शिमरॉन हेटमारयने ३८ चेंडूंत २ चौकार व ६ षट्कारांसह ६४ धावांचे योगदान दिले. स्कॉटलंडचा संघ लक्ष्याचा पाठलाग करताना १३.१ षटकांत ३ बाद ११५ धावांपर्यंत पोहोचला होता. कर्णधार रिची बेरिंग्टन (४२) आणि टॉम ब्रुसने (३५) सामना शेवटपर्यंत नेण्याची शक्यता निर्माण केली होती, परंतु जेसन होल्डरने बेरिंग्टनला बाद करून निर्णायक धक्का दिला आणि आपला १००वा टी-२० आंतरराष्ट्रीय बळी मिळवला. बेरिंग्टनने स्कॉटलंडसाठी टी-२० विश्वचषकात सर्वाधिक १८ षट्कार ठोकण्याचा विक्रम केला, त्याने जॉर्ज मुनसेच्या १६ षट्कारांचा विक्रम मोडीत काढला. त्यानंतर शेफर्डने अखेरच्या षटकांमध्ये आपल्या भेदक गोलंदाजीने सामना वेस्ट इंडीजच्या बाजूने वळविला. त्याने १७ व्या षटकातील पाच चेंडूंमध्ये चार बळी घेतले. शेफर्डने या फॉरमॅटमधील आपली दुसरी हॅट्ट्रिक पूर्ण केल्यावर स्कॉटलंडचा डाव गडगडला आणि १८.५ षटकांत १४७ धावांवर सर्वबाद झाला. स्कॉटलंडने आपले शेवटचे सात बळी केवळ ३२ धावांत गमावले. शेफर्ड चालू स्पर्धेत हॅट्ट्रिक घेणारा पहिला गोलंदाज आणि स्पर्धेच्या इतिहासातील एकूण दहावा गोलंदाज ठरला. ◂(वृत्तसंस्था)

# नेदरलॅण्डविरुद्ध पाकिस्तानचा संघर्षमय विजय

◆ **कोलंबो, ७ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानची तयारी पहिल्या सामन्यातच स्पष्ट झाली. नेदरलॅण्डविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात नेदरलॅण्डविरुद्ध विजय नोंदविण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यांनी सात गडी गमावून आणि १९.३ षटकांत १४८ धावांचे लक्ष्य गाठले.

संघाला शेवटच्या दोन षटकांत २९ धावांची आवश्यकता होती. फहीम अशरफचा सोडलेल्या एका झेलमुळे परिस्थिती उलटली, अन्यथा नेदरलॅण्डने पाकिस्तानला कठीण वेळ दिली असती. नेदरलॅण्डच्या आर्य दत्त व पॉल व्हॅन डेर मर्वीने प्रत्येकी दोन बळी घेत पाकिस्तानला अडचणीत आणण्याचा चांगला प्रयत्न केला.

**पाकिस्तानचा मार्ग कठीण**

नेदरलॅण्डविरुद्ध पहिला सामना जिंकल्यानंतर, पाकिस्तानला आता गट अ मध्ये भारत, अमेरिका आणि नामिबियाचे आव्हान असेल. जर पाकिस्तानचा संघ भारताविरुद्ध सामना खेळला नाही तर त्यांना भारतीय संघाला पुढे चाल द्यावी लागू शकते, त्यामुळे गुणतालिकेत त्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. परिणामी, उर्वरित सामने पाकिस्तानसाठी करा किंवा मरो असा सामना असेल.

यानंतर पाकिस्तानचा पुढील सामना १० फेब्रुवारी रोजी कोलंबोत अमेरिकेशी होईल, १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोत भारताविरुद्ध सामना असेल, पण या सामन्यात पाकिस्तानने न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा १८ फेब्रुवारी रोजी कोलंबोतच नामिबियाविरुद्ध अखेरचा साखळी सामना होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# श्रीलंकेचा सलामीचा सामना आयर्लण्डशी

◆ **कोलंबो, ७ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे गट ब मध्ये श्रीलंका आणि आयर्लण्ड यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. श्रीलंका संघ निराशाजनक तयारी विसरून घरच्या प्रेक्षकांसमोर एक दमदार कामगिरी करण्याचा प्रयत्न करणारग आहे.

भारतसोबत या स्पर्धेचे सह-आयोजन करणाऱ्या श्रीलंकेची तयारी फारशी चांगली झाली नाही, कारण स्पर्धेपूर्वीच्या अंतिम सरावाच्या मालिकेत त्यांना इंग्लंडकडून घरच्या मैदानावर टी-२० मालिकेत ०-३ ने पराभव पत्करावा लागला होता. आता ते या पराभवातून धडा घेऊन सुधारणा करण्याचा प्रयत्न करतील. गत काही काळापासूनची सातत्यहीन कामगिरी ही श्रीलंकेची मुख्य चिंता आहे. २०१४ च्या टी-२० विश्वचषकाचे विजेते असलेल्या श्रीलंकेने या स्पर्धेत घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा व कागदावर एक चांगला दिसणारा संघ घेऊन प्रवेश केला आहे व त्यांना निर्णायक क्षणी चांगली कामगिरी करणे आवश्यक आहे.



दासून शनाका



पॉल स्टर्लिंग

श्रीलंकेचा गट अवघड आहे, परंतु ते ऑस्ट्रेलियासोबत सुपर फेरीत स्थान मिळवू शकतात. पण आयर्लण्ड व झिम्बाब्वे कडवी झुंज देतील अशी अपेक्षा आहे, तर ओमान हा गटमधील आणखी एक संघ आहे.

दासून शनाकाच्या नेतृत्वाखालील श्रीलंका संघ आपली अष्टपैलू कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करेल. श्रीलंकेकडे अव्वल फळीत पथुम निसंका व कुसल मेंडिस यांच्यासारखे महत्त्वाचे खेळाडू आहेत. तसेच कामिल मिशारा सुद्धा आहे. संघ अनुभवी कुसल परेरावरही अवलंबून असेल, तर मधल्या फळीत कामिंदू मेंडिस, चरिथ असलंका आणि जनिथ लियानागे यांच्यासारखे खेळाडू असतील. शनाका हा श्रीलंकेचा आघाडीचा फिनिशर व उत्तम वेगवान गोलंदाज अष्टपैलू खेळाडू आहे. श्रीलंकेच्या वेगवान गोलंदाजी विभागात दुष्मंथा चमीरा आणि मथीशा पथिराना यांच्यासारखे गोलंदाज असतील, परंतु दुखापतग्रस्त ईशान मलिंगाच्या जागी प्रमोद मधुशनला संधी देण्यात आली आहे. फिरकी विभागाचे नेतृत्व वानिंदू हसरंगा करेल आणि त्याला दुनिथ वेल्लालागे व महेश थीक्षाना यांची साथ मिळेल. पण हसरंगाचा फॉर्म चिंतेचा विषय आहे.

दुसरीकडे, आयर्लंडचे नेतृत्व अनुभवी पॉल स्टर्लिंग करेल आणि संघात हॅरी टेक्टर आणि जोश लिटलसारखे महत्त्वाचे खेळाडू असतील. आयर्लण्डला अलीकडील विजयांच्या जोरावर आपल्या गटातील बलाढ्य संघांना हरवण्याची आशा असेल. हा टी-२० विश्वचषकातील आयर्लण्डचा आठवा सहभाग असेल, त्यांनी २००९ मध्ये पदार्पण केल्यापासून प्रत्येक स्पर्धेत भाग घेतला आहे. आयर्लण्ड संघ इटली व यूएई विरुद्धच्या प्रभावी मालिका विजयानंतर येत आहे, आणि ते स्पर्धेत आपली विजयी मालिका कायम ठेवण्याचा प्रयत्न करतील. ◂(वृत्तसंस्था)

## टी-२० विश्वचषक क्रिकेट

### आजचे सामने

**अफगाणिस्तान वि. न्यूझीलंड**
**स्थळ** : चेन्नई
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**इंग्लंड वि. नेपाळ**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**श्रीलंका वि. आयर्लण्ड**
**स्थळ** : कोलंबो
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# आजारीपणामुळे बुमराह पहिल्या सामन्याला मुकला

**मुंबई :** वरिष्ठ वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आजारपणामुळे अमेरिकेविरुद्धच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारताच्या पहिल्या सामन्यासाठी उपलब्ध नव्हता, असे बीसीसीआयने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे. आजारपणामुळे बुमराह अमेरिकेविरुद्धच्या भारताच्या पहिल्या टी-२० विश्वचषक सामन्यासाठी निवडीसाठी उपलब्ध नव्हता. बीसीसीआयची वैद्यकीय टीम त्याच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. परिणामी, मोहम्मद सिराजला अंतिम एकादशमध्ये स्थान देण्यात आले. ४ फेब्रुवारी रोजी नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान गुडघ्याच्या दुखापतीमुळे हर्षित राणा स्पर्धेतून बाहेर झाल्यानंतर सिराजचा नुकताच १५ खेळाडूंच्या संघात समावेश करण्यात आला होता. ■

# पीसीबी ‘त्या‘‘ निर्णयावर सरकारशी सल्लामसलत करण्याची शक्यता

◆ **कराची, ७ फेब्रुवारी**

आगामी १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषकातील भारतविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत श्रीलंकन क्रिकेट मंडळाने पीसीबीला विनंती केली आहे. यावर निर्णय घेण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट मंडळ (पीसीबी) पुन्हा आपल्या सरकारशी सल्लामसलत करण्याची शक्यता आहे.



पाकिस्तान सरकारने पीसीबीला राष्ट्रीय संघाला टी-२० विश्वचषकासाठी पाठवण्याची परवानगी दिली आहे, परंतु भारतासोबत खेळण्यास मनाई केली आहे. त्यांचा हा निर्णय आयसीसी आणि त्यांच्या प्रसारकांसाठी व्यावसायिकदृष्ट्या सर्वात मोठा सामना आहे. यामुळे श्रीलंका क्रिकेटने पीसीबीला एक ई-मेल पाठवला आहे. १५ फेब्रुवारी रोजी कट्टर प्रतिस्पर्ध्यांमधील हा महत्त्वाचा सामना न झाल्यास श्रीलंका क्रिकेट मंडळाचे आर्थिक नुकसान होईल आणि भारतसोबत संयुक्तपणे या स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या या श्रीलंकेत स्पर्धेच्या आयोजनाला व प्रतिमेलाही धक्का बसेल, असे या ई-मेलमध्ये म्हटले आहे. पाकिस्तान आपले सर्व सामने कोलंबो आणि पल्लेकेले येथे खेळत आहे, त्याची सुरुवात शनिवारी नेदरलॅण्डविरुद्धच्या सामन्याने झाली. पाकिस्तानचे श्रीलंकेसोबत सरकार-ते-सरकार आणि क्रिकेट स्तरावर नेहमीच खूप जवळचे आणि मैत्रीपूर्ण संबंध राहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या मंडळाकडून आलेला ई-मेल असाच दुर्लक्षित केला जाऊ शकत नाही, असे घडामोडींची माहिती असलेल्या एका सूत्राने शनिवारी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# बलाढ्य इंग्लंड नेपाळचा सामना करणार

◆ **मुंबई, ७ फेब्रुवारी**

दोन वेळचा विजेता इंग्लंड संघ रविवारी येथे आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत पहिल्या सामन्यात नेपाळविरुद्ध लढणार आहे. या सामन्यात इंग्लंड संघ सर्वोत्तम कामगिरी करेल, अशी आशा इंग्लंड संघाचा कर्णधार हॅरी ब्रुक याने व्यक्त केली आहे.

बलाढ्य इंग्लंड संघाचे नेतृत्व करणाऱ्या हॅरी ब्रुकने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये यशस्वी कामगिरी केली आहे.

इंग्लंडने विश्वचषकासाठी उत्तम तयारी केली आहे व स्पर्धेतील पराभूत करण्यासाठी कठीण असलेल्या संघांपैकी तो एक असेल.

पदार्पण करणाऱ्या इटली, नेपाळ, स्कॉटलंड आणि वेस्ट इंडीजसोबत गट क मध्ये असलेल्या इंग्लंडला सुरुवातीपासूनच सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल याची उत्तम जाणीव आहे.

इंग्लंडने गत वर्षी खेळलेल्या १७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी ११ जिंकले व केवळ दोन गमावले.



हॅरी ब्रुक



रोहित पौडेल

इंग्लंड संघात मोठी धावसंख्या उभारण्यासाठी किंवा मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी जबरदस्त खेळाडू आहेत.इंग्लंडला त्यांचा अनुभवी गोलंदाज आदिल रशीदकडून खूप अपेक्षा असेल.

नेपाळसाठी, जागतिक स्तरावर आपली छाप पाडण्याची ही आणखी एक संधी आहे. गत स्पर्धेत त्यांनी दक्षिण आफ्रिकेला जवळपास हरवलेच होते, यात दक्षिण आफ्रिका संघाने केवळ एका धावेने विजय मिळवला.

अलीकडील कामगिरीमध्ये नेपाळने दोन वेळा टी-२० विश्वचषक विजेत्या वेस्ट इंडीजवर २-१ असा विजय मिळविला होता.

नेपाळने भूतकाळातही चांगली कामगिरी केली आहे. त्यांनी गत जूनमध्ये नेदरलॅण्ड व स्कॉटलंड यांचा समावेश असलेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत त्यांनी प्रवेश केला होता. त्यांनी कतार, हाँगकाँग आणि कुवेत यांचा समावेश असलेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय चौरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यातही धडक मारली होती. ◂(वृत्तसंस्था)



# बीसीसीआय अंडर-१९ वर्ल्डकप चॅम्पियन संघाला ७.५ कोटी बक्षीस देणार

**नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी-**

अंडर-१९ वर्ल्ड कप २०२६ चे विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघाला इउउख ७.५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम देईल. भारताने शुक्रवारी अंडर-१९ वर्ल्ड कपच्या अंतिम साम न्यात इंग्लंडला १०० धावांनी हरवून सहाव्यांदा विजेतेपद पटकावले. सामन्यानंतर भारतीय खेळाडूंच्या जल्लोषाचा व्हिडिओ खूप व्हायरल होत आहे. यात वैभव सूर्यवंशी भोजपुरी गाण्यावर नाचताना दिसत आहे.

**खेळाडूंनी सॉरी-सॉरी गाण्यावर डान्स केला**

संघाच्या सेलिब्रेशनच्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये वैभव म्हणतो की, 'पंजाबी गाणं समजत नाहीये मित्रांनो, आता भोजपुरी लागेल'. यानंतर वैभवने पवन सिंहचे 'सॉरी-सॉरी' हे गाणे लावले. यानंतर सर्व खेळाडू या भोजपुरी गाण्यावर नाचत होते.

व्हिडिओच्या शेवटी वैभव म्हणतो की, आता माझ्याकडून आजसाठी एवढेच पुरेसे आहे. आयपीएलच्या राजस्थान रॉयल्सने डान्सच्या व्हिडिओ क्लिपवर कमेंटही केली आणि लिहिले की, 'एक बिहारी सब पर भारी'.

**सपोर्ट स्टाफला पुरस्कार समर्पित केला**

अंडर-१९ वर्ल्ड कप २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशी विजयाचा नायक ठरला. फायनलमध्ये १७५ धावांच्या खेळीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून निवडण्यात आले, तर संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक धावा आणि सर्वाधिक षटकार मारल्यामुळे तो 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' देखील ठरला. त्याने ७ सामन्यांमध्ये ६२.७१ च्या सरासरीने ४३९ धावा केल्या, ज्यात ४१ चौकार आणि ३० षटकारांचा समावेश होता. 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द सिरीज' बनल्यानंतर वैभव म्हणाला, खूप छान वाटत आहे. मी हा पुरस्कार संपूर्ण सपोर्ट स्टाफला समर्पित करू इच्छितो.

# इलावेनिलचा सुवर्णभेद

## आशियाई रायफल/पिस्तूल स्पर्धा

### शांभवीची कनिष्ठ गटात विक्रमी कामगिरी

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

डॉ. कर्णी सिंग शूटिंग रेंजमध्ये आयोजित आशियाई रायफल/पिस्तूल अजिंक्यपद स्पर्धेत ऑलिम्पिकपटू इलावेनिल वलारिवनने १० मीटर एअर रायफल महिलांच्या स्पर्धेत जपानच्या मिसाकी नोबाटाचा थोडक्या फरकाने पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

दरम्यान, शांभवी क्षीरसागरने आशियाई कनिष्ठ गटाच्या अंतिम फेरीत नवीन विक्रम रचला आणि सुवर्णपदक पटकावले.



इलावेनिल वलारिवन

मेघना सज्जानारनेही कांस्यपदक जिंकून पदकतालिकेत स्थान मिळवले आणि मान्यता सिंग व अनीशा शर्मा यांच्यासह भारताला कनिष्ठ महिलांच्या पदकांमध्ये निर्भेळ यश मिळवून दिले.

भारताने स्पर्धेत आपले वर्चस्व कायम राखले, स्पर्धेच्या चौथ्या दिवशी दहा सुवर्णपदके जिंकली, त्यामुळे भारताची एकूण पदकांची संख्या ४३ झाली आहे, ज्यात २७ सुवर्ण, १० रौप्य आणि आठ कांस्य पदकांचा समावेश आहे. ओजस्वी ठाकूरनेही महिलांच्या युवा गटात सुवर्णपदक पटकावले.

दिवसाच्या प्रारंभी ५० मीटर पुरुषांच्या पिस्तूल स्पर्धेत सौरभ चौधरीने सुवर्णपदक जिंकले. त्याच्यानंतर कमलजीत चौधरी आणि सध्याचा विश्वविजेता रविंदर सिंग यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक जिंकले. याशिवाय योगेश कुमारने कनिष्ठ गटात सुवर्णपदक मिळवले.

कनिष्ठ गटाच्या अंतिम फेरीत, शांभवीने २५३.७ गुणांसह नवीन आशियाई ज्युनियर विक्रम रचला, तिने २०२४ मध्ये जकार्ता येथे ईशा अनिल तकसाळेने नोंदवलेला २५३.१ चा विक्रम मोडला. तिने २५९.७ गुण मिळवणाऱ्या मान्यता सिंगवर तिने चार गुणांच्या फरकाने विजय मिळवला. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेशला नमवून भारत अजिंक्य

## सॅफ १९ वर्षांखालील महिला फुटबॉल

◆ **पोखरा, ७ फेब्रुवारी**

भारताने बांगलादेशविरुद्ध दमदार कामगिरी करत दक्षिण आशियाई (सॅफ) १९ वर्षांखालील महिला फुटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पुन्हा पटकावले. शनिवारी नेपाळमधील पोखरा रंगशाळेत झालेल्या अंतिम सामन्यात भारताने ४-० असा विजय मिळवला.

या वर्षाच्या सुरुवातीला भारताच्या १७ वर्षांखालील संघाला एएफसी आशियाई चषकासाठी पात्र ठरवून देणारी कर्णधार जुलान नोंगमैथेनने प्रीतिका बर्मनकडून मिळालेला पास गोलजाळ्यात पाठवून खाते उघडले.या गोलच्या उभारणीत बर्मनला क्रॉस देणारी अल्वा देवी सेनजम अंतिम सामन्याच्या शेवटच्या टप्प्यातही प्रतिस्पर्धी संघासाठी धोकादायक ठरत राहिली. सामन्याच्या एक तासानंतर, तिने एक पेनॉल्टी मिळवली आणि एलिझाबेथ लाक्राने शांतपणे स्पॉट किकवर गोल करत भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. ◂(वृत्तसंस्था)



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला फुटबॉलपटू

# १२ भारतीय सुवर्णपदकासाठी लढणार

## बॉक्सम एलिट

◆ **ला नुसिया (स्पेन), ७ फेब्रुवारी**

ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती बॉक्सर लवलिना बोर्गोहेन आणि विश्वचषक सुवर्णपदक विजेता सचिन सिवाचने येथे सुरू असलेल्या बॉक्सम एलिट आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वेगवेगळ्या शैलीत विजय मिळवत, इतर १० भारतीयांसह अंतिम फेरीत धडक मारली आहे. आठ महिला व चार पुरुषांसह एकूण १२ भारतीय अंतिम दिवशी सुवर्णपदकासाठी स्पर्धा करतील.

बोर्गोहेन (७५ किलो) हिने उपांत्य फेरीत वेल्सच्या रोजी एक्लेसवर ५-० असा एकतर्फी विजय नोंदवत दमदार कामगिरी केली.

महिलांच्या ५४ किलो वजनी गटात भारताचे सुवर्णपदक निश्चित झाले असून आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या प्रीती पवारने पूनमविरुद्ध सर्व-भारतीय अंतिम फेरी निश्चित केली आहे. प्रीतीने फ्रान्सच्या आया हमदीवर ५-० असा विजय मिळवला, तर पूनमने इंग्लंडच्या आयव्ही-जेन स्मिथचा ४-१ असा पराभव केला.



सचिन सिवाच

अंतिम फेरीत पोहोचलेल्या इतर भारतीय महिलांमध्ये मंजू राणी (४८ किलो), नीतू घांघास (५१ किलो), प्रिया (६० किलो), अरुंधती चौधरी (७० किलो) व नैना (८० किलो) यांचा समावेश आहे, या सर्वांनी आपापल्या उपांत्य फेरीच्या लढती जिंकल्या.

पुरुषांच्या गटात सचिन सिवाचने (६० किलो) इंग्लंडच्या जॅक ड्रायडेनवर आणखी एक एकतर्फी विजय मिळवत आपली शानदार कामगिरी सुरूच ठेवली.

दीपक (७० किलो), आकाश (७५ किलो) आणि अंकुश (८० किलो) यांच्या दमदार कामगिरीमुळे भारताने आणखी अंतिम फेरीतील खेळाडूंची भर घातली. ◂(वृत्तसंस्था)

### आकाश व अंकुशचे स्थान निश्चित

दीपकने कझाकस्तानच्या जागतिक बॉक्सिंग विश्वचषक फायनल्सच्या रौप्यपदक विजेत्या नुरबेक मुरसलविरुद्ध पहिल्याच फेरीत आरएससीद्वारे विजय मिळवून सत्रातील सर्वात लक्षवेधी क्षणांपैकी एक निर्माण केला. आकाश व अंकुशने कझाकिस्तानच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्धच्या कठीण लढती जिंकून शनिवारी होणाऱ्या सुवर्णपदकाच्या लढतींमध्ये आपले स्थान निश्चित केले.

दरम्यान, प्रांजल यादव (६५ किलो), काजल (६५ किलो), सनमाचा चानू (७५ किलो), आणि मनकीरत कौर (८०+ किलो), जादुमणी सिंग (५५ किलो), मोहम्मद हुसामुद्दीन (६० किलो), आणि हितेश गुलिया (७० किलो) यांना आपापल्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागल्याने कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





सांगोला : घेरडी जि.प. गट व पं.स.गणासाठी विठ्ठल नामदेव माने (रा. पारे) दिव्यांग मतदाराने मतदानाचा हक्क बजावला.

# बापरे, काय हा प्रकार..! मुळेगाव तांड्यावर ईव्हीएम मशीनखाली लिंबू-मिरची

## साहित्य पाहून मतदाराला आली चक्कर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी**

कोणतीही निवडणूक असली की, प्रचारात किंवा मतदान करताना नवनव्या घटना समोर येत असतात. असाच एक प्रकार सोलापूर जिल्ह्यातील मुळेगाव तांडा येथे आज (दि.७) मतदानादिवशी घडला. याठिकाणी मतदान प्रक्रियेदरम्यान कोणीतरी खिळा, लिंबू, मिरची आणून या ईव्हीएम मशीनखाली ठेवली होती. हे संशयास्पद साहित्य निदर्शनास आले. दरम्यान, मतदान करून परतणाऱ्या एका महिलेला ते साहित्य पाहून अचानक चक्कर आली होती. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथील मतदान केंद्रावर हा खळबळजनक प्रकार समोर आला.



मतदान प्रक्रियेदरम्यान ईव्हीएम मशीनखाली जादूटोण्याचे साहित्य (लिंबू-मिरची) आढळले. यामुळे परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले. येथील अपक्ष उमेदवाराने या घटनेची रितसर चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, आजतागायत जिल्ह्यात असा प्रकार कोठेही आढळला नव्हता. हा प्रकार म्हणजे एक प्रकारे जादूटोणाचा प्रकार असल्याची उलट-सुलट चर्चा येथील मतदारांत सुरु होती. मुळेगाव तांडा येथील मतदान केंद्र येथील ईव्हीएम मशिनच्याखाली खिळा, टोचलेले लिंबू आणि मिरची असे संशयास्पद साहित्य नियुक्त कर्मचाऱ्यांनी केंद्रप्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली काढून टाकले आणि मतदार प्रक्रिया पार पडली. या घटनेमुळे या मतदार केंद्रावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

**अपक्ष उमेदवार संदीप राठोड यांनी व्यक्त केला संताप :** मुळेगाव तांडा येथील मतदान केंद्राच्या ईव्हीएम मशीनखाली कोणीतरी जादूटाणा प्रकार करून लिंबू-मिरची असे साहित्य आणून ठेवले होते.

माझ्या भावाची पत्नी मतदान करायला गेल्यावर त्यांना चक्कर आली आणि त्यांना याबाबत विचारणा केल्यावर त्यांनी या मशीनखालील साहित्याची माहिती दिली. जिल्हा प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अपक्ष उमेदवार संदीप राठोड यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केली.

## महत्वाचे...

### सांगोला तालुक्यात ७ जि.प व १४ पं.स. सदस्य निवडणुकीसाठी ७० टक्के मतदान

**सांगोला, दि.७ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यात ७ जि.प गट व १४ पं.स गण यासाठी झालेल्या निवडणुकीत ७० टक्के मतदान झाले. १ लाख ८३ हजार ६६२ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ९४ हजार ९७२ पुरुष व ८८ हजार ४१४ स्त्री व इतर २ मतदार यांचा समावेश आहे. सकाळच्या सत्रात ज्येष्ठ नागरिक, महिला व तरुण मतदार उत्स्फूर्तपणे मतदानासाठी बाहेर पडलेले दिसून आले. काही ठिकाणी मतदानासाठी रांगा लागल्याचे दिसून आले. कामानिमित्त व नोकरीसाठी बाहेरगावी असलेल्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सकाळपासून मतदान केंद्रावर दिसून आले. या निवडणुकीत ७ जिल्हा परिषद सदस्यसाठी ४१ व १४ पंचायत समिती सदस्यसाठी ५४ उमेदवार रिंगणात उभे आहेत. मतदानाची आकडेवारी घेण्यासाठी नियंत्रण कक्षात १० टेबल ठेवले होते. नियंत्रित अधिकारी बाळासाहेब मोरे, पथक प्रमुख सचिन कुंभार, आकाश गोडसे, समाधान वाघमोडे, अमोल देशमुख, अण्णासो सरगर, आरएनटी सुनील बेलभंडारे, सोमनाथ साळुंखे हे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांचे नियंत्रणात कामकाज करीत होते अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली. सदर निवडणुकीसाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संदीप देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली २७४ मतदान केंद्रावर वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, सेविका, सहाय्यक, सहाय्यिका, आशाताई व गटप्रवर्तक उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी, मंडलाधिकारी, पोलीस पाटील, बीएलओ, क्षेत्रिय अधिकारी आणि आचारसंहिता कक्षाचे प्रमुख उमेशचंद्र कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. तालुक्यात सर्वत्र शांततेत मतदान पार पडले. तालुक्यातून ३२ क्षेत्रिय अधिकारी स.६ वा. पासून २७४ मतदान केंद्रावर बारकाईने लक्ष ठेवून दिवसभर सतत भेटी देऊन अडचणीचे निराकरण करणे, मॉक पोल अहवाल सादर करणे हे काम करत होते. सुरुवातीला काही केंद्रावर मॉकपोल पूर्वी बॅलेट युनिट बदलून दिल्याने कोठेही अडचण निर्माण झाली नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी सांगितले.

### पंढरपुरात सरासरी ६८.९१ टक्के मतदान

**पंढरपूर, दि.७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पंढरपूर तालुक्यात सरासरी ६८.९१ टक्के मतदान झाले. मतदानासाठी सकाळपासूनच सर्व केंद्रांवर मतदारांच्या रांगा होत्या. १ लाख ९६ हजार ९७७ मतदारांनी मतदान केले. त्यामध्ये १ लाख ४ हजार ७५५ पुरुष तर ९२ हजार २२२ महिला मतदारांचा समावेश होता.



### दहिटणे येथे एकता महिला मंचतर्फे माता रमाबाई आंबेडकर जयंती

**वैराग, दि.७ फेब्रुवारी-**

दहिटणे (ता. बार्शी) येथील 'एकता महिला मंच'च्या वतीने त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची जयंती आज दि.७ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला एकता महिला मंचच्या तालुका संघटन सचिव लक्ष्मी सुतार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सोनाली कोळी, दगडुबाई जगझाप, वनिता जगझाप, हेमा कावरे, केसर जगझाप, नीता जगझाप यांसह गावातील इतर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# 'दक्षिण'मध्ये चुरशीने सरासरी ६० टक्के मतदान

## ●भाजप व शिवसेनेमध्ये काँटे की टक्कर; दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी मतदारांमध्ये काहीसा निरूत्साह दिसून आला. सकाळी ११ वाजेपर्यंत दक्षिण तालुक्यात केवळ ७ टक्केच मतदान झाले होते. त्यानंतर दुपारच्या सत्रात मतदानाची टक्केवारी वाढली. त्यामुळे सायंकाळी ५.३० वाजता ६० टक्के मतदान झाल्याचे दिसून आले.

शेतमजूर कामावरून आल्यानंतर केंद्रावर मतदारांच्या रांगा होत्या. त्यामुळे दुपारी ३.३० वाजता दक्षिणमध्ये ४३ टक्के मतदान झाल्याचे दिसून आले . त्यामुळे चुरशीने झालेल्या मतदानाचा टक्का कोणाला फायदेशीर ठरणार ? हे निकालादिवशी स्पष्ट होणार आहे. मात्र या निवडणूकीत भाजप व शिवसेनेमध्ये काँटे कि टक्कर दिसून आले. त्यामुळे निकालाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

नऊ वर्षानंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक होत असल्याने दक्षिणमध्ये भाजप, शिवसेना , काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांमध्ये चुरस दिसून आले.



यावेळी मंद्रूप जिल्हा परिषद गटामधून भाजपचे सोनाली कडते व राष्ट्रवादीच्या प्रीती कोरे, हत्तूर गटामध्ये भाजपच्या उज्वला हविनाळे व शिवसेनेच्या लक्ष्मीताई पाटील व भंडारकवठे गटामध्ये भाजपच्या सविता उंबरजे व काँग्रेसच्या रूपाताई कमळे यांच्यामध्ये चुरस दिसून आली.

मंद्रूप पंचायत समितीमध्ये भाजपचे मळसिध्द मुगळे व राष्ट्रवादीचे अप्पाराव कोरे यांच्यातील लढत लक्षवेधी आहे. काँग्रेसचे अनंत म्हेत्रे यांनीही जोरदार टक्कर दिल्याने निकालाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. कंदलगावमध्ये भाजपच्या प्रियांका आसबे व काँग्रेसच्या शांताबाई व्हनमाने, हत्तूरमध्ये भाजपचे पंचप्पा धनशेटी व शिवसेनेचे नरसप्पा दिंडोरे, औरादमध्ये भाजपचे संदिप टेळे व शिवसेनेचे प्रमोद शिंदे, भंडारकवठेमध्ये नेहा कुपसंगे व प्रियांका कुपसंगे, निंबर्गीमध्ये भाजपच्या दुपारगुडे व काँग्रेसच्या श्रृती गायगवळी यांच्यामध्ये चुरस दिसून आली.

यावेळी मतदान केंद्रामध्ये बदल झाल्यामुळे एकाच कुटुंबातील मतदारांची नावे विविध मतदान केंद्रामध्ये आल्याने मतदारांची धावपळ झाली . मतदान नावे शोधण्यासाठी व मतदान केंद्रासंदर्भात मदत करण्यासाठी बीएलओ पथकही कार्यरत होते. यावेळी झोनल अधिकार्यांनी मतदारांना मार्गदर्शन करण्याऐवजी जबाबदारी झटकल्याने अनेक ठिकाणी वाद झाल्याचे दिसून आले. मात्र दक्षिण तालुक्यात कोणताही अनुचित प्रकार न घडता मतदान प्रक्रीया शांततेत पार पडली. मंद्रूप पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांच्यासह पोलीसांनी बंदोबस्त ठेवल्याने मतदान शांततेत पार पडला.



# माढ्यातील ७० उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद

## कोण बाजी मारणार याची उत्सुकता

**माढा, दि.७ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात जागांसाठी तर पंचायत समितीच्या १४ गणांसाठी शनिवारी मतदान पार पडले. तालुक्यात सायंकाळी साडेपाचपर्यंत सरासरी ६६.२ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ७ जागांसाठी २० व पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ५० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

त्या ७० उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले. या निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी सरळ लढत दिसून आली. २०१७ च्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवेळेच्या व आत्ताच्या राजकीय समीकरणात मोठे बदल झाले आहेत. त्यामुळे कोण सरस ठरणार हे नऊ तारखेच्या निकालानंतरच ठरणार आहे. तालुक्यातील ७ जिल्हा परिषद गटातील २ लाख ५८ हजार ७३४ मतदार आहेत. मतदानावेळी किरकोळ गोष्टी वगळता कोणताही अनुचित प्रकार घडला नाही मतदान सुरळीत पार पडले.



# पांगरी येथे ६३.३१ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी पांगरी येथील मतदान केंद्रावर आज शनिवारी शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सात वाजल्यापासून सुरु झालेल्या मतदानास मतदारांचा प्रतिसाद मिळाला.

पांगरी मतदान केंद्रावर एकूण ५,९८६ मतदारांपैकी ३,७९० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे येथे ६३.३१ टक्के मतदानाची नोंद झाली. सकाळी महिला व ज्येष्ठ नागरिकांची तर दुपारनंतर युवकांची मोठी उपस्थिती दिसून आली. निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता मतदान शांततेत पार पडले.

## धाराशिव जिल्ह्यात सरासरी ६५ टक्के मतदान

**धाराशिव,दि.७ फेब्रुवारी-**

धाराशिव जिल्ह्यात मतदानाला चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यात सरासरी ६५.४२ टक्के मतदान झाले.

भूम तालुक्यात सर्वाधिक ७१.६५ टक्के तर लोहारा तालुक्यात तुलनेने कमी ५७.३६ टक्के मतदान झाले. परांडा ७१ टक्के, कळंब ६६.६३ टक्के, वाशी ६९.६० टक्के, धाराशिव ६३.७२ टक्के, तुळजापूर ६४.६७ टक्के आणि उमरगा ६३ टक्के मतदान झाले. जिल्ह्यात एकूण ११ लाख ४५ हजार ८८८ मतदारांपैकी सुमारे ७ लाख ४९ हजार ६५१ जणांनी मतदान केल्याचे वृत्त आहे. भूम आणि परांडा तालुक्यांत मतदानाची टक्केवारी इतर तालुक्यांच्या तुलनेत जास्त असून, या भागांमध्ये लोकांनी मतदानात सक्रिय सहभाग घेतला.

प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, मतदान केंद्रांवर सुरक्षेची पूर्ण व्यवस्था केली होती. त्यामुळे शांततेत मतदान झाले. मतदानाच्या प्रक्रियेलाही गती होती.

# मोहोळमध्ये सरासरी ६७.०९ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.७ फेब्रुवारी-**

जि.प.च्या ६ आणि पं.स.च्या १२ जागांसाठी मोहोळ तालुक्यात सरासरी ६७.०९ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. हे सर्व मतदान शांततेत पार पडल्याचे सांगण्यात आले. मोहोळ तालुक्यात या निवडणुकीत एकूण १ लाख ९८ हजार ३३८ इतके मतदार आहेत .तालुक्यात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (अप), शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (शप) यांच्यात लढत झाली. पण ती लढत पूर्वीप्रमाणेच माजी आमदार राजन पाटील-अनगरकर विरुद्ध इतर असेच झाल्याचे दिसून आले. फक्त यावेळी यांचे पक्ष बदलल्याचे दिसले.

> **मतदानातून दिसली चुरस; आता लक्ष निकालाकडे**

या निवडणुकीत राष्ट्रवादी (अप) चे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील कुरुल मध्ये तर याच पक्षाचे विजयराज डोंगरे आष्टीमध्ये आणि शिवसेना (शिंदे) चे जिल्हा प्रमुख चरणराज चवरे पेनुर मध्ये आणि संतोष पाटील (नरखेडकर ) हे नरखेड मधून मैदानात उतरले आहेत. तर भाजपाकडून जकरायाचे कार्यकारी संचालक सचिन जाधव, लांबोटीचे उद्योजक आणि माजी जि.प. सदस्य स्वर्गीय तानाजी खताळ यांच्या पत्नी श्रीमती विमल खताळ मैदानात असून याच लढती विशेष लक्षणीय ठरणार आहेत. पंचायत समितीमध्ये राहुल मोरे (भाजप) विरुद्ध बाळासाहेब गायकवाड राष्ट्रवादी(शप) यांची सय्यद वरवडे गणात, संजीव खिलारे भाजप विरुद्ध समाधान खंदारे (पोखरापूर), बाजार समितीचे माजी सभापती अस्लम चौधरी विरुद्ध केशव पाटील (घोडेश्वर), उल्का पाटील भाजप विरुद्ध ज्योत्स्ना पाटील शिवसेना शिंदे यांचे नरखेडमध्ये, तर कोमल अवताडे भाजप विरुद्ध शेळके यांची कामती बुद्रुक गणातून, डॉ. अमित व्यवहारे राष्ट्रवादी (अप) विरुद्ध मदनसिंह पाटील भाजप यांची आष्टी गणातून लढत लक्षणीय ठरणार आहे. प्रचारामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, आमदार राजू खरे, माजी आमदार राजन पाटील आणि यशवंत माने आदींनी प्रचारात एकमेकांविरुद्ध सभा घेतल्या .सर्वांनी एकमेका विरुद्ध टीकेची राळ उडवून दिली होती .विकास कामांपेक्षा व्यक्तिगत टीका आणि हेवेदावे यावर दोन्ही बाजूंचा भर असल्याचे दिसून आले. सोमवारी दिनांक नऊ रोजी मतमोजणी होणार असून तोपर्यंत निवडणूक लढवत असलेल्या सर्व उमेदवारांची छाती धडधड करणार हे मात्र निश्चित आहे.

दरम्यान मतदान यंत्रांच्या सुरक्षेसाठी दोन लेयर मध्ये बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे .त्यात १ एस.आर.पी.एफ ची तुकडी,२ अधिकारी आणि २० पोलीस अंमलदार यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.माजी आमदार यशवंत माने आणि राजन पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक असून या निवडणुकांचा निकाल काय होणार ?याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## भांबुर्डीत रात्री उशीरापर्यंत मतदान; सायंकाळी साडेपाच वाजता १३७ मतदारांना मिळाल्या चिठ्ठ्या



**माळशिरस :** येथे मतदानासाठी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद साडेपाच नंतरही १३७ मतदार रांगेत असल्याचे दिसून आले. फोंडशिरस जिल्हा परिषद गटातील भांबुर्डी गावातील मतदान केंद्र क्रमांक १०३ येथे १ हजार १०२ मतदार आहेत. या केंद्रावर सकाळी साडेसात वाजता मतदान प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर मतदारांची रांग दिसून आली. मतदान संपण्याच्या वेळी ६५० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मोठी रांग असल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी रांगेतील १३७ मतदारांना चिठ्ठ्या दिल्या व मतदान प्रक्रिया सुरू ठेवली त्यामुळे रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया सुरू राहिली.

**पानगाव येथे एका लग्न असलेल्या नवरदेवाने बोहल्यावर चढण्यापूर्वी लोकशाहीच्या मजबुतीकरणासाठी आपला मतदानाचा अधिकार बजावला. पानगाव (ता. बार्शी) येथील आनंद मोरे असे तरुणाचे नाव असून ते सहाय्यक गटविकास अधिकारी प्रशिक्षणार्थी आहेत. योगायोगाने आज मतदानादिवशी त्यांच्या लग्नाची तारीख होती. परंतु लग्नाला जाण्यापूर्वी त्यांनी आपला पवित्र मतदानाचा हक्क बजावला.**



## निधन वृत्त...

### अण्णाराव शिंदे



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

अक्कलकोट रस्त्यावरील पुरुषोत्तम व्हिला येथील अण्णाराव विठोबा शिंदे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. कर्णिक नगर येथील महापालिकेच्या जागृती विद्यालयातील शिक्षक सुनील शिंदे यांचे ते वडील होत.

### अन्नपूर्णा अडसुळे



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

श्रीमती अन्नपूर्णा दत्ता अडसुळे (वय वर्ष ५५, पाथरूड चौक मातंग वस्ती सोलापूर) यांचे आज दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र धक्याने निधन झाले. ते मातंग समाजाचे युवा नेते यतीराज अडसुळे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे,

# मंगळवेढ्यात रात्री उशीरापर्यंत मतदान प्रक्रिया

## दुपारी साडेतीनपर्यंत ४७.६७ टक्के मतदान; ढोबळे, आवताडे व भालके यांच्या प्रतिष्ठेचा सामना

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा,दि.७ फेब्रुवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद (जि.प.) व पंचायत समिती (पं.स.)च्या निवडणुकीसाठी आज शांततेत मतदान झाले. मंगळवेढा तालुक्यातील काळ्या शिवार परिसरात हरभरा काढणीस वेग आल्याने अनेक कामगार सकाळपासून शेतात गुंतले होते. दुपारी सुट्टी झाल्यानंतर त्यांनी मतदानासाठी केंद्रांकडे धाव घेतली. त्यामुळे अनेक ठिकाणी रांगा लागल्या. दुपारी ३.३० वाजेपर्यंत पुरुष मतदार ४१ हजार २८५, स्त्री मतदार ३९ हजार ५३६ असे एकूण ८० हजार ६२१ मतदारांनी आपला हक्क बजावला. ही निवडणूक तालुक्यातील आवताडे व भालकेंच्या प्रतिष्ठेची असल्याने विविध मतदान केंद्रावर रात्री उशीरापर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होती.

माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, आमदार समाधान आवताडे व भगीरथ भालके यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. मंगळवेढा तालुक्यात या निवडणुकीसाठी एकूण १८९ मतदान केंद्र होते. यासाठी १ हजार २६४ कर्मचारी नेमले होते. प्रत्येक केंद्रावर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतदान प्रक्रिया सकाळी ७.३० वाजता सुरू झाली. सुरुवातीला सकाळी तुरळक प्रमाणात मतदारांची हजेरी होती. परंतु दुपारनंतर गर्दी वाढली. मुढवी येथील किरकोळ बाचाबाचीचा प्रकार वगळता सर्वत्र शांततेत मतदान पार पडले. विशेषतः जि.प. भोसे गट, दामाजी नगर, लक्ष्मी दहिवडी आदी गटांतून अत्यंत चुरशीने मतदान झाले. या निवडणुकीत राजकीय नेत्यांच्या कुटुंबीयांची मोठी भूमिका आहे. माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांची कन्या कोमल ढोबळे-साळुंखे लक्ष्मी दहिवडी गटातून निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे प्रा. ढोबळे यांनी स्वतःच्या लेकीसाठी राजकीय अस्तित्व पणाला लावले आहे. दुसरीकडे, स्व. भारतनाना भालके यांचे चिरंजीव भगीरथ भालके यांनी स्थानिक आघाडी करून निवडणूक लढवली आहे. तर भाजपचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांनी पक्षाच्या वतीने उमेदवार उभे केले आहेत. परिणामी, भाजप विरुद्ध तीर्थक्षेत्र विकास आघाडी असा प्रमुख सामना रंगला आहे.




तालुक्यातील एकूण मतदारसंख्येच्या तुलनेत हे ४७.६७ टक्के मतदान आहे. हे प्रमाण गत निवडणुकांच्या तुलनेत चांगले असल्याचे मतदार संघटकांचे मत आहे.निवडणुकीसाठी विशेष सखी मतदान केंद्रे उभी करण्यात आली होती. या केंद्रांवर फक्त महिला कर्मचारी उपस्थित होत्या, तसेच बंदोबस्तासाठी महिला उपनिरीक्षक कार्यरत होत्या. या केंद्रांमुळे महिलावर्गाने मोठ्या प्रमाणात मतदान केले, आणि 'हम भी कुछ कम नही' असा नारा दिला. मरवडे येथील ११२ वर्षीय वृद्ध गृहस्थाने मतदान करून सेल्फी पॉइंटवर सेल्फी काढली, ज्यामुळे ते सोशल मीडियावर चर्चेत आले. हे मतदान प्रक्रियेचे एक आकर्षक प्रसंग ठरले. मंगळवेढा तालुक्यातील ग्रामीण भागातून उमेदवारांची तयारी दिसून आली.

प्रत्येक गटात स्थानिक मुद्द्यांवरून प्रचार झाला असून, रस्ते, पाणी, शाळा विकास आदी विषयांवर मतदारांनी विचार केला. निवडणूक आयोगाने सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले होते, जे यशस्वी झाले. आता सायंकाळची अंतिम आकडेवारी व निकालाकडे सर्वांचे लक्ष आहे. या निवडणुकीचा निकाल तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलू शकतो.

## उत्सव लोकशाहीचा


मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथील मतदान केंद्रावरील रांग.


सांगोला तालुक्यातील महूद बु जि.प.गट व चिकमहूद पं.स. गणासाठी मतदान केल्यानंतर चिकमहूद येथील मतदार.


वडाळा येथे बेकायदेशीर चार चाकी वाहन मतदान केंद्राजवळ आल्यावर भरारी पथकाने कारवाई केली.


कंदलगाव (ता.द.सोलापूर) : येथील पंचायत समितीच्या उमेदवार प्रियंका आसबे व सहकारी मतदानाची खूण दाखवताना.


मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) मतदान केंद्रावरील कर्मचारी टीम.


गुळसडी (ता. करमाळा) येथील मतदान केंद्रात वयोवृद्ध माजी सरपंच जमुनाबाई विठ्ठल खंडागळे (वय ८७) यांना मदत करताना सोलापूर जिल्हा लेबर फेडेरेशन संचालक मानसिंग नारायण खंडागळे.


मंद्रूपमध्ये नाईकनगर येथील योगेश राठोड यांनी मतदानाचा हक्क बजावून बोहल्यावर चढले.


पोथरे (ता. करमाळा) येथे हिसरे पंचायत समिती गणाचे राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार देवकते अंगद यांनी सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक

# दिग्गजांची प्रतिष्ठा, पालकमंत्र्यांची रणनीती पणाला

**शहरापेक्षा ग्रामीण भागात चुरशीने मतदान झाल्याने तर्कवितर्कांना ऊत**

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत मतदारांमधील उत्साह पाहता ग्रामीण भागात चुरस दिसून आले. नगरपालिका, महापालिकेपेक्षा या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्याची शक्यता असल्याने यात कोण बाजी मारणार? याबाबत तर्कवितर्कांना ऊत आला आहे.

जिल्हा परिषदेचे ६८ गट आणि पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी निवडणूक मैदानात उतरलेल्यांचे राजकीय भविष्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. निकालावर अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. नगरपालिका, महापालिका निवडणुकीत भरघोस यश मिळवलेली पालकमंत्र्यांची रणनीती या निवडणुकीत काय रंग दाखवणार? हे देखील स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीचा निकाल खऱ्या अर्थाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सोलापूरवरील राजकीय नेतृत्वाबाबतचे चित्र स्पष्ट करणारा ठरणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात अनेक मोठी राजकीय घराणी तैनात असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत ग्रामीण भागातील मतदारांकडून कोणाच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब होणार? याची




उत्सुकता सोलापूर जिल्हावासीयांना लागली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागावर पूर्वी राष्ट्रवादी आणि काँग्रेसची मजबूत पकड होती.

नुकत्याच झालेल्या निमशहरी भागातील नगरपरिषदा आणि शहरी भागातील महापालिका निवडणुकांच्या निकालात 'भाजपा'ने बाजी मारली आहे. आता ग्रामीण भागातील मतदारही 'भाजपा'ला स्वीकारणार का? हे या निवडणूक निकालावरुन समजणार आहे. कारण 'भाजपा'ला शहरी मतदारांचा पाठिंबा असतो, असे नेहमीच चर्चिले जाते.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापूर जिल्ह्यालगतच्या सातारा जिल्ह्यातील असून सोलापूरच्या राजकारणाची त्यांना बरीच जाण आहे. गोरे हे पूर्वाश्रमीचे काँग्रेसवासी असल्याने त्यांना काँग्रेसच्या डावपेचांचा अंदाज आहे. यंदाच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत दोन्ही



राष्ट्रवादी एकत्र निवडणूका लढवत असून कै.अजित पवारांच्या निधनानंतर 'राष्ट्रवादी'ला सहानुभूती मिळते का? याचीही चर्चा आहे.

सांगोला तालुक्यात पालकमंत्र्यांनी या निवडणुकीत शिवसेनेचे माजी आमदार शहाजी पाटील यांना हाताशी धरले आहे. 'शेकाप'चे आ. बाबासाहेब देशमुख यांचे त्यांच्यासमोर आव्हान असणार आहे. करमाळ्यात भाजपा आणि अजित राष्ट्रवादी यांच्यात हातमिळवणी झाली आहे. तर मोहिते-पाटील गटाचे आ.नारायण पाटील, सावंत गट यांचे त्यांच्यासमोर आव्हान असणार आहे. माजी आमदार जयवंतराव जगताप यांची भूमिका महत्वाची असणार आहे.

माढ्यात माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे यांनी 'भाजपा'त प्रवेश केला आहे. शरद राष्ट्रवादीचे आमदार अभिजित पाटील आणि अजित राष्ट्रवादीचा साठे परिवार यांच्यात बिनसले आहे. शिवसेनेचे संजयबाबा कोकाटे यांची भूमिका महत्वाची असणार आहे. मोहोळमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राजन पाटील परिवार यांच्या विरोधात दोन्ही राष्ट्रवादी, शिवसेनेचे आमदार राजू खरे यांनी आव्हान उभारले आहे. बार्शीत आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यात पारंपारिक लढत आहे. विश्वासराव बारबोले, वैरागचा निंबाळकर परिवार यांची भूमिकाही महत्वाची असणार आहे.

पंढरपूर-मंगळवेढ्यात आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, भगिरथ भालके, कल्याणराव काळे यांच्यात झुंज पहावयास मिळत आहे. आमदार अभिजित पाटील यांनीही पंढरपुरात राजकीय डावपेच आखल्याने पंढरपुरात यंदा चुरस आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात 'भाजपा'चे आमदार सुभाष देशमुख यांच्यासोबतील यंदा काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने मैदानात असल्याने विरोधी काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी यांचे त्यांच्यासमोर आव्हान आहे. अक्कलकोटमध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि माजी गृहराज्यमंत्री तथा शिवसेना नेते सिध्दाराम म्हेत्रे यांच्यात पारंपारिक लढत आहे. यंदा तानवडे परिवाराने भाजपा सोडल्याचा राजकीय परिणाम काय होतो? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. एकूणच, काय तर ग्रामीण भागाची ओळख असलेली जिल्हा परिषद व पंचायत समतीची निवडणूक अनेक राजकीय दिग्गजांचे भविष्ठ ठरवणारी असणार आहे.

## बार्शीत मतदान केंद्रांवर लागल्या रांगा



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ गट, पंचायत समितीच्या १२ गणांसाठी सुमारे ६७.७८ टक्के मतदान झाले. तालुक्यातील सर्वच केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्याचे दिसून आले. जिल्हा परिषदेच्या उपळाई, पांगरी, उपळे दुमाला, पानगाव, मालवंडी, शेळगाव (आर) या ६ गट आणि पंचायत समितीच्या उपळाई, आगळगाव, पांगरी, कारी, उपळे दुमाला, गौडगाव, पानगाव, बावी, मालवंडी, सासुरे, शेळगाव (आर), मानेगाव या गणात शांततेत मतदान झाले.

पानगावचे माजी सरपंच सुधीर काळे, भाजपचे तालुकाध्यक्ष मदन दराडे यांच्या पत्नी भारती दराडे, संतोष निंबाळकर, सुजाता डोईफोडे, माधुरी काकडे या महत्वाच्या उमेदवारांसह अन्य उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले.

सकाळी ९.३० वाजेपर्यंत १८ हजार ६३०, सकाळी ११.३० वाजेपर्यंत ४७ हजार ८८९, दुपारी १.३० वाजेपर्यंत ८० हजार ५४५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात २६ हजार १४८ पुरुष, २१ हजार ७४१ महिला मतदारांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एफ.आर. शेख, पोलिस उपाधीक्षक अशोक सायकर यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि पोलिस अधिकारी तालुक्यात सर्वत्र गस्त घालत मतदान सुरळीत पार पडण्यासाठी देखरेख करत होते.

### दुपारी ३.३० वाजेपर्यंत ५१.५७ टक्के मतदान

तालुक्यातील उपळाई गटात दुपारी ३.३० वाजेपर्यंत ५६.५० टक्के, पांगरी गटात ५१.६५ टक्के, उपळे दुमाला ४९.३८ टक्के, पानगाव ५३.५१ टक्के, मालवंडी गटात ४८.७१ टक्के, शेळगाव (आर) गटात ४९.२७ टक्के मतदान झाले होते. यात ५६ हजार ८५० पुरुष तर ५३ हजार ९०१ महिला मतदारांचा समावेश होता.










## प्रिसिजन संगीत महोत्सव; पहिल्या दिवशी सुरांनी मन जिंकले, स्वरांनी आत्मा

**निखिल पटवर्धन यांच्या सतार, मंजिरी कर्वे आलेगावकर यांच्या गायनाने रंगला महोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहात शनिवारची (दि.७) संध्याकाळ श्रोत्यांसाठी अविस्मरणीय अशीच ठरली. व्यासपिठावर सूर बोलत होते आणि मन मंत्रमुग्ध होत होतं. प्रिसिजन फाऊंडेशनच्यावतीने आयोजित अकराव्या प्रिसिजन संगीत महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सोलापूरकर रसिकांनी संगीत ऐकलं नाही, तर ते मनापासून अनुभवलं. पहिल्या दिवशी सूरांनी मन जिंकले अन् स्वरांनी आत्मा.

पहिल्या सत्रात प्रख्यात सतारवादक निखिल पटवर्धन यांनी राग पुरिया कल्याणने जणू संध्याकाळी एक शांत दीप प्रज्वलित केला. सतारीचा पहिला सूर उमटताच सभागृहातील प्रेक्षक शहारले. आलापातून हळूहळू उलगडणारे सूर मनाचा खोलवर ठाव घेत होते. ते कधी मौन प्रश्न विचारत होते, तर सूर सतारीतून त्यांना उत्तर देत होते. विलंबित बंदिशीतल्या गहिऱ्या छटा आणि द्रुत बंदिशीतील तेजस्वी उंची यांतून एक भावप्रवास उलगडत गेला. मारवा थाटातील या रागात सतार जणू स्वतःशीच संवाद साधत होती आणि रसिक त्या संवादाचे साक्षीदार बनले होते. तबल्यावर पांडुरंग पवार यांनी दिलेली समर्थ साथ या सुरेल संभाषणाला अधिक अर्थपूर्ण बनवत होती. सतार आणि तबल्याच्या या जुगलबंदीतून जे काही घडत होतं, ते ऐकणं नव्हतंच, ते जगणं होतं. सुरुवातीला निखिल पटवर्धन यांनी सतारीबद्दल सांगितलेले काही शब्दही रसिकांच्या मनाशी थेट नातं जोडणारे ठरले.

दुसऱ्या सत्रात स्वरांनी भावनांचा हात धरला. सुप्रसिद्ध गायिका मंजिरी कर्वे-आलेगावकर यांच्या आवाजातली सोज्वळता सभागृहात पसरताच वातावरण अंतर्मुख झालं. राग जयताश्रीमधील त्यांचे सूर मनाला अलगद स्पर्श करत होते. जणू कुणी आपल्याशी हळूच संवाद साधावा असे. पंडित कुमार गंधर्वांचा तराना सादर करतानाच आलेगावकर यांनी स्वरांमधल्या आघातांचे महत्वही स्पष्ट केले. शुद्ध निषादात सादर राग बिहागडामध्ये तर रसिक पूर्णपणे हरवून गेले आणि संत कबीरांच्या निर्गुणी भजनावेळी काळ जणू थांबलाच. सभागृह स्तब्ध झाले. फक्त उरले ते भाव. प्रत्येक ओळ मनात खोलवर झिरपत होती, डोळ्यांत नकळत ओल आणत होती. हार्मोनियमवर सौरव दांडेकर, तबल्यावर अजित किंबहुने आणि तानपुऱ्यावर प्राची जोगळेकर आणि स्वराली आलेगावकर यांनी दिलेली साथ या भावनांना आधार देणारी ठरली. भजन संपल्यानंतर क्षणभराची शांतता आणि त्यानंतरचा 'वाहवा' हा रसिकांच्या अंतःकरणातून उमटलेला प्रतिसाद होता. सायंकाळी अचूक ६.२५ वाजता सुरू झालेल्या या मैफलीने पहिल्याच दिवशी महोत्सवाची उंची निश्चित केली. प्रिसिजन कॅमशाफ्ट्सचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा, प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजनचे कार्यकारी संचालक करण शहा, मयुरा शहा, डॉ. सुधांशु चितळे आणि डॉ. किरण चितळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले आणि त्या दिव्याच्या उजेडात संगीताचा हा भावयज्ञ सुरू झाला.

**आज पुन्हा भावनांचा ओघ**

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक एस. आकाश यांच्या बासरीतून निर्मळ सूर उमटणार आहेत तर यज्ञेश रायकर यांच्या व्हायोलिनमधून भावनांचा नवा संवाद उलगडेल. तबल्यावर ईशान घोष साथ देतील. महोत्सवाच्या अंतिम सत्रात सुप्रसिद्ध गायिका देवकी पंडित यांच्या आवाजातून भक्ती, भाव आणि शास्त्रीयतेचा संगम अनुभवायला मिळणार असून, तबल्यावर प्रशांत पांडव आणि हार्मोनियमवर अभिषेक शिनकर साथसंगत करतील.

## माळशिरस : ३६३ केंद्रांवर झाले मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ गट आणि पंचायत समितीच्या १८ गणांसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडले. एकूण ३६३ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. सकाळी ९.३० वाजेपर्यंत ६.५१ टक्के, सकाळी ११.३० वाजेपर्यंत १९.४४ टक्के, दुपारी १.३० वाजेपर्यंत ३३.९१ टक्के, दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४८.५० टक्के मतदान झाले होते. संग्रामनगर गटात सर्वात जास्त तर वेळापूर गटात सर्वात कमी मतदान झाले होते.

दुपारी ३.३० वाजेपर्यंत गटनिहाय झालेले मतदान याप्रमाणे; दहिगाव ५१.१३ टक्के, मांडवे ५१.४३ टक्के, फोंडशिरस ४५.१५ टक्के, संग्रामनगर ५३.२१ टक्के ,माळीनगर ४६.०४ टक्के, बोरगाव ४३.२० टक्के, वेळापूर ४१.५१



टक्के, निमगाव ५१.१८ टक्के, पिलीव ४४.५० टक्के. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवी मोहिते-पाटील यांनी यशवंतनगर, आमदार उत्तमराव जानकर व विमल जानकर यांनी धानोरे तर माजी आमदार राम सातपुते व संस्कृती सातपुते यांनी भांबूर्डी येथील मतदान केंद्रावर मतदान केले.

**मतमोजणी अशी केली जाणार**

जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी सोमवार दि ९ रोजी शासकीय धान्य गोडाऊन माळशिरस याठिकाणी होणार आहे. एकावेळी एका गटाची व त्या गटातील दोन गणाची व टपाली मतदानाची मतमोजणी करण्यात येणार आहे.हि मत मोजणी एकूण २४ टेबलावर करण्यात येणार असून प्रत्येक टेबल साठी एक सुपरवायझर, दोन सहाय्यक, एक शिपाई यांची नेमणूक करण्यात आली आहे.

टपाली मतदानासाठी प्रत्येक गटाला एक, दोन गणना दोन असे स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात आले आहेत. संगणक, सिलिंग, रिपोर्टिंग यासह मतदान प्रक्रीयेसाठी एकूण २०१ कर्मचारी याची नेमणूक करण्यात आली आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हज यात्रेकरूंसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** हज यात्रे-वर जाणाऱ्या भाविक यात्रेकरूंसाठी योग्य मार्गदर्शन व तयारी व्हावी, या उद्देशाने बदर वेल्फेअर फाउंडेशन, लातूर यांच्या वतीने एकदिवसीय हज प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून असर नमाजेपर्यंत होणार आहे.

शिबिराचे ठिकाण एम. के. फंक्शन हॉल, साठ फूट रोड, लातूर असे आहे.या प्रशिक्षण शिबिरात हज व उमराच्या विधी, एहराम, तवाफ, सई, वकूफ, तसेच मदीना मुनव्वराची जियारत याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी हजरत मौलाना मुफ्ती आरिफसाहेब (बीड) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच हज कमिटी ऑफ इंडिया, मुंबई यांच्या मान्यताप्राप्त शासकीय हज प्रशिक्षकांकडून देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हज यात्रेकरूंना आवश्यक असलेले फॉर्म्स शिबिरस्थळी उपलब्ध करून दिले जाणार असून, महिलांसाठी पडद्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.संपर्कासाठी अलहाज शुजाउद्दीन साहेब, अलहाज मुजम्मिल साहेब यांच्याशी हज यात्रेकरूंनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन बदर वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## विविध वृत्त...

### होमगार्ड बनसोडे यांचा प्रामाणिकपणा पत्रकाराचा मोबाईल परत केला

**लातूर :** येथील पत्रकार शहाजी पवार यांचा अनावधानाने रसत्यावर पडलेला मोबाईल हामगार्डच्या सतर्कतेने मिळाला. या प्रामाणिकपणाचे कौतूक होत आहे.



शुक्रवारी (दि.६) रोजी दुपारी शहाजी पवार हे महात्मा बसवेश्वर चौकातून स्कुटवरुन जात होते यावेळी त्यांच्या खिशातील मोबाईल अनावधानाने रोडवर पडला. त्यावेळी म. बसवेश्वर चौकात कर्तव्यावर असलेले होमगार्ड जी.एस. बनसोडे यांना तो सापडला. पवार यांना मोबाईल खिशात नसल्याचे कळाले त्यांनी अन्य मोबाईलवरुन फोन केला व बनसोडे यांनी तो घेतला.त्यांना चौकात मोबाईल सापल्याचे सांगितले. बसवेश्वर चौकातील चौकीत बनसोडे व त्यांचे सहकारी मनोज होळकर यांनी तो पवार यांना दिला. पवार यांनी त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करीत पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांना याबाबत फोनवरुन सांगितले त्यांनीही बनसोडे यांच्या प्रामिणकपणाचे कौतूक केले.

### विनापरवाना वाहतूक थांबवा

**लातूर :** शहरात विनापरवाना विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात विनापरवाना विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढत चालली आहे. परिवहन विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण पाडे, जिल्हाध्यक्ष विनोद करकिले यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

### हवामान बदलाचा हरभऱ्याला फटका

**लातूर :** मागील चार दिवसांपासून जिल्ह्यात हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. रब्बी हंगामातील हरभरा पिकाच्या मुळाशी बुरशी तयार झाली असल्याचे दिसून येत आहे. त्यातून उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. जमिनीत अनेक ठिकाणी प्रमाणाबाहेर ओलावा राहिल्याने हरभऱ्याच्या मुळाशी बुरशी वाढत असल्याचे दिसत आहे. त्यातून काही ठिकाणी क्षेत्र बाधित झाले आहे. जिल्ह्यात लवकर पेरणी झालेल्या शेतीतील हरभरा काढणीला आला असून उशिरा पेर झालेल्या शेतकऱ्यांचा हरभरा आणखी फुलोऱ्यात तसेच घाट्यात आला आहे.

### ‘दयानंद’मध्ये माहितीपट

**लातूर :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात ५ फेब्रुवारी रोजी हिंदी विभागाच्या वतीने सर्तीदर सरताज यांचे 'हिंद की चादर' या गीताचे व माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने, डॉ. शेटकार रामशेट्टी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमासाठी मानसी गायकवाड, सुनील राक्षे, बालाजी यमपुरे, शंकर भालके यांनी सहकार्य केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

### परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश

**लातूर :** इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होणार असून ११ मार्चपर्यंत १५२ परीक्षा केंद्रांवर परीक्षा होणार आहेत. तसेच दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान २५२ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. या सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलमानुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होऊ नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थी एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत.कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील.

### रवींद्र येळनुरकर यांचे निधन

**लातूर :** येथील महसूल कॉलनी परिसरातील रहिवासी तथा अखिल भारतीय स्वातंत्र्य सेनानी समिती, नवी दिल्लीचे सचिव रवींद्र वामनराव येळनुरकर यांचे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. रवींद्र येळनुरकर हे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी डॉ. वामनराव येळनुरकर आणि ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सरलादेवी येळनुरकर यांचे सुपुत्र होत. अतिशय मनमिळावू स्वभावाचे असणाऱ्या स्व. रवींद्र येळनुरकर यांच्या मित्रपरिवारही खूप मोठा आणि विस्तीर्ण आहे. त्यांच्या निधनाने येळनुरकर परिवारावर शोककळा पसरली असून, सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नेत्यांच्या आरोप - प्रत्यारोपात पार पडली निवडणूक

## आमच्या विकास कामांचे काय ? : सुज्ञ मतदारांना पडलेला प्रश्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद - पंचायत समितीसाठीच्या निवडणुकीचे मतदान शनिवारी उत्साहात पार पडले. ग्रामीण भागाच्या विकासासाठीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विकास कामांऐवजी परस्परांवर आरोप - प्रत्यारोप करण्यावरच अधिक भर दिल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकास कामांचे काय ? असा प्रश्र्न सुज्ञ मतदारांना पडल्याचे दिसून आले. मतदारांनी या निवडणुकीत कोणाच्या बाजूंमे कौल दिला आहे ? या प्रश्र्नाचे उत्तर सोमवारी दुपारनंतर मिळणार आहे.



लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ आणि जिल्ह्यातील दहा पंचायत समितीच्या एकूण ११८ जागांसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने या निवडणुकांना महत्व असते. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान संबंधित परिसराच्या विकासाचे मुद्दे प्राधान्याने चर्चिले जाणे अपेक्षित असते. आपला मराठवाडा प्रदेश अगोदरच अविकसित म्हणून ओळखला जातो. विकास कामांच्या अनेक योजना अद्यापही पूर्णत्वास गेलेल्या नाहीत. विकास कामांसाठी आलेल्या निधींपैकी बहुतांश निधी अन्य कारणांसाठीच उपयोगात आणला जात असल्याचे सर्वज्ञात आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या विकास कामांमध्येही अनेक वाटेकरी असल्याने बहुतांश योजनांचा बट्याबोळ होत असल्याचेच दुर्दैवाने पाहण्याची पाळी मतदारांवर येऊन ठेपली आहे. रोजगार हमी योजनेपेक्षाही वाईट अवस्था या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाहायला मिळाल्याचे या ठिकाणी दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. रोजगार हमी योजनेबाबत उपहासाने रोजगार हमी - अर्धे तुम्ही अर्धे आम्ही असे म्हटले जात असे. या ठिकाणी अनेकदा 'अर्धेही नाही अशी स्थिती आहे. यामध्ये रस्त्याचे काम पूर्णत्वास गेलेले अहवाल असतात, प्रत्यक्षात दर्शवण्यात आलेला रस्ता केवळ कागदावरच असतो. अशा अनेक घटना केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर राज्याच्या विविध जिल्ह्यातही घडलेल्या असू शकतात, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीच्या प्रचारात सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचे नेते सहभागी झाले होते. या प्रचारादरम्यान बहुतांश नेते परस्परांवर आरोप - प्रत्यारोप करण्यात धन्यता मानताना दिसून आले. काहींनी तर अगदी पोरकटपणाही शरमेने मान खाली घालेल, एवढ्या कनिष्ठ स्तरावर जाऊन एकमेकांची असली - नसलेली घालवून घेतली. नेत्यांच्या अशा वक्तव्यांकडे पाहून मतदारांपुढे ही निवडणूक आपल्या ग्रामीण भागाच्या विकास कामांसाठी आहे की नेत्यांना एकमेकांवर तोंडसुख घेण्यासाठी ? असाही प्रश्न पडल्याचे पाहायला मिळाले. नेत्यांना कोणत्या परिस्थितीत कोणते वक्तव्य केले पाहिजे ? याचे प्रशिक्षण त्या - त्या राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी देणे आवश्यक असल्याचे यावरून दिसून आल्याच्या प्रतिक्रिया सुज्ञ मतदारातून ऐकायला मिळाल्या. कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटली की, आरोप - प्रत्यारोप ओघाने आलेच. मात्र, त्यासोबतच विकास कामांनाही प्राधान्य देणे आवश्यक आहे, याकडेही नेत्यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असते. ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, वीज असे मूलभूत प्रश्र्न आजही पूर्णपणे सुटलेले नाहीत. पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना अपूर्ण आहेत. त्यामुळे पुढील पाच वर्षासाठी निवडून द्यायच्या उमेदवारांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. पण आमच्या विविध प्रलंबित विकास कामांचे काय ? असा प्रश्र्न सुज्ञ मतदारांना प्रकर्षाने पडल्याचे जाणवले.

## लातुरात मच्छिमार संघर्ष समितीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :**मच्छिमारांच्या हक्कासाठी येथे संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. १९६६ पासून मच्छिमारांचा हक्क हिरावल्याचा आरोप संघर्ष समितीतील सदस्यांनी बैठकीत केला. यापूर्वी मच्छिमारीचा ठेका मत्स्य विभागाद्वारे मिळायचा. आता तो गोदावरी व कृष्णा महामंडळाकडे दिल्याने मच्छिमारांतून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत, अशी माहिती विष्णू पाटील यांनी दिली.गोदावरी महामंडळाने पाणी वाटपाचे धोरण ठरवावे. मच्छिमारीचा ठेका देण्याची व्यवस्था मत्स्य विभागाकडेच असावी, यासंदर्भात, मच्छिमारांच्या हक्कासाठी स्थापन झालेल्या लातूर संघर्ष समितीची बैठक रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृहावर आयोजिली आहे. लातूर जिल्ह्यातल्या १५५ संस्थांच्या पदाधिकारी, सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन संघर्ष समितीचे विष्णू पाटील यांनी केले आहे.

## राज्यस्तरीय सावित्रीच्या लेकी पुरस्काराने डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** डॉ. ज्ञानोबा कदम यांच्या संकल्पनेतील इंडियन स्टुडन्ट कौन्सिल ही संघटना समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, विज्ञानाभिमुखता व राष्ट्रवाद या मानवी मूल्यांना प्रमाण मानून जनजागृतीचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून अव्याहतपने करीत आहे. माहिती आणि तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांची समतावादी संघटना असून सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि राजकीय अशा विविध मानवी उत्थानाच्या कार्यात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते फुलेवाडा, गंज पेठ, पुणे येथे दरवर्षी सन्मानित व गौरविण्यात येते, यावर्षी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांच्या दोन्हीही सुकन्या डॉ. श्र्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना वैद्यकीय क्षेत्रासाठी सावित्रीच्या लेकी या राज्यस्तरीय पुरस्काराने प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन पुणे येथील क्रांतीबा ज्योतिबा यांच्या फुले वाड्यात प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित आणि विभावरी देशपांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी आणि गायक अरुण म्हात्रे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री व रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, प्रा. देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी अभिनेत्री व ज्येष्ठ रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, चिन्मयी सुमित, विभावरी देशपांडे, मुंबईच्या माजी महापौर किशोरीताई पेडणेकर, प्रा. डॉ. सरिता मालवीय, प्रा. डॉ. अरुण वाघोळे, प्राची घाणेकर, अस्मिता चांदणे, पल्लवी पुजारी, वैशाली सावळे, करुणा विमल, प्रज्ञा बाली, प्रा. डॉ. साधना चटलाणी, अंजली कुदरंगी यांनाही विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना हा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल पूज्य भदंत पय्यानंद थेरो व पूज्य भंते बोधिराज यांनी आशीर्वाद रुपी शुभेच्छा तर प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, इंजि. एम. एन. गायकवाड, माजी शिक्षणाधिकारी आर. पी. गायकवाड, प्रो. डॉ. संजय गवई, ममता गवई, देवानंद सावंत, प्रा. राजकुमार बनसोडे, सितम सोनवणे, मिलिंद धावारे आणि सतीश गायकवाड यांनी पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## १५० अधिकारी होणार ४०८ ग्रा.प.चे प्रशासक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** जिल्हा परिषदेच्या वेगवेगळ्या आस्थापनांतील जवळपास १५० अधिकारी जिल्ह्यातल्या ४०८ ग्रामपंचायतींचे प्रशासक होणार आहेत. गेल्या ४ फेब्रुवारीपासून ग्रामपंचायतींची मुदत संपण्यास प्रारंभ झाला. ३ ते ११ फेब्रुवारी दरम्यान, जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत संपुष्टात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर, जिल्हा परिषदेने पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांद्वारे प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली.




एका अधिकाऱ्यांकडे किमान दोन-तीन ग्रामपंचायतींचा प्रशासक म्हणून भार देण्यात येणार आहे. सर्वाधिक लातूर, उदगीर तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत ३ ते ११ फेब्रुवारीच्या कालावधीत संपत आहे. गेल्या ३ तारखेपासून ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत संपण्याची प्रक्रिया सुरू झाली. या पार्श्र्वभूमीवर, लातूर जिल्हा परिषद व गटविकास अधिकाऱ्यांनी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली.


सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, या निवडणुका संपल्यानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुका सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लातूर जिल्ह्यातील अर्ध्याहून अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त केल जात आहेत. निवडणूक लागेपर्यंत प्रशासक म्हणून सरकारी अधिकारीच नेमण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याने त्यावर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी कार्यवाही सुरू केली. गतवर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा माहोल सुरू झाला असून, अजून तो सुरूच आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीनंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची धामधुम सुरू होईल. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्थानिक प्रशासन निवडणूक प्रक्रियेसंबंधी अंमलबजावणी करीत आहे. या नव्या वर्षातले अर्धे वर्ष निवडणुकीत जाते की काय? अशी चर्चा सुरू झाली आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व पुढे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमुळे सर्व शहरी, ग्रामीण वातावरण ढवळून निघाले आहे.

# वन्यजीव प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचे अनुदान द्यावे- नानाजी खाकरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांचे वन्यजीव प्राण्यांच्या उपद्रवांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्याचा फटका सर्वसामान्य शेतकर्यांना बसत आहे. याची भरपाई म्हणून सरकारने आर्थिक स्वरूपात मदत करावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे अखिल भारती जैवीक शेती प्रमुख नानाजी आखरे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केली. यावेळी महाराष्ट्र प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आदिंची उपस्थिती होती.

भारतीय किसान संघाच्या वतीने लातूर येथील संघ कार्यालयातील जिल्ह्यातील शेतकर्यांच्या प्रश्नांवर बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शेतकर्यांना शेतीमालाला उत्पादन आधारीत खर्चावर दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे अशी किसान संघाची मागणी आहे. भारतीय किसान संघही देशभर शेतकर्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारी पक्षविरहीत संघटना आहे. शेतकर्यांच्या प्रश्नांसाठी संस्थापक अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी ४ मार्च १९७९ रोजी या संघटनेची स्थापना केली. महाराष्ट्रातील ७० हजार गावांतून ग्रामसमिती नेमली असून त्या समितीमार्फत शेतकर्यांना जैवीक शेतीसाठीचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. संघटनेच्या वतीने शेतकर्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला जातो. शेतकरी एकजुटीसाठी देशभर प्रयत्नशील असलेल्या या संघटनेने महाराष्ट्रातील शेतकर्यांना सरकारने एफआरपीनुसार भाव जाहीर करण्या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सरकारने एफआरपी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र शेतकर्यांच्या पदरात काहीही पडत नाही. शासनाने हमीभाव केंद्रे जरी उभारली असली तरी ही खरेदी केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने व शेतकर्यांना मजबुरीने बाजारात माल विकावा लागतो त्यामुळे शेतकर्यांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून भावांतर योजनेअंतर्गत मदत द्यावी जेणेकरून सकारला खरेदी केंद्रासाठी लागणारे मनुष्यबळ व इतर खर्च करावा लागणार नाही. यासाठी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे भावांतर फरकाचा प्रस्ताव दिला आहे तो अंमलात आणावा, असेही खाकरे यांनी यावेळी नमुद केले. विविध प्रश्नांवर आयोजीत बैठकीत लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांच्या प्रमुख तीन मागण्या समोर आलेल्या आहेत. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही जिल्हा प्रशासनाकडे जिल्हाध्यक्षांमार्फत निवेदन देऊन मागणी करणार आहोत. ही मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास येत्या २४ मार्च रोजी आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.



लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांना वन्यजीव प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी कुंपन योजना सुरू केली असली तरी त्याची तरतूद अत्यल्प आहे. या वन्यजीव प्राण्यांचा सरकारनेच बंदोबस्त करावा अथवा शेतीला कुंपन करण्यासाठी योग्य ती मदत शेतकर्यांना करावी. तसेच येणार्या काळात शेतकर्यांचा हरभरा हा बाजारात येणार असून त्यासाठी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, जेणेकरून शेतकर्यांच्या हातात योग्य मोबदला मिळेल. शासकीय यंत्रणा व त्यात बसलेले अधिकारी हे जाणीवपूर्वक उशिरा खरेदी केंद्र सुरू करतात त्यामुळे नाविलाजास्तव शेतकर्यांना कमी भावात माल विकावा लागतो. तसेच शेतकर्यांच्या पाणंद रस्त्यांचा विषयही लवकरात सरकारने सोडवावा. आदी वरील तीन मागण्या या लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांच्या महत्वपूर्ण असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भारतीय संघाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मद्दे, जिल्हामंत्री सतीश देशपांडे तावशीकर तर कोषाध्यक्ष शेखर मराठे, प्रसिद्धीप्रमुख संजय देशपांडे आदिंची उपस्थिती होती.

# जि.प.-पं.स. मतदानाचा बाजारपेठेवर परिणाम

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०७ फेब्रुवारी :** नुकत्याच अहमदपूर नगर परिषद निवडणूका पार पडल्या त्या वेळी अहमदपूर शहर बाजारपेठेत नागरिकांची गर्दी होती पण आज ७ फेब्रुवारी ला लातूर जिल्हा परिषद व अहमदपूर पंचायत समितीच्या निवडणुकीचे मतदान होत असल्याने अहमदपूर बाजारपेठेत शुकशुकाट जाणवत आहे.

अहमदपूर तालुक्यातील ६ जी.प गट व १२ पंचायत समिती गणा साठी हे मतदान होत आहे.

जिल्हा परिषद गट _ खंडाळी, हडोळती, शिरूर ताजबंद, अंधोरी, किनगाव, रोकडा सावरगाव पंचायत समिती गण खंडाळी,उजना, हाडोळती, कुमठा ( बु), वळसंगी, शिरूर ताजबंद, थोडगा, अंधोरी,किनगाव, धानोरा ( बु ), सावरगाव रोकडा, काजळ हिप्परगा, या ठिकाण च्या २०० मतदान केंद्रावर एकूण १६०६९३ मतदार आपला मतदान हक्क बनवणार आहेत.

या मतदान प्रक्रिये साठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून यंत्रणेचे स्वरूप आणि मनुष्यबळ निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण २०० मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर ४ कर्मचारी व १ पोलिस कर्मचारी याप्रमाणे एकूण १००० कर्मचाऱ्यांची (२०० टीम) नियुक्ती करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन स्थितीसाठी अतिरिक्त २० रिझर्व टीम देखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नियोजनासाठी आय.टी.आय. येथील केंद्रावर खालील वरिष्ठ अधिकारी उपलब्ध आहेत.

मंजुषा लटपटे: उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी.उज्वला पांगारकर: तह-सीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी. अरविंद रायबोले: उपविभागीय पोलीस अधिकारी. विनोद म्हैत्रेवार :पोलीस निरीक्षक.

एस टी आगार प्रमुख : अमर पाटील

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध विभागांची जबाबदारी नायब तहसीलदारांकडे सोपवण्यात आली आहे.

क्षेत्रीय स्तरावरील नियोजन

संपूर्ण मतदारसंघावर देखरेख ठेवण्यासाठी एकूण २४ झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, या झोनल अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना तांत्रिक मदत करण्यासाठी २४ मास्टर ट्रेनर यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही.

प्रशासनाने मतदारांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले असून, सर्व केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून

यंत्रणेचे स्वरूप आणि मनुष्यबळ निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण २०० मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर ४ कर्मचारी व १ पोलिस कर्मचारी याप्रमाणे एकूण १००० कर्मचाऱ्यांची (२०० टीम) नियुक्ती करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन स्थितीसाठी अतिरिक्त २० रिझर्व टीम देखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत.



या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नियोजनासाठी आय.टी.आय. येथील केंद्रावर खालील वरिष्ठ अधिकारी उपलब्ध आहेत

मंजुषा लटपटे: उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी.उज्वला पांगारकर: तह-सीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी. अरविंद रायबोले: उपविभागीय पोलीस अधिकारी. विनोद म्हैत्रेवार :पोलीस निरीक्षक.

एस टी आगार प्रमुख : अमर पाटील

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध विभागांची जबाबदारी नायब तहसीलदारांकडे सोपवण्यात आली आहे.

क्षेत्रीय स्तरावरील नियोजन

संपूर्ण मतदारसंघावर देखरेख ठेवण्यासाठी एकूण २४ झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, या झोनल अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना तांत्रिक मदत करण्यासाठी २४ मास्टर ट्रेनर यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही.



राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी बाभळगाव येथे सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.




निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथे आज जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आपला मतदानाचा हक्क बजावला.



मलकापूर येथील एस.टी. कॉलनीतील अंगणवाडी क्र - ३ येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.



भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर या आपल्या गावी कुटुंबीयासमवेत मतदान केले.



लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



लातूर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख सौ दीपशिखा धीरज देशमुख यांनी बाभळगाव येथे कुटुंबासह मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात सहभाग नोंदवला आहे.



दैठणा ता शिरूर आनंतपाळ येथे मतदानात महिलांचा सक्रिय सहभाग असलेला दिसून आला

## दैठणा येथे मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०७ फेब्रुवारी :** ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या येरोळ जिल्हा परिषद व येरोळ पंचायत समिती गणाच्या निवडणुकीत दैठणा गावात मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेच्या आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते.

या निवडणुकीत काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी या दोन राष्ट्रीय पक्षांमध्येच खरी लढत पाहायला मिळाली. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी संयम राखत कोणताही अनुचित प्रकार न घडू देता शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

मतदान सुरू झाल्यानंतर सकाळी दहा वाजेपर्यंत तरुण मतदारांचा सहभाग लक्षणीय होता. त्यानंतर दहा वाजल्यानंतर महिला मतदारांचा सहभाग वाढताना दिसून आला. दुपारी तीन वाजेपर्यंत महिला मतदारांची संख्या अधिक होती. त्यानंतर संध्याकाळच्या सुमारास एकूण मतदारांची संख्या हळूहळू कमी होत गेली.

एकूणच दैठणा गावात कोणताही अनुचित प्रकार न घडता, सौहार्दपूर्ण व शांत वा-तावरणात मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.

## अशोक पाटील यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०७ फेब्रुवारी :** चाकूर तालुक्यातील राचन्नावाडी येथील अशोक श्रिराम पाटील यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी शुक्रवारी दिनाक ०६ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री दुखद निधन झाले.त्यांच्यावर राचन्नावाडी येथील स्वतःच्या शेतात शनिवारी दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी केराबाई,दोन मुले,एक मुलगी,भाऊ,बहीणी,सुना,नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते सुभाष पाटील मुख्यलिपीक,मुंबई महानगर पालिका यांचे ते वडील होत.अंत्यसंस्कारास राचन्नावाडी आणि परिसरातील नागरिक,नातेवाईक,मित्रमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ फेब्रुवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप व शुभेच्छा समारंभ उत्सा-हात पार पडला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य एस. जी. कोडचे होते. मंचावर पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मूडपे व परीक्षाप्रमुख प्रा. पी. वाय. जालनापुरकर यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्रा. मूडपे म्हणा-ले, आजचा विद्यार्थी उद्याचा भारताचा जबाबदार नागरिक आहे. भविष्यातील संधींबाबत त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले. समारोपात प्रा. कोडचे म्हणा-ले, यश प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य, शिस्त व कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांच्या वती-ने हर्षवर्धन कांबळे, अनिकेत येलमटे, चैतन्य कांबळे, शिव-ानी कंटे व प्रतीक्षा सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वर्षभरातील विविध परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा ग्रंथ भेट व पुष्पहाराने गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण जाहुरे व प्रा. सचिन कांबळे यांनी तर आभार प्रा. नागनाथ खांडेकर यांनी मानले.

## होळकरी दौलतीची यशवंत पराक्रमी गाथा म्हणजे झुंज होय : प्रा. कुमनाळे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ फेब्रुवारी :** परकीयांच्या आक्रमणाचा राक्षस आ वासून उभा असतानाच होळकरी दौलती मध्ये माजलेली अंधाधुंदी, बेदीली, गैरशिस्त आणि बंड या सर्वांना तोंड देत आपल्या स्वबळावर स्वराज्यासाठी यशवंतराव होळकरांनी गाजवलेल्या यशवंत पराक्रमाची गाथा म्हणजे झुंज होय. असे मत प्रा.अशोक कुमनाळे यांनी व्यक्त केले.




गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत डॉ. विठ्ठल गोरे यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५४ वे पुष्प प्रा.अशोक कुमनाळे यांनी झुंज या ना. स. इनामदार लिखित ऐतिहासिक कादंबरीवर बोलताना ते म्हणाले की यशवंतराव होळकर यांचे चरित्र आणि इतिहास पाहता त्यांच्या पराक्रमातील क्रौर्य, त्यांनी लढलेल्या लढाया याबरोबरच स्थानिक परिस्थितीत त्यांचे नातलग व इतर समाजाशी जपलेले संबंध. त्यामध्येच ब्राह्मणी सरदाराकडून हीन संबोधने, विशिष्ट पद्धतीत झालेले त्यांचे लग्न आणि पेशवाईशी करावा लागलेला समेट. तरीदेखील त्यांची स्वराज्याबद्दलची तळमळ लक्षात घेता त्यांचे चरित्र एवढे मोठे आहे की, अंतकरणाचा उदार, गरीबाचा कनवाळू, स्वतःच्या सुखाविषयी निरीच्छ, तरीपण समरांगणी कर्दनकाळ अशी ज्यांची ओळख. आपल्या या सर्व सदगुनांचा राष्ट्र कार्यासाठी उपयोग करून घेणारा चतुर कर्तबगार शूर मुत्सद्दी म्हणजे यशवंतराव होळकर होते.

या संवादानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. विठ्ठल गोरे म्हणाले, झुंज ही शुद्ध ऐतिहासिक कादंबरी आहे. आजच्या या संवादमुळे यशवंतराव होळकरांचे स्मरण झाले, प्रत्येकाने असे ग्रंथ वाचले पाहिजेत.

शासकीय दूध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या अत्यंत प्रभावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर जाधव यांनी केले, संवादकांचा परिचय प्रा देवशेट्टे यांनी करून दिला. शेवटी आभार प्रकाश बिरादार यांनी मानले.

## गुलाबी मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्रास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व निवडणूक निरीक्षक ज्योती पाटिल यांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०७ फेब्रुवारी** :जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या निमित्ताने आज दिनांक ७ फेब्रुवारी रोजी मतदान संपन्न होत आहे .त्यानिमित्ताने लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी गव्हाण येथील गुलाबी मतदान केंद्रास (सखी मतदान केंद्र ) भेट दिली. तसेच निवडणूक निरीक्षक तथा अपर जिल्हाधिकारी धाराशिव ज्योती पाटिल यांनी गुलाबी मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्र समसापूर येथे भेट देउन पहाणी केली व दिव्यांग रॅंप, आरोग्य पथक व सुरळीत मतदान पाहून समाधान व्यक्त केले .त्यांच्यासोबत निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत थोरात, तहसिलदार रामेश्वर स्वामी, गटविकास अधिकारी संतोष माने, स्वीप सदस्य मंगेश सूवर्णकार, अमृतेश्वर स्वामी यांची उपस्थिती



होती. संपूर्ण मतदान केंद्र गुलाबी रंगांनी सजविले होते गुलाबी रंगाची फुग्याची कमान, गुलाबी वेशभूषेतील महिला मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, रंगीत रांगोळी व मतदान केंद्र गुलाबी रंगांनी सजविले असल्यामुळे मतदारांमध्ये उत्साह दिसून येत होता. मतदानाकडे जास्तीत जास्त महिला आकर्षित व्हाव्यात महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून गुलाबी मतदान केंद्राचे नियोजन करण्यात येते. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी मतदारांशी संवाद साधला व मोठ्या प्रमाणावर येत असलेल्या महिला मतदारांचा उत्साह वाढविला यामुळे निश्र्चितच या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी वाढेल व लोकशाही यशस्वी व बळकट होण्यासाठी मदत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ‘पंचशील’ ध्वजारोहण करून केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०७ फेब्रुवारी :** भार-तरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आज शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा प्रवक्ते महाराष्ट्र राज्य व शिरूर अनंतपाळ तालुक्याचे भुमी पुत्र मा. श्री. सुरज दादा चव्हाण व भारतीय जनता पार्टीचे युवा नेते आमचे मार्गदर्शक मा. श्री. अरविंद भैया पाटील निलंगेकर यांच्या शुभहस्ते ‘पंचशील’ ध्वजारोहण करून अभिवादन केले.

यावेळी बाबासाहेब व माता रमाई च्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

यावेळी - माजी नगराध्यक्ष विशाल गायकवाड, माजी सरपंच मुकेश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव - तुषार मादळे, निलंगा माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अनिल देवंगरे, न.पं.सभापती बाळूभाऊ शिवणे, श्री. धोंडिराम सांगवे, श्री. शंकर बेंबळगे,नगरसेवक न. पं. श्री. ओम बर्गे, नगरसेवक न.पं. श्री. दत्ता शिंदे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष श्री. बबन होनमाने, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष श्री. गणेश सलगरे, युवा नेते गणेश कांबळे, माता रमाई जयंतीचे अध्यक्ष शुभम गायकवाड, श्री. गौतम कांबळे विशाल गिलचे, संयाजी गायकवाड, रोहित गायकवाड, योगेश माने. राहुल मादळे, शाव-लीन मादळे, प्रिन्स बानाटे, प्रज्योत कांबळे, हर्षवर्धन गायकवाड, चंद्रकांत कांबळे, हुसेन मादळे, अविनाश जाधव, विष्णू गायकवाड, बाळू कांबळे, राधेश नाब्दे आदी मान्यवर उपस्थित होते.



# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## हुंडा व कौटुंबिक हिंसाचाराविरोधात वेळीच आवाज उठवा : ॲड. जाधव

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ फेब्रुवारी -**

हुंडा प्रथा व कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या सामाजिक समस्यांचे सम ाजावर होणारे परिणाम अत्यंत गंभीर असून, या अन्यायाविरुद्ध वेळीच आवाज उठवणे ही काळाची गरज आहे. महिलांनी आपल्या कायदेशीर हक्कांची संपूर्ण माहिती ठेवून अन्यायाला सामोरे जाण्याचे धैर्य दाखवावे, असे प्रतिपादन महिला व बालविकास विभागाच्या ॲड. प्रियंका जाधव यांनी केले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना ॲड. प्रियंका जाधव यांनी सखी वन स्टॉप सेंटरमार्फत महिलांना उपलब्ध असलेल्या मोफत सम ुपदेशन, कायदेशीर मदत, तात्काळ संरक्षण, वैद्यकीय व पोलीस सहाय्य या सेवांची सविस्तर माहिती दिली. हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांनी भीती न बाळगता पुढे येऊन मदत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत भगवान होते, तर उपप्राचार्य डॉ. कमलाकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जि.प.-पं.स. निवडणूक शांततेत; उमरगा तालुक्यात ३.३० वाजेपर्यंत ४८.९७ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ फेब्रुवारी -**






जिल्हा परिषद-पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद ९ गट व पंचायत समितीच्या १८ गणांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. कोणताही अनुचित प्रकार न घडता ही संपूर्ण निवडणूक अत्यंत शांततेत, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

मतदान केंद्रांवर महिला, तरुण, प्रथमच मतदान करणारे युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी तब्येतीची पर्वा न करता मतदान केंद्रांवर उपस्थित राहत आपला मतदानाचा हक्क बजावला, तर तरुण वर्गाने मोठ्या उत्साहाने लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवला. काही म तदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा तासाभरापेक्षा अधिक वेळ लांब असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

सकाळच्या सत्रात मतदानाची गती काहीशी मंद असली तरी दुपारनंतर ग्रामीण भागातील सर्वच मतदान केंद्रांवर मतदारांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात लोकशाहीचा उत्सव साजरा झाल्याचे वातावरण निर्माण झाले. दुपारी ३:३० वाजेपर्यंत तालुक्यात ४८.९७ टक्के मतदान झाल्याची अधिकृत नोंद झाली होती. निवडणूक यंत्रणा, अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील उत्तम समन्वयामुळे मतदान प्रक्रिया दिवसभर अत्यंत सुरळीत पार पडली.

कुठेही गोंधळ, वाद किंवा तणाव निर्माण न झाल्याने निवडणूक पूर्णतः शांततापूर्ण वातावरणात पार पडल्याचे सम ाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मतदान केंद्रांवर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिंदेसेना, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आदी प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी वर्दळ होती.

प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते आपल्या उमेदवारांच्या विजयासाठी मतदारांचे स्वागत करताना दिसून आले. मात्र सर्वच पक्षांनी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करत शांततेचे वातावरण राखले.

या पार्श्वभूमीवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस उपअधीक्षक १, पोलीस निरीक्षक २, पोलीस उपनिरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक १४, पोलीस कर्मचारी १९९, एसआरपीएफची १ तुकडी व २१० होमगार्ड असा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

उमरगा तालुक्यात जिल्हा परिषद-पंचायत समितीची निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आता सर्वांचे लक्ष दि. ९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले असून, या लढतीत कोण बाजी मारणार याबाबत संपूर्ण तालुक्यात उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

## १०४ वर्षांच्या आजींनी बजावला मतदानाचा हक्क...



जिल्हा परिषद-पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान तुरोरी जिल्हा परिषद गटातील दाबका गावात लोकशाहीप्रती निष्ठेचे अत्यंत प्रेरणादायी चित्र पाहायला मिळाले. येथील १०४ वर्षांच्या वयोवृद्ध महिला सयदाबी बाबन पटेल यांनी अत्यंत वृद्धावस्थेतही मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. वयाच्या शंभराव्या वर्षानंतरही मतदान करण्याची जिद्द, आत्मविश्वास आणि लोकशाही प्रक्रियेप्रती असलेली बांधिलकी त्यांनी या कृतीतून अधोरेखित केली. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित मतदारांमध्ये उत्साह संचारला असून तरुण व नवमतदारांसाठी त्या प्रेरणास्थान ठरल्या आहेत.

## संघ शताब्दी गृह संपर्क अभियानात संस्कार भारतीचा सक्रिय सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संघाच्या वतीने देशभरात संघ शताब्दी गृह संपर्क अभियान राबविण्यात येत असून, या अभियानात संस्कार भारती तुळजापूर संयोजन समितीने सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

तुळजापूर शहरातील आयोध्या नगर, विश्वास नगर व हडको परिसरात सुमारे एक हजार कुटुंबांशी थेट संपर्क साधण्याचे कार्य संस्कार भारतीच्या कार्यकर्त्यांमार्फत सुरू करण्यात आले आहे. केंद्रीय संस्कार भारतीच्या निर्देशानुसार प्रांत स्तरावरून जिल्हा समितींना प्राप्त सूचनांनुसार तुळजापूर संयोजन समितीने या अभियानात आपले योगदान दिले आहे.

या गृह संपर्क अभियानात डॉ. सतीश महामुनी, अपर्णा शेटे, म ाधुरी गीता, भाभी व्यास, गजानन भूमकर, रतन मस्के, नाईक, कुलकर्णी, अनिता महामुनी, ऋतुजा महामुनी आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. त्यांच्या सहभागातून गृह संपर्क अभियान यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले.

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाकडून प्राप्त झालेली पत्रके व माहिती पुस्तिका घरोघर वितरित करण्यात आली.

या माध्यमातून संबंधित कुटुंबांना संघ शताब्दीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तुळजापूर शहरात या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

संघ परिवारातील संस्कार भारती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), विश्व हिंदू परिषद तसेच इतर संघटनांच्या वतीनेही गृह संपर्क अभियान राबवून संघकार्याचा परिचय करून दिला जात आहे.

संघाची स्थापना, व्यक्ति घडविण्याची कार्यपद्धती, संघकार्याचा विस्तार, सेवाकार्य तसेच पंच परिवर्तन या विषयांवर या पत्रकांच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली जात आहे.

## धाराशिवमध्ये संत नरहरी महाराज समाधी सोहळा उत्साहात संपन्न


**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

धाराशिव येथील श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७४०व्या समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित ३१ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता गुरुवारी धाराशिव शहरातील तांबरी विभागात झाली. हभप. भागवताचार्य भारत म हाराज कोकाटे यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने या सप्ताहाचा समारोप झाला.

३० जानेवारी रोजी प्रारंभ झालेल्या या सप्ताहात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. पहाटे काकडा आरती, सकाळी श्रींची महापूजा, गाथा भजन आणि श्री ज्ञानेश्वरी पारायण पार पडले. दुपारी म हिलांचे भजन आणि श्रीदेवी भागवत महात्म्य कथेचे निरुपण करण्यात आले. सायंकाळी हरिपाठ आणि रात्री नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाने भाविक भक्तिरसात न्हाऊन निघाले. या सोहळ्यात हभप. प्रम ोद महाराज माने, हभप. हरिप्रसाद महाराज धर्माधिकारी, हभप. ॲड. ऋषिकेश महाराज वासकर, हभप. ॲड. पांडुरंग महाराज लोमटे, हभप. विठ्ठल महाराज वासकर, हभप. प्रा. एकनाथ महाराज पाटील, हभप. संदीपान महाराज हासेगावकर आणि हभप. पद्मनाभ व्यास महाराज यांसारख्या दिग्गज कीर्तनकारांची प्रबोधनात्मक सेवा लाभली. या प्रसंगी नळदुर्गचे नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक सुधीर पोतदार यांचा हभप. पद्मनाभ व्यास महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सोहळा यशस्वी करण्यासाठी संत नरहरी महाराज पुण्यतिथी उत्सव समिती, सराफ व सुवर्णकार असोसिएशन, श्री कालिका देवी म हिला मंडळ आणि देवस्थान समि तीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. यावेळी महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना; ४० विद्यार्थ्यांची निवड




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी तरुण-तरुणींना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार असून, इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जम ातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक व इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क तसेच आरोग्य विमा यांचा समावेश असलेली शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शैक्षणिक आकस्मिक व इतर खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी (युके वगळून) दरवर्षी १,५०० युएस डॉलर, तर युनायटेड किंगडमसाठी दरवर्षी १,१०० जीबीपी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक असून संबंधित विद्यापीठाची क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषांनुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल करण्यात येईल, तसेच क्यूएस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० नंतर चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरली जाईल.

परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या TOEFL, IELTS किंवा तत्सम प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी अर्ज http://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पद्धतीनेच सादर करावयाचा आहे. निवड समितीमार्फत सर्व निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन आदिवासी विकास विभागाने केले आहे.

विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील व म हाराष्ट्राचा रहिवासी असावा. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी वयोमर्यादा ३५ वर्षे, तर पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक असून TOEFL, IELTS किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

दरम्यान, राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते.

त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षणाच्या स्वप्नांना बळ मिळते. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असून इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

## दारू कारखान्यात भीषण स्फोट; वाशी तालुक्यात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील गोजवाडा येथील गट क्रमांक ५६१ मधील बालाजी फायर वर्क या दारू कारखान्यात आज सकाळी सुम ारे ८.३० वाजता भीषण स्फोट झाला. कच्चा माल साठवून ठेवलेल्या ठिकाणी हा स्फोट झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या स्फोटात सदर ठिकाणी ४० किलोपेक्षा जास्त मिक्स केलेली दारू आढळून आली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची नोंद नाही. कारखान्याच्या परवानाधारकांच्या वडिलांनी याबाबत तसेच कोणतीही मनुष्यहानी नसल्याचा जबाब दिला आहे.

वाशी तालुक्यात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याने सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्याच आठवड्यात खामकरवाडी येथेही अशीच घटना घडली होती. त्या वेळी जीवितहानी झाली नसली तरी अशा घटनांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास भविष्यात मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

या स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. म ात्र उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा संचालनालय यांचे पथक घटनास्थळी येत असून ते अधिक सखोल चौकशी करणार आहेत. दरम्यान, सदर घटनेचा पुढील तपास पोलीस यंत्रणा करीत आहे.

वारंवार घडणाऱ्या अशा स्फोटांच्या पार्श्वभूमीवर शासनाने औद्योगिक सुरक्षेच्या बाबतीत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## शिंदे विद्यालयात 'आनंद बाजार' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा व श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'खरी कमाई महोत्सव' आणि 'आनंद बाजार' हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, व्यवहारज्ञान आणि आत्मनिर्भरतेचे बीज रोवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे तब्बल ५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनीच विक्री, हिशोब आणि ग्राहकांशी संवाद साधत प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव घेतला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. अबरार सगरे उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रदिपकुमार गोरे व सुलभा देशमाने यांनी उपस्थिती लावली. मान्यवरांनी विविध स्टॉल्सना भेट देत विद्यार्थ्यांकडून खरेदी केली.

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून २,४८३ रुग्णांवर मोफत उपचार; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव ठरले अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

आयुष्यमान भारत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांनी उल्लेखनीय कामगिरी करत नविन वैद्यकीय महाविद्यालयांच्या तुलनेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या योजनेअंतर्गत गेल्या तीन वर्षांत एकूण २,४८३ रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले असून शासनाकडे तब्बल ३ कोटी ७४ लाख २५ हजार २११ रुपये इतकी विमा रक्कम जमा झाली आहे.

या योजनेत सन २०२३ मध्ये ८६१ रुग्णांवर, सन २०२४ मध्ये १,०५० रुग्णांवर तर सन २०२५ मध्ये लक्षणीय वाढ होत एकूण २,४८३ रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले. ही आकडेवारी नविन वैद्यकीय महाविद्यालयांपैकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांची असून रुग्णालयाच्या कार्यक्षम व्यवस्थापनाचे द्योतक ठरत आहे.

या यशामागे अधिष्ठाता डॉ. शैलेन्द्र चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी लाकाळ, डॉ. स्मिता गवळी व अधिसेविका यांचे काटेकोर नियोजन, प्रशासन व समन्वय महत्त्वाचा ठरला. अधिष्ठाता यांच्या नेतृत्वाखाली मागील वर्षात २,४८३ रुग्णांना या योजनेचा मोफत लाभ मिळाला.



मेडिसीन, सर्जरी, बालरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, ईएनटी, ॲनस्थेसिया, रेडिओलॉजी, पॅथॉलॉजी, बायोकेमिस्ट्री व मायक्रोबायोलॉजी या सर्व विभागांचे या यशात मोलाचे योगदान आहे. विभाग प्रमुख डॉ. प्रविणकुमार गोवंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय समन्वयक डॉ. दत्ता चौरे व डॉ. साजिद शेख, डेटा एन्ट्री ऑपरेटर सत्यजित मुळे, सदाशिव कांबळे, सारिका शिंगाडे तसेच आरोग्य मित्र व स्टाफ नर्से स यांनी सातत्याने मेहनत घेतली. योजनेचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनामुळे ही योजना अधिक प्रभावीपणे सामान्य रुग्णांपर्यंत पोहोचली आहे.

सध्या रुग्णालयात आधुनिक उपचार यंत्रणा कार्यान्वित असून प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स व नियमित वैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून दररोज रुग्ण तपासणी व उपचार समाधानकारक पद्धतीने सुरू आहेत. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून उपचारांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

सामाजिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांमध्येही रुग्णालयाचा उत्स्फूर्त सहभाग असून समाजात आरोग्यविषयक जनजागृतीत रुग्णालयाची महत्त्वाची भूमिका आहे. जिल्ह्यासह आजूबाजूच्या परिसरातून शस्त्रक्रिया व विविध आजारांवरील उपचारासाठी मोठ्या संख्येने रुग्ण येथे दाखल होत असून, उपलब्ध साधनसामग्री व मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून रुग्णालय व्यवस्थापन मोफत सेवा देण्यासाठी सतत कार्यरत आहे. यामुळेच नविन असूनही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव कार्यक्षमतेत अव्वल ठरले आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ९५ व्या वर्षीही गोपाबाई डोंगरे यांनी बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.७ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडत असून, मंगरुळ येथील रहिवासी गोपाबाई निवृत्ती डोंगरे यांनी वयाच्या ९५ व्या वर्षी लोकशाहीच्या उत्सवात उत्साहाने सहभागी होत मतदानाचा हक्क बजावला.

गोपाबाई डोंगरे यांनी जिल्हा परिषद प्रशाला, मंगरुळ येथील बूथ क्रमांक ६ वर दुपारी बारा वाजता उपस्थित राहून मतदान केले.



वयोमान असूनही त्यांनी स्वतः येऊन मतदान केल्याने उपस्थित नागरिकांमध्ये कौतुकाची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी त्यांनी मंगरुळ ग्रामस्थांना लोकशाहीच्या या उत्सवात सर्वांनी सहभागी होऊन भरघोस मतदान करावे, असे आवाहन केले.

या लोकशाहीच्या उत्सवात ९५ वर्षांच्या वयोवृद्ध आजीने सहभागी होऊन तरुणांनाही लाजवेल असा आदर्श घालून दिला आहे.



# जिल्ह्यात शांततेत मतदान; दुपारी साडेतीनपर्यंत सरासरी ६५ टक्के मतदान



**धाराशिव :** खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सपत्नीक जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी गोवर्धनवाडी (ता. धाराशिव) येथे मतदानाचा हक्क बजावला.



**तेर :** येथील मतदान केंद्रावर आमदार राणाजगजितसिंह पाटील व उमेदवार अर्चना पाटील यांनी कुटुंबीयांसह मतदानाचा हक्क बजावला.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी जिल्हाभरात मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील काही ठिकाणीचा किरकोळ अपवाद वगळता उर्वरित सर्व मतदान केंद्रांवर शांततेत व सुरळीतपणे मतदान झाले. प्रशासनाने केलेल्या चोख बंदोबस्तामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. मतदानाची अधिकृत टक्केवारी रात्री उशिरापर्यंत प्राप्त झाली नाही.

दुपारी साडेतीन वाजेपर्यंत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये समाधानकारक मतदानाची टक्केवारी नोंदविण्यात आली. भूम तालुक्यात ५४.१८ टक्के मतदान झाले असून सर्वाधिक मतदानाची नोंद याच तालुक्यात झाली.

वाशी तालुक्यात ५१.५३ टक्के, कळंब तालुक्यात ५०.७७ टक्के, परंडा तालुक्यात ५२.८३ टक्के तर तुळजापूर तालुक्यात ५१.२४ टक्के मतदान झाले. धाराशिव तालुक्यात ४७.४१ टक्के, लोहारा तालुक्यात ४६.७१ टक्के तर उमरगा तालुक्यात ४८.९७ टक्के मतदानाची नोंद झाली. जिल्ह्यातील एकूण ५५ जिल्हा परिषद गट व ११० पंचायत समिती गणांमध्ये सरासरी ६५ टक्के मतदान झाले होते. सकाळी मतदानाला काही ठिकाणी अपेक्षित प्रतिसाद कमी दिसून आला असला तरी दुपारनंतर मतदारांमध्ये उत्साह वाढताना दिसून आला.

महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच नवमतदारांनीही मतदानात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

सायंकाळी मतदानाची टक्केवारी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून अंतिम आकडेवारी मतदान संपल्यानंतर स्पष्ट होणार आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडल्याने प्रशासनाने समाधान व्यक्त केले आहे.

### मतदान प्रक्रियेत पारंपरिक शाईचा झाला वापर...

धाराशिव जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी मतदान दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडत असताना, राज्य निवडणूक आयोगाने मार्कर पेनच्या वापरावरून होणाऱ्या वादामुळे पारंपरिक इंडिलेबल शाईचा वापर पुन्हा सुरू केला आहे. या निर्णयानुसार मतदारांच्या बोटावर मतदानानंतर शाई लावली गेली. महानगरपालिका निवडणुकांमध्ये मार्कर पेन वापरल्यामुळे शाई पटकन पुसून निघत असल्याचे मतदार आणि राजकीय पक्षांनी तक्रारी केल्या होत्या. यामुळे दुबार मतदान किंवा मतदान प्रक्रियेतील विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण झाले होते.

### उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद...

धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील ५५ गटांमधील २३४ उमेदवार तसेच ११० गणांमधील ३९३ उमेदवारांचे भवितव्य आज ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. सकाळी ठरलेल्या वेळेत मतदानाला सुरुवात झाली. जिल्हाभरातील ग्रामीण भागातील मतदान केंद्रांवर मतदारांचा संमिश्र प्रतिसाद पाहायला मिळाला. दुपारनंतर मतदानाचा टक्का वाढला असून महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मतदानाचा हक्क बजावला.

### प्रशासनाकडून चोख बंदोबस्त व्यवस्था...

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निवडणूक निर्णय अधिकारी व निरीक्षकांनी मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवले. प्रशासनाने निवडणूक प्रक्रियेसाठी जय्यत तयारी केली होती. जिल्ह्यातील विविध १,३०८ मतदान केंद्रांवर ६,०४० कर्मचारी मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी तैनात करण्यात आले होते. यकर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी १५८ बसेसची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली होती.

## लोहारा तालुक्यात शांततेत मतदान; एकूण ४६.७१ टक्के मतदानाची नोंद

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील चार जिल्हा परिषद गट व आठ पंचायत समिती गणांची मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडली. प्रशासनाच्या दृष्टीने ही संपूर्ण प्रक्रिया समाधानकारक ठरली असून तालुक्यात एकूण ४६.७१ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.



दुपारी ३ वाजेपर्यंत उपलब्ध माहितीनुसार कानेगाव जिल्हा परिषद गटात एकूण ११,३५१ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ४८.२१ टक्के आहे.


माकणी गटात १०,७४६ मतदान झाले असून येथे ५१.३७ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. सास्तुर गटात ९,४०१ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ४४.३१ टक्के आहे. तर जेवळी गटात १०,२५५ मतदारांनी मतदान केले असून येथे ४३.५१ टक्के मतदान झाले आहे.

चारही गटांमध्ये मिळून एकूण ४१,७५३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून सरासरी ४६.७१ टक्के मतदान झाले आहे. सकाळी काही ठिकाणी मतदानाची गती मंद असली तरी दुपारनंतर मतदारांचा प्रतिसाद वाढल्याचे दिसून आले.

संपूर्ण मतदान प्रक्रिया कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पडली असून पोलीस प्रशासन व निवडणूक कर्मचाऱ्यांनी सतर्कता बाळगत आपली जबाबदारी पार पाडली.

सायंकाळपर्यंत मतदानाची टक्केवारी आणखी वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## ९३ व्या वर्षीही लोकशाहीप्रती निष्ठा : माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी बजावला मतदानाचा हक्क



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील अणदूर जि.प. व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी वयाच्या ९३ व्या वर्षी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीप्रती आपली अढळ निष्ठा व्यक्त केली.

अणदूर येथील मतदान केंद्रावर सकाळी शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात त्यांनी मतदान केले. वयोमानामुळे शारीरिक अडचणी असतानाही स्वतः उपस्थित राहून मतदान करण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. यावेळी त्यांच्यासोबत कार्यकर्ते व स्थानिक नागरिक उपस्थित होते. अणदूर ग्रा.पं. सदस्य ते महाराष्ट्र राज्याचे मंत्री असा प्रदीर्घ आणि गौरवशाली राजकीय प्रवास लाभलेले चव्हाण यांनी आपल्या कृतीतून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग किती महत्त्वाचा आहे.

मधुकरराव चव्हाण यांच्या मतदानाने लोकशाही मूल्यांची जपणूक करणारा एक आदर्श संदेश समाजासमोर ठेवला आहे.

## अणदूर पंचायत समिती गणात ५६.३३ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद निवडणूक २०२६ अणदूर पंचायत समिती गणात एकूण ११००४ मतदानापैकी ६१९९ इतके मतदान झाले असून, त्याची टक्केवारी ५६.३३ टक्के इतकी झाली आहे.

लोकसभा, विधानसभा निवडणुकीत यापेक्षा जास्त मतदान झाले होते. यावेळी मतांचा टक्का कमी झाल्याने याचा फटका कोणाला बसणार हे मतमोजणी मध्ये कळणार असून अणदूर पंचायत समिती गणात अणदूर व धनगरवाडी ही दोन गावे होती.

अणदूरमध्ये कमी मतदान झाले असले तरी एकंदरीत मतदान सुरळीत, शांततेत झाले.

## दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक, जवाहर माध्यमिक आश्रम शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दि. ५ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शाळेचे माजी विद्यार्थी आणि एमपीएससीद्वारे अभियंता म्हणून निवड झालेले अक्षय पांढरे (लातूर) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष विद्यानंद राठोड, प्राचार्य दयानंद राठोड, उपाध्यक्षा संध्या चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी



मान्यवरांच्या हस्ते १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पेढे भरवून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रिया बोंदर व आकांक्षा साळुंके या विद्यार्थिनींनी आपले शालेय अनुभव व्यक्त केले, तर शिक्षक प्रतिनिधी एस. पी. गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे अभियंता पांढरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवनात नम्रता, शिस्त आणि गुणवत्ता जपली, तर यश नक्कीच मिळते.

प्राध्यापिका देवकन्या भोसले यांनी सूत्रसंचालन केले, तर बी. एस. साकळे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

शेवटी के. डी. कांबळे यांनी आभार मानले.

## डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
महाराष्ट्रातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने धाराशिव येथील शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व डॉ. शिल्पा प्रतापसिंह पाटील यांनी मतदानाचा हक्क बजावला.

ईटकुर जिल्हा परिषद गटातील धनेश्वरी (बोरगाव), ता. कळंब येथील जिल्हा परिषद शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन त्यांनी मतदान केले.

यावेळी त्यांनी नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. उज्ज्वल विकासासाठी प्रत्येक मत महत्त्वाचे असून सर्वांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क नक्की बजावावा, असे आवाहन डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी यावेळी केले.

## मतदानाची गती मंद; परंड्यात सरासरी ६० टक्के मतदान

### आ. तानाजीराव सावंतांनी बजावला मतदानाचा हक्क... उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मध्ये बंद; गुलाल कोणाचा सोमवारी फैसला...



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ फेब्रुवारी -**
परंडा तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट व १० पंचायत समिती गणांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने मतदानाची जय्यत तयारी केली होती. त्या अनुषंगाने शनिवारी सकाळपासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. तालुक्यातील एकूण १३० मतदान केंद्रांवर मतदान शांततेत सुरू झाले.

सकाळच्या सत्रात ७.३० ते ११.३० या वेळेत मतदानाची गती तुलनेने मंद राहिली. या कालावधीत जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण मिळून केवळ २२.३१ टक्के मतदान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. पाचही गट व गणांमध्ये तिरंगी तसेच चौरंगी लढती पाहायला मिळत असून निवडणुकीची चुरस वाढली आहे.

डोंजा जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार भाऊसाहेब खरसडे व शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार नवनाथ आप्पा जगताप यांच्यात खरी लढत होत आहे. पंचायत समिती गणातही राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ व शिवसेनेचा धनुष्यबाण यांच्यात थेट सामना दिसून येतो. शेळगाव गटात भाजप, शिवसेना (धनुष्यबाण) व काँग्रेस (पंजा) यांच्यात तिरंगी लढत असून येथे भाजपचे पारडे जड असल्याचे चित्र आहे. आनाळा गटात राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ), भाजप (कमळ) व शिवसेना (धनुष्यबाण) यांच्यात तिरंगी फाईट होत आहे.

जवळा गटात शिवसेना (धनुष्यबाण), राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ) आणि अपक्ष उमेदवार (छत्री) यांच्यात लढत असून मतदारांचा कल अपक्ष उमेदवार धनंजय सावंत यांच्याकडे अधिक दिसून येत आहे. लोणी जिल्हा परिषद गटात अपक्ष (छत्री), शिवसेना (धनुष्यबाण) व भाजप (कमळ) यांच्यात चुरस आहे. मात्र या गटात शिवसेना (उबाठा) पुरस्कृत अपक्ष उमेदवार राणी रेवण ढोरे बाजी मारण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंडा तालुक्यातील पंचायत समिती गणांमध्ये सर्वत्र क्रॉस व्होटिंग होण्याची शक्यता असल्याने नेमका कोणता पक्ष आघाडी घेईल, हे सांगणे कठीण बनले आहे. दुपारी ३.३० वाजेपर्यंत तालुक्यात ५६,६६५ मतदारांनी मतदान केले असून सरासरी ६० टक्के मतदान झाल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील उमेदवारांचे भवितव्य आता ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. सोमवारी निकाल जाहीर होणार असून गुलाल कोणाच्या पारड्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील एका गावात १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी ३२ वर्षीय तरुणाला लोहारा पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीने पैशांचे आमिष दाखवून मुलाला शेतात नेऊन हा प्रकार केल्याची घटना २ फेब्रुवारी रोजी घडली. पीडित मुलाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी गुरुवारी रात्री आरोपीला शेतातून अटक केली. पोलीस उपनिरीक्षक सचिन केंद्रे तपास करत असून घटनेमुळे तालुक्यात संताप व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### श्री तुळजाभवानी देवीस ७६.६१० ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र अर्पण

**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
लातूर येथील भाविक नेहा अंधारे यांनी श्री तुळजाभवानी देवीस ७६.६१० ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले आहे. लातूर येथील भाविक नेहा शामराव अंधारे या आपल्या कुटुंबासमवेत मंगळवार रोजी रात्री श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आल्या होत्या. देवीवरील अपार श्रद्धा आणि भक्तिभावातून त्यांनी श्री तुळजाभवानी देवीस ७६.६१० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने नेहा अंधारे यांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र भेट देत यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सहायक जनसंपर्क अधिकारी उमाकांत क्षीरसागर तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



### तुळजापूरात माता रमाईला अभिवादन

**तुळजापवूर, दि.७ फेब्रुवारी -**
येथील दिलीप आप्पा गंगणे नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने दि.७ फेब्रुवारी रोजी माता रमाईच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी चेअरमन संदीप गंगणे, आयुष्मान भारत भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील दरेकर, राम चोपदार, कर्मचारी कलीम सिद्धीकी, अनिकेत वाघमारे, सुशील पिसोळकर, संदीप सुरवसे, उमाकांत क्षीरसागर, सद्दाम शेख उपस्थित होते.

### ११ फेब्रुवारी रोजी कै. बाजीराव पाटील अंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
येथील तेरणा महाविद्यालयाच्या वतीने कै. बाजीराव पाटील अंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन बुधवार, दि.११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे २८ वे वर्ष असून मराठवाडा व सोलापूर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.



स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात येणार असून सांघिक विजेत्या महाविद्यालयास स्मृतीचिन्ह प्रदान केले जाणार आहे. अधिकाधिक महाविद्यालयांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे व स्पर्धा समन्वयक डॉ. अनघा तोडकरी यांनी केले आहे.




### बौद्धिक व मानसिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींसाठी कायदेविषयक जनजागृती

**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
बौद्धिकदृष्ट्या अक्षम व मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्तींसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद व नागनाथ निवासी मतिमंद विद्यालय, खाणापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच करण्यात आले. कार्यक्रमात शासनाच्या विविध योजना, दिव्यांगांचे हक्क व संरक्षण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोफत कायदेविषयक सल्ल्यासाठी टोल फ्री क्रमांक १५१००, दिव्यांग मदत क्रमांक १४४४६ व बालकांसाठी हेल्पलाईन १०९८ यांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमास विधी सेवा प्राधिकरणाचे अधिकारी, शिक्षणसंस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा. मीरा कोथिंबिरे यांना पी.एच.डी. प्रदान

**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**
डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापिका मीरा बलभीम कोथिंबिरे यांना विधी शाखेतील संशोधनासाठी पी.एच.डी. पदवी जाहीर झाली आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथील संशोधन केंद्रातून त्यांनी ही पदवी प्राप्त केली. ए स्टडी ऑफ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी : इश्यूज अँड चॅलेंजेस विथ स्पेशल रेफरन्स टू टाटा मोटर्स इन इंडिया हा त्यांचा संशोधन विषय असून डॉ. राजेश देशमुख यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, व कुटुंबीयांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.